सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## विधि व न्याय विभाग

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११

# मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६

(दिनांक १७ ऑक्टोबर १९८९ पर्यंत सुधारलेला)

BOMBAY ACT No. XI OF 1947

# THE BOMBAY INDUSTRIAL RELATIONS ACT, 1946

***(As modified upto 17th October 1989)***

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासकिय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४, यांच्याद्वारे प्रकाशित
२००६

[किंमत रु. २३-००]

सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११

# मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६

(दिनांक १७ ऑक्टोबर १९८९ पर्यंत सुधारलेला)

BOMBAY ACT No. XI OF 1947

# THE BOMBAY INDUSTRIAL RELATIONS ACT, 1946

*(As modified upto 17th October 1989)*

एच ५२-अ

## अनुक्रमणिका

उद्देशिका.

### प्रकरण एक

**प्रारंभिक**

कलमे

१. संक्षिप्त नाव.

२. व्याप्ती, प्रारंभ व प्रयुक्ती.

३. व्याख्या.

### प्रकरण दोन

**या अधिनियमान्वये रचना करावयाची प्राधिकरणे किंवा नेमावयाचे प्राधिकारी**

४. कामगार आयुक्त.

५. निबंधक, अपर निबंधक व सहायक निबंधक.

६. समेटकर्ता.

७. समेट मंडळ.

८. कामगार अधिकारी व सहायक कामगार अधिकारी.

९. कामगार न्यायालये.

१०. औद्योगिक न्यायालय.

### प्रकरण तीन

**संघाची नोंदणी**

११. उपक्रम व व्यवसाय यांना मान्यता देणे.

१२. नोंदवह्या व मान्यताप्राप्त संघांची यादी ठेवणे.

१३. नोंदणीसाठी अर्ज.

१४. संघाची नोंदणी.

१५. नोंदणी रद्द करणे.

१६. विद्यमान नोंदणीकृत संघाच्या जागी दुसऱ्या संघाची नोंदणी करणे.

१७. फेरनोंदणीसाठी अर्ज.

१८. नोंदणी रद्द झाल्याने संघाची किंवा सदस्यांची दायित्वातून मुक्तता होत नाही.

१९. नियतकालिक विवरणपत्रे निबंधकाला सादर करणे.

२०. निबंधकाने दिलेल्या आदेशावर औद्योगिक न्यायालयाकडे अपील.

२१. आदेश प्रसिध्द करणे.

२२. एकाहून अधिक स्थानिक क्षेत्रांकरिता संघाची नोंदणी.

अनुक्रमणिका

## प्रकरण चार

### मान्यताप्राप्त संघ

कलमे

२३. मान्यताप्त संघाची यादी, ती चालू ठेवणे, तीत नांव दाखल करून घेण्याच्या शर्ती.

२३-अ. फेरबदल झालेल्या स्थानिक क्षेत्रासाठी मान्यताप्राप्त संघ काही काळ तसाच चालू राहणे.

२३-ब. सन १९४७ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २३ या अन्वये मान्य केलेला संघ हा या अधिनियमांच्या प्रयोजनासाठी मान्यताप्राप्त संघ राहील.

२४. मान्यताप्राप्त संघाच्या यादीतून नाव काढून टाकणे.

२४-अ. प्रकरण चार अन्वये निबंधकाच्या आदेशाविरुध्द औद्योगिक न्यायालयाकडे अपील.

२५. मान्यताप्राप्त संघांच्या अधिकाऱ्यांचे हक्क.

२६. महत्वाच्या कार्यवाह्यांमध्ये मान्यताप्राप्त संघांस शासकीय खर्चाने कायदेविषयक सहाय्य देणे.

## प्रकरण पाच

### मालक व कामगार यांचे प्रतिनिधी आणि त्यांच्या वतीने हजर राहणे

२७. मालकांच्या गटास मालक अधिसंघ म्हणून मान्यता देणे.

२७-अअ. मान्यताप्राप्त मालक अधिसंघ फेरबदल केलेल्या स्थानिक क्षेत्रासाठी मान्यताप्राप्त अधिसंघ म्हणून चालू राहणे.

२७-अ. कामगारांच्या वतीने हजर राहणे.

२८. कामगारांच्या प्रतिनिधींची निवडणूक.

२९. बहुमताने केलेली कृती किंवा घेतलेला निर्णय सर्वांची कृती निर्णय म्हणून असणे.

३०. कामगारांचा प्रतिनिधी.

३१. नोंदणीकृत किंवा प्रातिनिधिक संघ हा फेरबदल झालेल्या स्थानिक क्षेत्रासाठी काही काळ तसाच चालू राहणे.

३२. कार्यवाहीत ज्यांना हजर राहता येईल अशा व्यक्ती.

३३. कामगारांच्या वतीने हजर राहणे.

३३-अ. ज्या कार्यवाहीत कामगारा-कामगारांमध्ये विवाद असेल अशा कार्यवाहीत ज्यांना हजर राहता येईल त्या व्यक्ती.

## प्रकरण सहा

### कामगार अधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्ये

३४. कामगार अधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये.

## अनुक्रमणिका

## प्रकरण सात

### स्थायी आदेश

**कलमे**


३५. कामगार आयुक्ताने स्थायी आदेश निश्चित करणे.

३६. औद्योगिक न्यायालयाकडे अपील.

३७. पुनर्विलोकन.

३८. स्थायी आदेशात एक वर्षपर्यंत कोणताही फेरबदल न करणे.

३९. स्थायी आदेशात फेरबदल.

४०. स्थायी आदेश निश्चायक असणे.

४०-अ. अतिरिक्त किंवा फेरबदल केलेल्या बाबींच्या संबंधातील आदर्श स्थायी आदेश कमी लाभप्रद नसतील तर ते विवक्षित कामगारांना लागू असणे.

४१. सन १९४६ चा अधिनियम क्रमांक २० विवक्षित उद्योगांना लागू नसणे.


## प्रकरण आठ

### बदल


४२. बदलाची नोटीस.

४३. बदलाची नोटीस ही सर्वसाधारण नोटीस म्हणून केव्हा मानावी.

४४. बदलाबाबत करार.

४४-अ. कलम ४२ (४) अन्वये करारांची नोंदणी करणे.

४४-ब. विवक्षित मिटवणुकी करार आहेत असे समजणे.

४५. करार अंमलात येणे.

४६. बेकायदेशीर बदल.

४७. मालकाने विवक्षित अवधीत बदल वगैरे करणे.


## प्रकरण नऊ

### संयुक्त समित्या


४८. संयुक्त समित्यांची रचना.

४९. संयुक्त समितीची रचना.

५०. संयुक्त समित्यांचे कामकाज.

५१. बदलाबाबत प्रस्ताव.

५२. बदलासंबंधी विशेष सूचना देणे व कामगार न्यायालयाकडे विशेष अर्ज करणे.

५३. आपापल्या प्रतिनिधींचा निर्णय संघ व मालक यांना बंधनकारक असणे.

## अनुक्रमणिका

## प्रकरण दहा

### समेटासंबंधीची कार्यवाही

कलमे

५४. विवादाचे प्रतिवृत्त, निबंधक, मुख्य समेटकर्ता व समेटकर्ता यांच्याकडे पाठविणे.

५५. समेटाच्या कार्यवाहीचा परिणाम.

५६. समेटाची कार्यवाही.

५७. मुख्य समेटकर्त्यांचा मध्ये पडण्याचा अधिकार.

५८. मिटवणूक व प्रतिवेदन.

५९. मंडळाने निर्देशित करणें.

६०. कार्यपध्दती आणि समेटकर्त्याचे व मंडळाचे अधिकार.

६१. समेटकर्त्याने किंवा मंडळाने औद्योगिक न्यायालयाकडे निर्देश करणे.

६२. समेटच्या कार्यवाहीच्या टप्प्यांकरिता कालमर्यादा.

६३. समेटाच्या कार्यवाहीची समाप्ती.

६४. विवक्षित प्रकरणात समेटाच्या कार्यबाह्य सुरू न करणे किंवा पुढे न चालविणे.

६५. खंडित करण्यात आलेली समेटाची कार्यवाही पूर्ण झाली आहे असे मानणे.

## प्रकरण अकरा

### लवाद

६६. सादर निवेदन.

६७. सादर निवेदन केव्हा रद्द करता येईल.

६८. लवादाची कार्यवाही.

६९. एखादी विशेष बाब औद्योगिक न्यायालयाकडे निर्णयासाठी पाठवणे.

७०. लवादाने निवाडा देणे.

७१. लवाद न नेमल्यास विवाद कामगार न्यायालयाडे किंवा औद्योगिक न्यायालयाकडे निर्देशित करणे.

७२. राज्य शासनास कामगारा-कामगांरामधील विवाद लवादीसाठी कामगार न्यायालयाकडे किंवा औद्योगिक न्यायालयाकडे निर्देशित करता येतील.

७३. राज्य शासनास औद्योगिक विवाद लवादीसाठी औद्योगिक न्यायालयाकडे निर्देशित करता येईल.

७३-अअ. कामगार किंवा औद्योगिक न्यायालयाकडे सोपविण्यात आलेल्या बाबतीत इतर उपक्रमांच्या बाबी समाविष्ट करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

७३-अ. संघानी लवादासाठी औद्योगिक विवाद निर्देशित करणे.

७४. पक्षांना निवाड्याची नोटीस.

७५. निवाडा ज्या तारखेस प्रवर्तनात येईल ती तारीख.

७६. लवादी कार्यवाहीची समाप्ती.

७६-अ. राज्य शासनाशी संबंध येणारे निवाडे परिणामक करण्याची कार्यपध्दती.

# अनुक्रमणिका

## प्रकरण बारा

### कामगार न्यायालय

कलमे

७७. प्रादेशिक अधिकारिता.

७८. कामगार न्यायालयाचा अधिकार.

७९. कार्यवाह्यांचा प्रारंभ.

८०. कामगार न्यायालयाने संबंधित पक्षांस नोटीस देणे व पक्षांस हजर राहण्याची परवानगी देणे.

८०-अ. संबंधित कामगार अनेक असतील तेव्हा कलम ७९ अन्वये केलेल्या अर्जाच्या बाबतीत अनुसरावयाची कार्यपध्दती.

८०-ब. हजर राहण्याची परवानगी न दिलेल्या कामगारास पक्षकार म्हणून सामील होण्यास केव्हा परवानगी देता येईल.

८०-क. संबंधित कामगार अनेक असतील तेव्हा कामगाराने कलम ७९ अन्वये केलेल्या अर्जात अनुसरावयाची कार्यपध्दती.

८०-ड. कामगार न्यायालयाच्या न्यायाधीशाने कार्यवाहीची कार्यवृत्ते, विधाने इत्यादी अभिलिखित करणे.

८१. कामगार न्यायालयाने औद्योगिक न्यायालयाकडे कायदेविषयक प्रश्न निर्देशित करणे.

८२. अपराधांची दखल घेणे.

८३. संपरीक्षेच्या कामकाजात कामगार न्यायालयांचे अधिकार व त्यांनी अनुसरावाची कार्यपध्दती.

८३-अ. विधी व्यवसायीस कामगार न्यायालयात विवक्षित कार्यवाह्यांत हजर राहण्याची मनाई.

८३-ब. खर्चासंबंधी निवाडा देण्याचा आणि खर्चाबाबतच्या कोणत्याही आदेशाची अंमलबजावणी करण्याचा कामगार न्यायालयाचा अधिकार.

८४. अपिले.

८५. औद्योगिक न्यायालयाने कामगार न्यायालयांवर अधीक्षण करणे.

८५-अ. कार्यवाह्या वर्ग करण्याचा औद्योगिक न्यायालयाचा अधिकार.

८६. कामगार न्यायालयाचा निर्णय वगैरे यांवर आक्षेप न घेणे.

## प्रकरण बारा-अ.

### वेतन मंडळे

८६-अ. वेतन मंडळे.

८६-ब. वेतन मंडळाची रचना.

८६-क. वेतन मंडळाकडे निर्देशित करणे.

८६-कक. विवक्षित नोंदणीकृत संघांनी वेतन मंडळाकडे निर्देश करणे.

८६-ड. समेटकर्ता, मंडळ वगैरे यांच्यापुढे कार्यवाही सुरू न करणे किंवा पुढे चालू न ठेवणे.

८६-इ. वेतन मंडळापुढील कामकाजाची कार्यपध्दती.

८६-इइ. वेतन मंडळाचा निर्णय प्रवर्तनास येणे.

८६-फ. वेतन मंडळाच्या ज्या निर्णयाशी राज्य शासनाचा संबंध येत असेल, तो निर्णय परिणामक करण्याची कार्यपध्दती.

८६-ग. अपिले.

८६-ह. वेतन मंडळाचा आदेश किंवा निर्णय बंधनकारक असलेले पक्ष.

## अनुक्रमणिका

कलमे

८६-आय. वेतन मंडळाने दिलेल्या आदेशाचे किंवा निर्णयाचे पुनर्विलोकन.

८६-जे. औद्योगिक न्यायालयाने अधीक्षण करणे.

८६-के. वेतन मंडळाचा आदेश किंवा निर्णय यावर आक्षेप न घेणे.

८६-केके. काही विवाद वेतन मंडळाकडे वर्ग करणे.

प्रकरण बारा-ब.

राज्य वेतन मंडळ

८६-अ. राज्य वेतन मंडळ.

प्रकरण तेरा

औद्योगिक लवाद न्यायालय

८७. औद्योगिक न्यायालयाची कर्तव्ये.

८८. औद्योगिक न्यायालयाचे अधिकार.

८९. संघाची नोंदणी रद्द करणे.

९०. कायद्येविषयक मुद्याचा संदर्भ करणे.

९१. अधिनियम व नियम यांच्या अर्थविवरणासंबंधिचा प्रश्न निर्देशित करणे.

९२. औद्योगिक न्यायालयापुढील कार्यवाहीची कार्यपध्दती.

९३. खर्च देण्याबाबत दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी.

९४. औद्योगिक न्यायालयाचा आदेश बंधनकारक असलेले पक्ष.

९५. औद्योगिक न्यायालयाचा आदेश पुर्नविलोकनावरून असेल त्याखेरीज अंतिम असणे.

९५-अ. औद्योगिक न्यायालयाने घोषित केलेला कायदा बंधनकारक असणे.

९६. औद्योगिक न्यायालयापुढील कार्यवाहीत अधिकाऱ्याने हजर असणे.

प्रकरण चौदा

बेकायदेशीर संप व टाळेबंदी

९७. बेकायदेशीर संप.

९७-अ. विवक्षित परिस्थितीत कामगारांनी कामरोध करणे बेकायदेशीर असणे.

९८. बेकायदेशीर टाळेबंदी.

९८-अ. विवक्षित परिस्थितीत मालकाने कामबंदी करणे, हे बेकायदेशीर असणे.

९९. संप , टाळेबंदी, कामबंदी किंवा कामरोध हा बेकायदेशीर आहे किंवा कसे हे घोषित करण्यासाठी औद्योगिक न्यायालयाकडे निर्देश करणे.

# अनुक्रमणिका

## प्रकरण पधरा

### चौकशी न्यायालय


कलमे

१००. चौकशी न्यायालय, त्याची रचना, कर्तव्ये, अधिकार.

प्रकरण सोळा

शास्ती

१०१. मालकाने कामगारास बडतर्फ न करणे, पदानवत न करणे किंवा शिक्षा न करणे.

१०२. बेकायदेशीर म्हणून ठरविलेली टाळेबंदी किंवा कामबंदी घोषित करणे याबद्दल शास्ती.

१०३. बेकायदेशीर म्हणून ठरविलेला संप किंवा बेकायदेशीर कामबंदी घोषित करणे किंवा सुरू करणे याबद्दल शास्ती.

१०४. बेकायदेशीर म्हणून ठरविलेला संप, टाळेबंदी, कामबंदी व कामरोध यांस चिथावणी वगैरे देण्याबद्दल शास्ती.

१०५. गोपनीय माहिती उघड केल्याबद्दल शास्ती.

१०६. बेकायदेशीर बदलाबद्दल शास्ती.

१०६-अ. संयुक्त समितीवर सदस्य नेमण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.

१०७. स्थायी आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.

१०८. कर्तव्य पार पाडण्याच्या कामात एखाद्या व्यक्तीस अडथळा केल्याबद्दल शास्ती.

१०९. इतरत्र तरतूद न केलेल्या अपराधांबद्दल शास्ती.

११०. दंड आणि भरपाई यांची वसुली.

प्रकरण सतरा

औद्योगिक स्थितीचा अभिलेख

१११. औद्योगिक बाबी वगैरे यांचा अभिलेख.

११२. अभिलेख पडताळून पाहण्यासाठी चौकशी.

प्रकरण अठरा

संकीर्ण

११३. अनुसूचित फेरफार करणे.

११३-अ. विवक्षित अर्ज, त्यांचे काम चालू न ठेवण्याने खारीज करणे.

११४. करार वगैरे कोणावर बंधनकारक असेल.

११५. वेतन मंडळाचा किंवा कामगार न्यायालयाचा आदेश किंवा निर्णय कोणावर बंधनकारक असेल.

११५-अ. मालक आणि प्रातिनिधिक संच यांमधील कराराच्या अटीप्रमाणे आदेश, निर्णय किंवा निवाडा असणे.

## अनुक्रमणिका

कलमे

११६. करार वगैरे परिणाम असण्याचे केव्हा बंद होईल.

११६-अ. निवड्यात फेरफार करणे.

११७. संघाच्या कार्यकारी मंडळाचे दायित्व.

११८. साक्षीदाराच्या नावे समन्स काढणे वगैरे यासंबंधी विवक्षित प्राधिकाऱ्याचे अधिकार.

११८-अ. कलम १०४ खालील अपराध दखली असणे.

११८-ब. पक्ष हजर न झाल्याचे परिणाम.

११९. काही अधिकारी लोकसेवक असणे.

११९-अ. दस्तऐवज वगैरे हजर न केल्यामुळे औद्योगिक न्यायालयाचा, कामगार न्यायालयाचा आणि वेतन मंडळाचा अवमान.

११९-ब. औद्योगिक न्यायालये, कामगार न्यायालये व वेतन मंडळे यांचे इतर प्रकारचे अवमान.

११९-क. औद्योगिक न्यायालय वगैरे यांचा सर्व संबंधित बाबींचा निर्णय करण्याचा अधिकार.

११९-ड. औद्योगिक न्यायालय वगैरे यांचा अंतरिम आदेश देण्याचा अधिकार.

११९-इ. या अधिनियमा अन्वये केलेल्या कारवाईला संरक्षण.

१२०. सन १९२९ चा अधिनियम क्रमांक ७, याच्या तरतुदींना बाध न येणे.

१२१. सन १९३४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९ चे निरसन.

१२२. सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ चे निरसन.

१२२-अ. अधिकारांचे प्रत्यायोजन.

१२३. नियम.

१२३-अ. सन १९४७ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २३ याचे निरसन.

**अनुसूची** : एक ते तीन.

# सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११

## [१] [मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६]*

(या अधिनियमाला गव्हर्नर जनरल यांची अनुमती दिनांक ९ एप्रिल १९४७ रोजी मिळाली; ही अनुमती मुंबई सरकारचे राजपत्र, भाग चार बी १ मध्ये दिनांक १५ एप्रिल १९४७ रोजी प्रथम प्रतिद्व करण्यात आली.)

या अधिनियमात पुढील अधिनियम व आदेश या अन्वये अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या :-

सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३.

सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४.

सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५.

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३.

सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४९†

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३५.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय ) आदेश, १९५६.

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य समवर्ती विषय ) आदेश, १९६०

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.

सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३.

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७. (१२-१२-१९७७)††

---

[१] उद्देश व कारणे यांचे निवेदन यासाठी मुंबई सरकारचे राजपत्र १९४६ (इंग्रजी), भाग ५, पृष्ठ २०९ पहा व विधानसभेतील कामकाजाकरिता मुंबई विधानसभा चर्चा १९४६, खंड ९, आणि विधान परिषदेतील कामकाजाकरिता मुंबई विधान परिषद चर्चा १९४६, खंड ११ पहा.

*हा अधिनियम उर्वरित महाराष्ट्र राज्यास लागू करण्यात आला आहे. (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम २ पहा).

† सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४९ याचे कलम ६ पुढीलप्रमाणे आहे:-

(कलमे ३ व ४ अन्वये केलेल्या सुधारणा या, मुख्य अधिनियम, ज्या तारखेस अंमलात आला त्या तारखेपासून अंमलात येणे.)

" ६. न्यायालयाच्या कोणत्याही न्याय निर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी या अधिनियमाची कलमे ३ व ४ या अन्वये केलेल्या सुधारणा या मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६ ज्या तारखेस अंमलात आला त्या तारखेपासून अंमलात आल्या आहेत असे मानण्यात येईल :

(१९४७ चा मुंबई ११.)

परंतु, हा अधिनियम अंमलात येण्याच्या तारखेपूर्वी कोणत्याही व्यक्तीने एखादे कृत्य केले असेल व असे कृत्य या कलमाच्या तरतुदींच्या अभावी उपरोक्त तारखेस, उक्त अधिनियमान्वये अपराध ठरत नसेल तर, अशा कृत्यांच्या संबंधात अपराध केल्याबद्दल अशी व्यक्ती सिध्दापराध आहे असे या कलमाच्या कोणत्याही तरतुदीवरून समजता कामा नये."

†† ही खुण अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शविते.

**मालक व कामगार यांच्या संबंधांचे विनियोजन करणे, औद्योगिक विवादांच्या मिटवणुकीसाठी तरतूद करणे व इतर काही प्रयोजनांसाठी तरतूद करणे यांबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, काही बाबतीत मालक व कामगार यांच्या संबंधाचे विनियमन करण्यासाठी तरतूद करणे, औद्योगिक विवादांच्या मिटवणुकीसंबंधीचे कायदे एकत्रित करणे व त्यात सुधारणा करणे आणि इतर काही प्रयोजनांसाठी तरतूद करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहेत :--

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास, मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६ असे म्हणावे.

व्याप्ती, प्रारंभ व प्रयुक्ती. **२.** (१) हा अधिनियम [१][संपूर्ण महाराष्ट्र राज्यास] लागू असेल.

(२) तो, [२][राज्य] शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा तारखेस अंमलात येईल ;

[३][परंतु, मुंबई औद्योगिक संबंध (व्याप्ती व सुधारणा) अधिनियम, १९६४ यांच्या प्रारंभापासून हा अधिनियम, राज्याच्या विदर्भ प्रदेशाच्या ज्या क्षेत्रात, अशा प्रारंभाच्या निकटपूर्वी मध्यप्रांत व वऱ्हाड औद्योगिक विवाद मिटवणूक अधिनियम, १९४७ हा अंमलात होता, त्या क्षेत्रात अंमलात यईल]. १९६५ चा महा. २२. १९४७ चा मध्य-प्रांत व वऱ्हाड २३.

(३) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी ज्या क्षेत्रात मुंबई औद्योगिक विवाद अधिनियम, १९३८ अंमलात होता त्या क्षेत्रात उक्त अधिनियम ज्या उद्योगांना लागू होता, त्या उद्योगांना हा अधिनियम लागू होईल ; १९३८ चा मुंबई २५.

---

[१] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याचे कलम ३ (अ) अन्वये "महाराष्ट्र राज्याच्या मुंबई प्रदेशास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये, "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द जादा दाखल करण्यात आला.

[३] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याचे कलम ३ (ब) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

१९४९ चा मुंबई ५५. १९४९ चा मुंबई १०.

[1][परंतु, मुंबई औद्योगिक संबंध (सुधारणा) अधिनियम, १९४९ ज्या तारखेस अंमलात येईल त्या तारखेसपासून भारताच्या इंपिरियल बँकेस व बँक व्यवसायी कंपनी अधिनियम, १९४९ कलम ५ यातील व्याख्येनुसार असलेल्या व एकाहून अधिक [2][राज्यात] शाखा किंवा आस्थापना असलेल्या कोणत्याही बँक व्यवसायी कंपनीस हा अधिनियम लागू होण्याचे बंद होईल].

(४) [2][राज्य] शासनाला, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदी अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे सर्वसाधारणपणे किंवा कोणत्याही स्थानिक क्षेत्रात सर्व किंवा कोणत्याही इतर उद्योगांना लागू करता येतील :

१९६५ चा महा. २१. १९४७ चा मध्य-प्रांत व वऱ्हाड २३.

[3][परंतु, मुंबई औद्योगिक संबंध (व्याप्ती व सुधारणा) अधिनियम, १९६४ यांच्या प्रारंभापासून या अधिनियमाच्या, सर्व तरतुदी, मध्यप्रांत व वऱ्हाड औद्योगिक विवाद मिटवणूक अधिनियम, १९४७ हा राज्याच्या विदर्भ प्रदेशातील ज्या उद्योगांना लागू होता, त्या उद्योगांना लागू होतील.]

१९६५ चा महा. २२. १९४७ चा मध्य-प्रांत व वऱ्हाड २३. १९०४ चा मुंबई १. १९३८ चा मुंबई २५.

[4][(५) राज्य शासनाला, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असा निदेश देता येईल की, या अधिनियमाच्या तरतुदी अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा क्षेत्रातील विनिर्दिष्टकरण्यात येईल अशा उद्योगांच्या बाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेपासून लागू असण्याचे बंद होईल ; आणि त्या तारखेस या अधिनियमाच्या तरतुदी, अशा क्षेत्रातील त्या उद्योगांस लागू असण्याचे बंद होईल, आणि मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याच्या कलम ७ च्या तरतुदी, जणू काही अशा क्षेत्रातील उक्त उद्योगांच्या संबंधात महाराष्ट्र अधिनियमाद्वारे हा अधिनियम त्यावेळी निरसित करण्यात आला होता असे समजून, अशा बंद होण्याच्या बाबतीत लागू होतील.

---

१ सन १९४९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम २ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले. उक्त परंतुक दाखल करण्यात आल्यामुळे, राज्य शासनाने किंवा त्याच्या अधीन असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा प्राधिकाऱ्याने केलेल्या निर्देशासंबंधीच्या कार्यवाहीखेरीज सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५ हा अंमलात आल्याच्या तारखेस औद्योगिक न्यायालयासमोर किंवा कामगार न्यायालयासमोर किंवा निबंधकासमोर चालू असलेल्या व ज्यात उक्त परंतुकात उल्लेख केलेल्या इंपिरियल बँक ऑफ इंडिया किंवा बँकिंग कंपनी हा एक पक्ष आहे, अशा इतर कोणत्याही कार्यवाहीवर परिणाम होणार नाही. अशी कार्यवाही ही जणु सन १९४९ च्या मुंबई अधिनियम क्रमांक ५५ हा पारित झालेला नव्हता असे समजून पुढे चालू ठेवली पाहिजे व निकालात काढली पाहिजे. (सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५ याचे कलम २० पहा).

२ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये, "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द जादा दाखल करण्यात आला.

३ सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, याचे कलम ३ (क) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

४ वरील अधिनियमाच्या कलम ३ (ड) अन्वये पोट-कलमे (५) व (६) ही जादा दाखल करण्यात आली.

(६) या कलमाच्या पूर्ववर्ती तरतुदीत तरतूद केलेल्या रीतीने, सर्वसाधारणपणे कोणत्याही उद्योगास व कोणत्याही क्षेत्रात, हा अधिनियम, लागू करण्यात आल्यानंतर, या अधिनियमान्वये, केलेले किंवा काढलेले किंवा जे या अधिनियमान्वये केल्याचे किंवा काढल्याचे समजण्यात येईल असे आणि अशा रीतीने कोणत्याही उद्योगास अधिनियम लागू करण्याच्या निकटपूर्वी राज्याच्या मुंबई क्षेत्रात अंमलात असलेले सर्व नियम, विनियम, आदेश आणि अधिसूचना या मुंबई औद्योगिक संबंध (व्याप्ती व सुधारणा) अधिनियम, १९६४, याद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी जेथवर विसंगत नसतील तेथवर त्या रीतसर विखंडित करण्यात किंवा त्यात सुधारणा करण्यात येईपर्यंत, सर्वसाधारणपणे त्या उद्योगासही किंवा यथास्थिति, अशा क्षेत्रात सुध्दा लागू होतील]. १९६५ चा महा. २२.

व्याख्या. ३. विषयात किंवा संदर्भात एतद्‌विरुध्द काही नसेल तर, या अधिनियमात--

(१) "मान्यता प्राप्त यादी" म्हणजे कलम १२ अन्वये निबंधकाने ठेवलेली मान्यता प्राप्त संघांची यादी ;

(२) "मान्यता प्राप्त संघ" म्हणजे मान्यता प्राप्त संघांच्या यादीत नाव असलेला संघ,

(३) "लवाद कार्यवाही" म्हणजे,--

(एक) या अधिनियमान्वये लवादापुढे चालू असलेली कोणतीही कार्यवाही ;

(दोन) कामगार न्यायालय, [1][वेतन मंडळ] किंवा औद्योगिक न्यायालय यापुढे लवादासंबंधी चालू असलेली कोणतीही कार्यवाही ;

(४) "लवाद" म्हणजे या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये ज्याच्याकडे लवादासाठी विवाद निर्देशित करण्यात आला असेल असा लवाद व त्यात पंचाचा समावेश होईल ;

(५) "मालक अधिसंघ" म्हणजे कलम २७ अन्वये [2][राज्य] शासनाने मान्यता दिलेला मालकांचा कोणताही गट ;

(६) "निवाडा" म्हणजे लवादासंबंधी चालविलेल्या कामकाजात दिलेल्या कोणत्याही औद्योगिक विवादाचा किंवा त्यासंबंधातील कोणत्याही प्रश्नाचा कोणताही [3][अंतरिम, अंतिम, पूरक] निर्णय,

(७) "मंडळ" म्हणजे कलम ७ अन्वये नेमण्यात आलेले समेट मंडळ ;

(८) "बदल" म्हणजे औद्योगिक बाबतीत केलेला फेर फेरफार ;

[4][ (८अ) "कामबंदी" म्हणजे मालकाने कामाची कोणतीही जागा किंवा तिचा कोणताही भाग बंद ठेवणे किंवा त्याने काम सर्वस्वी किंवा अंशतः निलंबित ठेवणे किंवा त्याने कामाला ठेवलेल्या व्यक्तीस कामावर चालू ठेवण्याचे सर्वस्वी किंवा अंशतः नाकारणे-- मग अशा रीतीने काम बंद ठेवणे किंवा ते निलंबित ठेवणे किंवा असा नकार देणे हे औद्योगिक विवादामुळे घडलेले असो किंवा नसो ;]

---

[1] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम २ (अ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[2] विधी अनुकूल आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[3] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५, कलम ३ (१) अन्वये "मध्यंतरीय किंवा अंतिम" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम ३ (ब) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

(९) "कामगार आयुक्त" म्हणजे [1][राज्य] शासनाने त्या त्या वेळी कामगार आयुक्त म्हणून नेमलेला अधिकारी, आणि या संज्ञेत, कामगार आयुक्तांचे कोणतेही अधिकार ज्या कोणत्याही व्यक्तीस देण्यात येतील व कामगार आयुक्ताची कर्तव्ये ज्या कोणत्याही व्यक्तीकडे सोपविण्यात येतील अशा व्यक्तीचा समावेश होईल ;

(१०) "समेट संबंधी कार्यवाही" म्हणजे या अधिनियमान्वये समेटकर्त्यांने किंवा मंडळाने चालविलेली कोणतीही कार्यवाही ;

१९६५ चा महा. २२.

(११) "समेटकर्ता" म्हणजे या अधिनियमान्वये नेमण्यात आलेल्या कोणत्याही समेटकर्ता व त्यात मुख्य समेटकर्ता [2][अपर मुख्य समेटकर्ता] किंवा विशेष समेटकर्ता याचा समावेश होईल ;

(१२) "चौकशी न्यायालय" म्हणजे कलम १०० अन्वये रचना करण्यात आलेले न्यायालय ;

(१३) "कामगार" म्हणजे कौशल्याचे किंवा बिनकौशल्याचे [3][ * * * *] काम करण्यासाठी मजुरीने लावलेली किंवा बक्षिशीवर उद्योगात नेमलेली कोणतीही व्यक्ती, आणि या संज्ञेत पुढील व्यक्तींचा समावेश होईल :--

(अ) कंत्राटदाराने खंड १४, उपखंड (इ) च्या अर्थानुसार असणाऱ्या मालकाशी केलेली संविदा पार पाडण्यासाठी आपल्या वतीने कोणतेही काम करण्याकरिता नेमलेली व्यक्ती ;

(ब) ज्या बदलासंबंधी नोटीस देण्यात आली आहे किंवा कलम ४२ अन्वये अर्ज करण्यात आला आहे अशा बदलासंबंधीच्या कोणत्याही विवादामुळे जिला नोकरीतून [4][बडतर्फ करण्यात आले आहे, सेवामुक्त करण्यात आले आहे किंवा कामावरून कमी करण्यात आले आहे किंवा जिची सेवा समाप्त करण्यात आली आहे] अशी व्यक्ती--मग अशी नोटीस किंवा अर्ज तिला [5][बडतर्फ करण्यात पूर्वी, सेवामुक्त करण्यापूर्वी किंवा यथास्थिती नोकरीवरून कमी करण्यापूर्वी किंवा सेवा समाप्त करण्यापूर्वी] किंवा तदनंतर दिलेली असो किंवा केलेला असो ;

[6][ परंतु, तीत पुढील व्यक्तीचा समावेश होत नाही--

(एक) मुख्यत: व्यवस्थापकीय, प्रशासकीय, पर्यवेक्षकीय किंवा तंत्रविषयक कामावर लावलेली [7][दरमहा एक हजार रुपये] पेक्षा अधिक [8][ मूळ वेतन, भत्ते वगळून--मिळणारी व्यक्ती ;]

---

[1] विधी अनुकूल आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[2] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ४ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम २ (१) (अ) अन्वये, येथील "अंगमेहनतीने किंवा कारकुनी," हा मजकूर वगळण्यात आला.

[4] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ४ (ब) (१) अन्वये "बडतर्फ करण्यात आले आहे किंवा कामावरून काढून टाकण्यात आले आहे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ४ (ब) (१) अन्वये "बडतर्फ करण्यापूर्वी किंवा कामावरून काढून टाकण्यापूर्वी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम २ (१) (ब) अन्वये, हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[7] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम २ अन्वये "दरमहा पाचशे पंचवीस रुपये" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[8] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ४ (ब) (दोन) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

(दोन) वरील खंड (एक) मध्ये ज्यासंबंधी उल्लेख करण्यात आला आहे. अशा कामावर लावलेली व राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, याबाबत विनिर्दिष्ट करील अशी इतर कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्तीचा वर्ग-मग अशा व्यक्तीस मिळणाऱ्या वेतनाची रक्कम कितीही असो ;]

(१४) "मालक" या संज्ञेत--

(अ) मालकाचा अधिसंघ किंवा गट ;

(ब) मालकाचा कोणताही अभिकर्ता ;

(क) जेव्हा एखादा उद्योग [१][राज्य] शासनाच्या विभागाकडून चालविण्यात किंवा चालू ठेवण्यात येत असेल तेव्हा त्याबाबत विहित केलेला प्राधिकारी आणि जेव्हा असा कोणताही प्राधिकारी विहित करण्यात आला नसेल तेव्हा विभागप्रमुख ;

(ड) जेव्हा एखादा उद्योग स्थानिक प्राधिकारणाकडून किंवा त्याच्या वतीने चालविण्यात किंवा चालू ठेवण्यात येत असेल तेंव्हा प्राधिकरणाचा मुख्य कार्यकारी अधिकारी ;

(इ) जेव्हा कोणत्याही उपक्रमाचा मालक, असा उपक्रम चालू असताना किंवा तो चालविण्यासाठी अशा उपक्रमाचा साधारणपणे भाग असलेले कोणतेही संपूर्ण काम किंवा त्या कामाचा कोणताही भाग कंत्राटदाराने किंवा कंत्राटदाराच्या देखरेखीखाली करण्याकरिता कोणत्याही व्यक्तीबरोबर संविदा करील तेव्हा, अशा उपक्रमाचा मालक ;

यांचा समावेश होतो ;

(१५) "बेकायदेशीर बदल" म्हणजे कलम ४६, पोट-कलम (४) किंवा (५) याच्या अर्थानुसार असलेला बेकायदेशीर बदल ;

(१६) "औद्योगिक न्यायालय" म्हणजे कलम १०, अन्वये रचना करण्यात आलेले औद्योगिक लवाद न्यायालय ;

(१७) "औद्योगिक विवाद" म्हणजे, एखादा मालक व कामगार यांच्या दरम्यान किंवा अनेक मालक व अनेक कामगार यांच्या दरम्यान किंवा कामगार व कामगार यांच्या दरम्यान असलेला व कोणत्याही औद्योगिक बाबीशी संबंध असलेला कोणताही विवाद किंवा मतभेद ;

(१८) "औद्योगिक बाब" म्हणजे नोकरी काम, वेतन, कामाचे तास, मालक किंवा कामगार यांचे विशेषाधिकार, हक्क किंवा कर्तव्ये किंवा सेवायोजनाची पध्दत, अटी, व शर्ती, यासंबंधीची कोणतीही बाब, व तीत पुढील गोष्टींचा समावेश होतो :--

(अ) मालक व कामगार यांचे संबंध किंवा कोणत्याही व्यक्तीस बडतर्फ करणे किंवा तीस कामावर न लावणे याविषयीच्या सर्व बाबी ;

(ब) कोणत्याही कामगाराच्या किंवा कामगारांच्या वर्गाच्या, कामाच्या विभागणीविषयीच्या सर्व बाबी ;

(क) या अधिनियमान्वये नोंदलेला कोणताही करार किंवा केलेली कोणतीही विनंती, किंवा मिटवणूक किंवा दिलेला कोणताही निवाडा यासंबंधी किंवा तदन्वये असलेला कोणताही हक्क किंवा हक्कमागणी याविषयीच्या बाबी ;

(ड) निकडीचा संबंध असलेल्या व्यक्तीच्या किंवा एकंदर समाजाच्या हिताचा विचार करता, कोणत्याही औद्योगिक बाबीच्या संबंधात कोणती गोष्ट न्याय्य व रास्त आहे याविषयीचे सर्व प्रश्न.

---

१ विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(१९) "उद्योग" म्हणजे--

(अ) मालकाचा कोणताही धंदा, उदीम, यांत्रिक निर्मिती किंवा उपक्रम किंवा आजीविका ;

(ब) कामगारांची कोणतीही आजीविका, सेवा, नोकरी, हस्तव्यवसाय किंवा औद्योगिक व्यवसाय किंवा उप-व्यवसाय ;

व त्यात पुढील बाबींचा समावेश होतो :--

(एक) शेती व शेतीविषयक कामे ;

(दोन) [१][राज्य] शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता उद्योग म्हणून जाहीर करील अशी उद्योगांची कोणतीही शाखा किंवा उद्योगांचा गट ;

(२०) "संयुक्त समिती" म्हणजे कलम ४८ अन्वये रचना केलेली संयुक्त समिती ;

(२१) "कामगार न्यायालय" म्हणजे कलम ९ अन्वये रचना करण्यात आलेले कामगार न्यायालय ;

(२२) "कामगार अधिकारी" म्हणजे या अधिनियमान्वये कामगार अधिकाऱ्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी नेमलेला अधिकारी ; व त्यामध्ये कामगार अधिकाऱ्याचे कोणतेही अधिकार किंवा कर्तव्ये ज्या सहाय्यक कामगार अधिकाऱ्यास प्रदान करण्यात येतील किंवा त्यांच्याकडे सोपविण्यात येतील त्या सहाय्यक कामगार अधिकाऱ्याचा समावेश होतो ;

(२३) "स्थानिक क्षेत्र" म्हणजे या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता [२] [किंवा निरनिराळ्या उद्योगांकरिता] स्थानिक क्षेत्र म्हणून अधिसूचित केलेले [२] [(संपूर्ण राज्य धरून)] कोणतेही क्षेत्र ;

(२४) "टाळेबंदी" म्हणजे जेव्हा मालकाने कामाची कोणतीही जागा किंवा तिचा कोणताही भाग बंद ठेवणे किंवा त्याने काम सर्वस्वी किंवा अंशतः निलंबित ठेवणे किंवा त्याने कामावर लावलेल्या व्यक्तीस कामावर चालू ठेवण्याचे सर्वस्वी किंवा अंशतः नाकारणे, ही गोष्ट जेव्हा औद्योगिक विवादामुळे घडलेली असेल व ती पुढील प्रयोजनासाठी म्हणजेच--

(अ) अशा रीतीने काम बंद ठेवणे, निलंबित ठेवणे किंवा असा नकार देणे यांपासून ज्यांना प्रत्यक्ष बाधा पोहोचलेली आहे अशा कामगारांना किंवा मालकाच्या इतर कोणत्याही कामगारांना कामासंबंधी कोणतीही अट किंवा शर्त स्वीकारण्यास भाग पाडण्यासाठी, अथवा

(ब) कोणत्याही इतर मालकास त्याने कामावर ठेवलेल्या व्यक्तीस कामासंबंधी कोणतीही अट किंवा शर्त स्विकारण्यास भाग पाडण्याच्या कामी मदत करण्यासाठी योजलेली असेल तेव्हा--

मालकाने अशा प्रकारे कामाची कोणतीही जागा किंवा कोणताही भाग बंद ठेवणे किंवा त्याने काम सर्वस्वी किंवा अशंतः बंद ठेवणे किंवा त्याने कामावर लावलेल्या व्यक्तीस कामावर चालू ठेवण्याचे सर्वस्वी किंवा अंशतः नाकारणे ;

(२५) "सदस्य" म्हणजे जी एखाद्या संघाची साधारण सदस्य असून [३][प्रत्येक कॅलेंडर महिन्यास] [४][पंचवीस पैसे] यापेक्षा कमी नसेल इतकी वर्गणी देत असेल अशी व्यक्ती :

---

१ सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ४ (क) (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२ वरील अधिनियमाच्या कलम ४ (क) (दोन) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

३ सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम २ (२) (अ) अन्वये, "प्रत्येक महिन्यास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ४ (ड) (एक) अन्वये, "दोन आणे" या शबदांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

परंतु जर कोणत्याहीवेळी एखाद्या व्यक्तीची [१][अशा वेळेच्या निकटपूर्वीच्या सहा महिन्यांच्या कालावधीत तीन कॅलेंडर महिन्यापेक्षा अधिक कालावधीची] वर्गणी थकलेली असेल तर, अशा व्यक्तीस सदस्य समजण्यात येणार नाही ;

[२][**स्पष्टीकरण.**--जर एखाद्या विवक्षित कॅलेंडर महिन्याची वर्गणी ज्या कॅलेंडर महिन्याच्या संबंधात ती देणे असेल त्या कॅलेंडर महिन्याच्या अखेरपर्यंत देण्यात आली नाही तर, अशी वर्गणी, या खंडाच्या प्रयोजनाकरिता, थकलेली वर्गणी आहे असे मानले जाईल] ;

(२६) "व्यवसाय" म्हणजे कलम ११ अन्वये व्यवसाय म्हणून मान्यता दिलेल्या उपक्रमाचा विभाग ;

(२७) "विहित" म्हणजे या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले ;

(२८) "प्राथमिक संघ" म्हणजे या अधिनियमान्वये प्राथमिक संघ म्हणून त्या त्या वेळी नोंदण्यात आलेला संघ ;

(२९) "अर्ह संघ" म्हणजे या अधिनियमान्वये अर्ह संघ म्हणून त्या त्या वेळी नोंदण्यात आलेला संघ ;

(३०) "नोंदणीकृत संघ" म्हणजे या अधिनियमान्वये नोंदणी केलेला संघ ;

(३१) "निबंधक" म्हणजे या अधिनियमान्वये संघाचा निबंधक म्हणून त्या त्या वेळी नेमलेली व्यक्ती व तीत [३][अपर निबंधक, आणि] निबंधकाचे कोणतेही अधिकार किंवा कर्तव्ये ज्या सहाय्यक संघ निबंधकाला देण्यात आले असतील किंवा त्याच्याकडे सोपविण्यात येतील त्या सहाय्यक संघ निबंधकाचा समावेश होईल ;

(३२) "कामगार प्रतिनिधी" म्हणजे कलम ३० अन्वये कामगार प्रतिनिधी म्हणून [४][हजर राहण्याचा किंवा काम करण्याचा] ज्यास हक्क असेल असा कामगारांचा प्रतिनिधी ;

(३३) "प्रातिनिधिक संघ" म्हणजे या अधिनियमान्वये प्रातिनिधिक संघ म्हणून त्या त्या वेळी नोंदण्यात आलेला संघ ;

(३४) "अनुसूची" म्हणजे या अधिनियमास जोडलेली अनुसूची ;

(३५) "मिटवणूक" म्हणजे समेटासंबंधी कोणतीही कार्यवाही चालू असताना घडवून आणलेली मिटवणूक [५][आणि कलम ४४-ब याच्यां प्रयोजनाकरितातीत अयशस्वी झालेल्या समेटासंबंधीची कोणतीही कार्यवाही पूर्ण झाल्याच्या तारखेपासून दोन महिन्याच्या आत घडवून आणलेल्या मिटवणुकीचा समावेश होईल ;]

---

[१] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ४ (ड) (दोन) अन्वये "अशा वेळेच्या निकटपूर्वीच्या तीन कॅलेंडर महिन्याचे किंवा त्याहून अधिक मुदतीची" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम २ (२) (क) अन्वये हे स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ४ (क) अन्वये, हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५, कलम ३ (२) अन्वये "कामे करण्याचा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम २ (३) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[१][३५-अ "कामरोध" म्हणजे एखाद्या उद्योगातील कामगारांनी एकत्र मिळून सर्वस्वी किंवा अंशतः काम बंद करणे किंवा कामगारांनी संगनमत करून किंवा एकविचाराने काम चालू ठेवण्याचे किंवा ते स्वीकारण्याचे नाकारणे ; मग अशा रीतीने काम बंद करणे किंवा नाकारणे ही गोष्ट औद्योगिक विवादामुळे घडलेली असो किंवा नसो ;]

(३६) "संप" म्हणजे एखाद्या उद्योगातील कामगारांनी एकत्र मिळून सर्वस्वी किंवा अंशतः काम बंद करणे किंवा कामगारांनी संगनमत करून किंवा एकविचाराने काम चालू ठेवण्याचे किंवा ते स्वीकारण्याचे नाकारणे--जेव्हा अशा रीतीने काम बंद करणे किंवा नाकारणे ही गोष्ट औद्योगिक विवादामुळे घडलेली असेल तेव्हा ;

(३७) "उपक्रम" म्हणजे कलम ११ अन्वये निबंधकाने मान्यता दिलेली कोणत्याही उद्योगातील प्रसंस्था ;

१९२६ चा १६. (३८) "संघ" म्हणजे भारतीय कामगार संघ अधिनियम, १९२६ अन्वये नोंदण्यात आलेला कामगार संघ ;

[२][३८-अ "वेतन मंडळ" म्हणजे, कलम ८६-अ अन्वये रचना करण्यात आलेले वेतन मंडळ ;]

(३९) "वेतन" म्हणजे पैशाच्या रुपात दर्शविता येण्याजोगे व कामगारास त्याच्या नोकरीबद्दल किंवा अशी नोकरी करीत असताना केलेल्या कोणत्याही कामाबद्दल देण्याजोगे सर्व प्रकारचे पारिश्रमिक व त्यात पुढील गोष्टींचा समावेश होतो :--

(एक) कोणताही अधिलाभांश, भत्ते (महागाई भत्ता धरून), बक्षीस किंवा जादा पारिश्रमिक ;

(दोन) कोणतीही घराची सोय, दिवाबत्ती, पाणी, वैद्यकीय मदत किंवा इतर सुखसोय अथवा सेवा यांचे मूल्य ;

(तीन) कोणत्याही निवृत्तिवेतन निधीसाठी किंवा भविष्य निर्वाह निधीसाठी मालकाने दिलेले कोणतेही अंशदान ;

(चार) कोणताही प्रवास भत्ता किंवा कोणत्याही प्रवास सवलतीचे मूल्य ;

(पाच) कामगाराच्या नोकरीच्या स्वरुपामुळे त्यावर पडणारा विशेष खर्च भागविण्यासाठी त्यास दिलेली किंवा त्यास अथवा त्याच्याखातर देय असलेली कोणतीही रक्कम

[३][(सहा) कोणतेही उपदान देय असल्यास, ते]

## प्रकरण दोन

## या अधिनियमान्वये रचना करावयाची प्राधिकरणे किंवा नेमावयाचे प्राधिकारी

**४.** (१) [४][राज्य] शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे एखाद्या व्यक्तीची कामगार आयुक्त म्हणून नेमणूक करील. कामगार आयुक्त.

(२) [४][राज्य] शासनास **शासकीय राजपत्रातील** सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे कोणत्याही व्यक्तीस साधारणपणे किंवा कोणत्याही स्थानिक क्षेत्रासाठी कामगार आयुक्तांचे सर्व किंवा कोणतेही अधिकार प्रदान करता येतील किंवा त्याची सर्व कोणतीही कर्तव्ये अशा व्यक्तीकडे सोपविता येतील.

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम २ (क) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३, कलम २ अन्वये, हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ४ (फ) अन्वये, हा उपखंड दाखल करण्यात आला.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

निबंधक [3][अपर निबंधक] व सहायक निबंधक.

५. (१) [1][राज्य] शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे एखाद्या व्यक्तीची, [2][संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी] संघ निबंधक म्हणून नेमणूक करील.

[4][(१-अ) राज्य शासनाला, तशाच अधिसूचनेद्वारे, संपूर्ण राज्यासाठी किंवा त्याच्या कोणत्याही स्थानिक क्षेत्रासाठी एक किंवा अधिक अपर संघ निबंधक यांची नेमणूक करता येईल. अपर संघ निबंधक या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये राज्य शासनास याबाबतीत **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करता येईल अशा, निबंधकाच्या अधिकारांचा वापर करील व त्याची कर्तव्ये पार पाडील.

(१-ब) राज्य शासनास सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे याबाबतीत विनिर्दिष्ट करता येईल अशा बाबींच्या संबंधात असेल ते खेरीज करून एरव्ही अपर निबंधक हा निबंधकास दुय्यम असणार नाही.]

(२) [1][राज्य] शासनास तशाच अधिसूचनेद्वारे, एखाद्या व्यक्तीची कोणत्याही स्थानिक क्षेत्राकरीता सहाय्यक संघ निबंधक म्हणून नेमणूक करता येईल, आणि सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे या अधिनियमान्वये संघ निबंधकाला असलेले सर्व किंवा कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करता येतील.

समेटकर्ता.

६. (१) [1][राज्य] शासन, एखाद्या व्यक्तीस मुख्य समेटकर्ता म्हणून नेमील, त्याची अधिकारिता [5][संपूर्ण] [6][महारष्ट्र राज्यभर] असेल.

[7][(१-अ) राज्य शासनास संपूर्ण राज्यासाठी किंवा त्याच्या कोणत्याही स्थानिक क्षेत्रासाठी एक किंवा अधिक अपर मुख्य समेटकर्त्यांची नेमणूक करता येईल. अपर मुख्य समेटकर्ता हा, मुख्य समेटकर्त्यांच्या अधिकारापैकी राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे याबाबातीत विनिर्दिष्ट करील अशा अधिकारांचा वापर करील व अशी त्याची कर्तव्ये पार पाडील.

(१-ब) राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा बाबी खेरीज करून एरव्ही अपर मुख्य समेटकर्ता हा मुख्य समेटकर्त्यास दुय्यम असणार नाही.]

(२) [1][राज्य] शासनास **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही स्थानिक क्षेत्रातील कोणत्याही उद्योगाकरिता कोणत्याही व्यक्तीची समेटकर्ता म्हणून नेमणूक करता येईल.

(३) [1][राज्य] शासनास **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा स्थानिक क्षेत्राकरिता किंवा अशा स्थानिक क्षेत्रातील विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा उद्योगांकरिता किंवा विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा औद्योगिक विवादाकरिता किंवा विवादांच्या वर्गाकरिता कोणत्याही व्यक्तीची विशेष समेटकर्ता म्हणून नेमणूक करता येईल.

---

[1] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[2] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ५ (अ) अन्वये "महाराष्ट्र राज्याच्या सबंध मुंबई क्षेत्रासाठी" या मजकुराऐवजी हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ५ (क) अन्वये हा शब्द दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ५ (ब) अन्वये ही पोट-कलमे समाविष्ट करण्यात आली.

[5] मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ अन्वये "सबंध राज्यावर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ६ (अ) अन्वये "महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्रावर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[7] वरील अधिनियमाच्या कलम ६ (ब) अन्वये ही पोट-कलमे समाविष्ट करण्यात आली.

**७.** (१) एखादा औद्योगिक विवाद उपस्थित होईल तेव्हा, [१][राज्य] शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनाद्वारे अशा विवादाची मिटवणूक करण्यासाठी समेट मंडळाची रचना करता येईल. समेट मंडळ.

(२) मंडळ हे सभापती व सम संख्या असलेल्या सदस्यांचे मिळून बनलेले असेल. सभापती ही स्वतंत्र व्यक्ती असेल. तसेच, प्रत्येक सदस्य हा एकतर स्वतंत्र व्यक्ती असेल किंवा मालक अथवा कामगार यांच्या हितसंबंधाबाबत प्रतिनिधित्व करणाऱ्या तालिकेतून [१][राज्य] शासन निवडील अशी व्यक्ती असेल, मात्र मालकांचे प्रतिनिधित्व करणऱ्या तालिकांमधून निवडलेल्या व्यक्तींची संख्या व कामगारांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या तालिकामधून निवडलेल्या व्यक्तींची संख्या ही समान असेल. अशा मंडळांची विहित केलेल्या रीतीने रचना करण्यांत येईल.

(३) मंडळाचे काम पुरे होण्यापूर्वी मंडळाच्या सभापतीची किंवा सदस्याची जागा रिकामी झाली तर अशी रिकामी जागा विहित रीतीने भरण्यात येईल आणि जागा रिकामी झाल्याच्या वेळी कार्यवाही ज्या टप्प्यावर असेल त्या टप्प्यावर ती याप्रमाणे फेररचना केलेल्या मंडळापुढे चालू ठेवण्यात येईल.

**स्पस्टीकरण.**--ज्या विवादाच्या मिटवणुकीसाठी मंडळाची रचना करण्यात आली असेल त्या विवादाशी आणि विवादाची प्रत्यक्ष बाधा पोहोचलेल्या उद्योगांशी ज्या व्यक्तीचा काही एक संबंध नसेल ती व्यक्ती या कलमाच्या प्रयोजनाकरिता स्वतंत्र व्यक्ती आहे, असे समजण्यात येईल.

**८.** (१) [१][राज्य] शासनास **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कोणत्याही एक वा अनेक स्थानिक क्षेत्रांकरिता कामगार अधिकारी नेमता येतील. कामगार अधिकारी व सहायक कामगार अधिकारी.

(२) [१][राज्य] शासनास तशाच अधिसूचनाद्वारे, कोणत्याही एक किंवा अनेक स्थानिक क्षेत्रांकरिता सहायक कामगार अधिकारी नेमता येईल. तसेच सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, या अधिनियमाखालील कामगार अधिकाऱ्याचे सर्व किंवा कोणतेही अधिकार सहायक कामगार अधिकाऱ्यास प्रदान करता येतील.

**९.** [१][राज्य] शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, एक किंवा अधिक कामगार न्यायालयांची रचना करील व अशा न्यायालयांच्या अधिकारितेखाली, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी स्थानिक क्षेत्रे असतील. तसेच [१][राज्य] शासन, अशा न्यायालयांचा न्यायाधीश म्हणून काम करण्यास [२][पुढील अर्हता असलेल्या] व्यक्तीची नेमणूक करील :-- कामगार न्यायालये.

[३][(अ) कोणत्याही व्यक्तीने भारतात, पाच वर्षांहून कमी नाही इतक्या कालावधीपर्यंत कोणतीही न्यायिक अधिकारपत्र धारण केले असल्याखेरीज, किंवा

(ब) तिने अधिवक्ता किंवा न्याय प्रतिनिधी म्हणून, उच्च न्यायालयात किंवा त्याला दुय्यम असलेल्या कोणत्याही न्यायालयात, किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याअन्वये रचना करण्यात आलेल्या कोणत्याही औद्योगिक न्यायालयात, न्यायाधिकरणात किंवा कामगार न्यायालयात सात वर्षांहून कमी नाही इतक्या कालावधीपर्यंत काम केले असल्याखेरीज, किंवा

(क) ती भारतातील कोणत्याही भागात, कायद्याअन्वये रचना केलेल्या विद्यापीठाची कायद्याची पदवी धारण करीत असल्याखेरीज किंवा अशा कोणत्याही औद्योगिक न्यायालयाच्या किंवा न्यायाधिकरणाच्या उप-प्रबंधकाच्या किंवा राज्य शासनाच्या अधीन असलेल्या सहायक कामगार आयुक्ताच्या दर्जापेक्षा खालच्या दर्जाचे नसलेले पद, दोन्ही बाबतीत पाच वर्षांहून कमी नसेल इतक्या कालावधीपर्यंत, धारण करीत असल्याखेरीज किंवा धारण केले असल्याखेरीज ;

कामगार न्यायालयाचा पीठासीन अधिकारी म्हणून नेमला जाण्यास अर्ह असणार नाही.]

---

[१] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ३ (१) अन्वये "विहित केलेल्या अर्हता" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३ (२) अन्वये परंतुकाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

औद्योगिक न्यायालय.

१०. (१) [1][राज्य] शासन औद्योगिक लवाद न्यायालयाची रचना करील.

(२) औद्योगिक न्यायालय हे तीन किंवा अधिक सदस्यांचे मिळून बनलेले असेल ; त्यापैकी एक सदस्य अशा न्यायालयाचा अध्यक्ष असेल.

(३) औद्योगिक न्यायालयाचा प्रत्येक सदस्य हा, [2][जिचा अशा न्यायालयाकडे निर्देशित केलेल्या औद्योगिक विवादाशी किंवा अशा विवादाची प्रत्यक्ष बाधा पोहोचलेल्या कोणत्याही उद्योगाशी संबंध नसेल अशी व्यक्ती असेल ;

परंतु, कोणतीही व्यक्ती कायद्याने स्थापन झालेल्या ज्या कंपनीचा अशा औद्योगिक विवादाशी संबंध आहे किंवा त्यामुळे तिच्यावर परिणाम होण्याचा संभव आहे, अशा कंपनीची, केवळ भागधारक आहे याच कारणामुळे तिचा औद्योगिक विवादाशी किंवा उद्योगाशी संबंध आहे असे मानण्यात येणार नाही ; परंतु अशा बाबतीत ती व्यक्ती अशा कंपनीत तिने धारण केलेल्या शेअर्सचे स्वरूप व त्यांची व्याप्ती ही, राज्य शासनाला कळवील.]

(४) औद्योगिक न्यायालयाचा प्रत्येक सदस्य हा, जी व्यक्ती उच्च न्यायालयाचा न्यायाधीश असेल किंवा झालेली असेल अथवा अशा न्यायालयाचा न्यायधीश म्हणून नेमली जाण्यास जी पात्र असेल अशी व्यक्ती असेल :

[3][परंतु--

(अ) जी व्यक्ती, तीन वर्षापेक्षा कमी नसेल अशा कालावधीत, सहायक न्यायाधीशाच्या दर्जापेक्षा खालचा नसेल अशा दर्जामध्ये न्यायधीश असेल ; किंवा

(ब) जी व्यक्ती, पाच वर्षापेक्षा कमी नसेल अशा कालावधीत, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याअन्वये रचना करण्यात आलेल्या कामगार न्यायालयात पीठासीन अधिकार असेल ; किंवा

(क) जी व्यक्ती, भारतातील कोणत्याही भागात, कायद्याद्वारे स्थापन करण्यात आलेल्या विद्यापीठाची कायद्याची पदवी धारण करीत असेल आणि जी दहा वर्षापेक्षा कमीं नसेल अशा कालावधीसाठी राज्य शासनाच्या अधीन असलेले सहायक कामगार आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी नसेल अशा दर्जामध्ये अधिकारपद धारण करीत असेल किंवा केलेले असेल ;

अशी व्यक्ती देखील औद्योगिक न्यायालयाचा सदस्य म्हणून नेमली जाण्यास पात्र असेल :

परंतु आणखी असे की, अशा प्रकारे पात्र नसलेल्या एखाद्या व्यक्तीपाशी औद्योगिक विषयांतील तज्ञ म्हणून असलेले ज्ञान आहे, असे राज्य शासनाचे मत असेल तर तिला औद्योगिक न्यायालयाचा एक सदस्य होता येईल.]

## प्रकरण तीन

## संघाची नोंदणी

उपक्रम व व्यवसायांना मान्यता देणे.

**११.** निबंधकास त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता,-

(१) उद्योगातील कोणत्याही प्रसंस्थेस उपक्रम म्हणून ;

(२) उपक्रमाच्या कोणत्याही विभागास व्यवसाय म्हणून ;

मान्यता देता येईल.

---

[1] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[2] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३५, कलम २ अन्वये "ज्याचा कोणत्याही उद्योगधंद्याशी संबंध नाही असा इसम असला पाहिजे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला व तो नेहमीकरिता दाखल करण्यात आल्याचे समजण्यात येईल.

[3] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ४ अन्वये मूळ परंतुकाऐवजी ही परंतुके दाखल करण्यात आली.

१२. निबंधाकाने, विहित करण्यात येतील अशा नमुन्यांमध्ये,-- नोंदवह्या व मान्यताप्राप्त संघाची यादी ठेवणे.

(अ) या अधिनियमाच्या तरतुदीअनुसार त्याने नोंदणी केलेल्या संघाच्या नोंदवह्या, आणि

(ब) मान्यताप्राप्त संघांची यादी ठेवणे,

हे त्याचे कर्तव्य असेल.

१३. (१) [1][ ज्या कॅलेंडर महिन्यात या कलमान्वये अर्ज करण्यात आला असेल त्या कॅलेंडर महिन्याच्या निकटपूर्वीच्या तीन महिन्यांच्या अवधीत] कोणत्याही स्थानिक क्षेत्रातील कोणत्याही उद्योगात कामावर लावलेल्या कामगाराच्या एकंदर संख्येच्या [2][ शेकडा पंचवीसहून कमी नाहीत] इतके ज्या संघाचे सदस्य असतील अशा कोणत्याही संघास अशा स्थानिक क्षेत्रातील अशा उद्योगाचा प्रतिनिधिक संघ म्हणून नोंदणी होण्यासाठी विहित केलेल्या नमुन्यात निबंधकाकडे अर्ज करता येईल. नोंदणीसाठी अर्ज.

(२) जर कोणत्याही स्थानिक क्षेत्रात एखाद्या उद्योगाच्या बाबतीत कोणत्याही प्रतिनिधिक संघ नोंदण्यात आल नसेल तर, [1][ ज्या कॅलेंडर महिन्यात या कलमान्वये अर्ज करण्यात आला असेल त्या कॅलेंडर महिन्याच्या निकटपूर्वीच्या तीन महिन्यांच्या अवधीत] ज्या संघाचे अशा स्थानिक क्षेत्रातील अशा उद्योगात कामावर लावलेल्या कामगाराच्या एकंदर संख्येच्या शेकडा पाचहून कमी नाहीत इतके सदस्य असतील अशा संघास, अशा स्थानिक क्षेत्रातील अशा उद्योगाचा अर्हताप्राप्त संघ म्हणून नोंदणी होण्यासाठी विहित केलेल्या नमुन्यात निबंधकाकडे अर्ज करता येईल.

(३) जर कोणत्याही स्थानिक क्षेत्रात एखाद्या उद्योगाच्या बाबतीत प्रतिनिधिक संघ किंवा अर्ह संघ नोंदवण्यात आला नसेल तर ज्या संघाचे उक्त क्षेत्रातील अशा उद्योगाच्या कोणत्याही उपक्रमात कामावर लावलेल्या कामगाराच्या एकंदर संख्येच्या शेकडा पंधराहून कमी नाहीत, इतके सदस्य असतील व ज्या संघाने मान्यताप्राप्त संघाच्या यादीत दाखल होण्यासाठी आवश्यक म्हणून कलम २३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्ती पूर्ण केल्या असतील अशा संघास अशा स्थानिक क्षेत्रातील अशा उद्योगाचा प्राथमिक संघ म्हणून नोंदणी होण्यासाठी विहित नमुन्यात निबंधकाकडे अर्ज करता येईल.

[3][(४) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, जर एखादा संघ यथास्थिति, प्रतिनिधिक संघ म्हणून, अर्ह संघ म्हणून किंवा प्राथमिक संघ म्हणून नोंदणीसाठी नवीन अर्ज करील तर, अशा नोंदणीसाठी पूर्वी करण्यात आलेला अर्ज निबंधकाकडून अंतिमरित्या निकालात काढण्यात येईतोपर्यंत निबंधकाने असा अर्ज स्वीकारता कामा नये.]

१४. कलम १३ अन्वये नोंदणीसाठी संघाकडून अर्ज मिळाल्यावर व विहित फी भरण्यात आल्यावर निबंधक, योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, अशा निष्कर्षाप्रत आला की, उक्त कलमात विनिर्दिष्ट केलेल्या नोंदणीसाठी आवश्यक असलेल्या शर्ती पुऱ्या झाल्या आहेत आणि संघ नोंदणी केला जाण्यास इतर दृष्टीने निरर्ह नाही तर, तो संघाचे नाव कलम १२ अन्वये ठेवलेल्या योग्य त्या नोंदवहीत दाखल करील व विहित करण्यात येईल, अशा नमुन्यात नोंदणीचे प्रमाणात देईल :

परंतु,--पहिले असे की, कोणत्याही स्थानिक क्षेत्रात एकाच उद्योगाच्या बाबतीत एकाहून अधिक नोंदणीकृत संघ असता कामा नयेत :

दुसरे असे की, कोणत्याही स्थानिक क्षेत्रात एखाद्या उद्योगाच्या बाबतीत प्रातिनिधिक संघ म्हणून नोंदणी होण्यासाठी आवश्यक असलेल्या शर्ती पुऱ्या करणारा संघ व अशा शर्ती पुऱ्या न करणारा संघ या दोहोंमध्ये शर्ती पुऱ्या करणाऱ्या संघास पसंतीक्रम देऊन निबंधक त्याची नोंदणी करील आणि शर्ती

---

[1] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम ३ अन्वये "अर्ज केल्याच्या तारखेच्या लगत पूर्वीच्या तीन महिन्याच्या सबंध मुदतीत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ७-अ अन्वये "शेकडा पंधराहून कमी नाही" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ७ (ब) अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

पुऱ्या करणारा असा संघ नसल्यास, अर्ह संघ म्हणून नोंदणी होण्यास आवश्यक असलेल्या शर्ती पुऱ्या करणारा संघ व अशा शर्ती पुऱ्या न करणारा संघ या दोहोंमध्ये शर्ती पुऱ्या करणाऱ्या संघास पसंतीक्रम देऊन निबंधक त्याची नोंदणी करील :

तिसरे असे की, जेव्हा कोणत्याही स्थानिक क्षेत्रातील एकाच उद्योगाच्या बाबतीत, नोंदणी होण्यास आवश्यक असलेल्या शर्ती पुऱ्या करणारे दोन किंवा अधिक संघ नोंदणीसाठी [१] [एकाच कॅलेंडर महिन्यात]अर्ज करतील तेव्हा दुसऱ्या परंतुकाच्या तरतुदींच्या अधीनतेने [२][त्यांनी ज्या कॅलेंडर महिन्यात अर्ज केला असेल त्या कॅलेंडर महिन्याच्या तीन महिन्याच्या कालावधीत] अशा उद्योगात कामावर लावलेल्या कामगारापैकी जास्तीत जास्त कामगार ज्या संघाचे सदस्य असतील अशा संघाची नोंदणी करण्यात येईल; [३][आणि एकाच कॅलेंडर महिन्यात प्रथम मिळालेले अर्ज निबंधकाकडून निकालात काढले जाईपर्यंत नंतरच्या कोणत्याही महिन्यात नोंदणीसाठी आलेले कोणतेही अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.]

चौथे असे की, एखाद्या संघाच्या नोंदणीसाठी केलेला अर्ज कामगारांच्या हितासाठी सद्‌भावपूर्वक केलेला नसून तो कामगारांच्या हितास बाधक होईल अशाप्रकारे मालकाच्या हितासाठी केलेला आहे अशी निबंधकाची खात्री झाल्यास निबंधकाने अशा संघाची नोंदणी करता कामा नये:

[४][पाचवे असे की, ज्या कोणत्याही संघाने नोंदणीसाठी केलेल्या अर्जाच्या तारखेच्या निकटपुर्वीच्या सहा महिन्यांत किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी, जो संप किंवा कामरोध करण्याचे जे कृत्य बेकायदेशीर ठरविण्यात किंवा घोषित करण्यात आले असा संप किंवा कामरोध सुरु करण्यास किंवा चालू ठेवण्यास चिथावणी दिलेली असेल किंवा मदत केली असेल किंवा सहाय्य केलेले असेल अशा कोणत्याही संघाची निबंधकाने नोंदणी करता कामा नये :

सहावे असे की, कोणत्याही संघाच्या सदस्यत्वासंबंधीच्या नियमांत, संबंधित उद्योगात कामावर असलेल्या कामगाराला, तो अशा उद्योगातील एखाद्या विशिष्ट उपक्रमातील कामगार आहे किंवा नाही या कारणावरून अशा संघाचा सदस्य होण्यास मनाई करणारी कोणतीही तरतूद असेल तर अशा संघाची निबंधकाने नोंदणी करता कामा नये.] १९२६ चा १६.

नोंदणी रद्द करणे.

१५. निबंधक पुढील बाबतीत संघाची नोंदणी रद्द करील :-

(अ) अशा संघाची नोंदणी रद्द करण्याबद्दल औद्योगिक न्यायालयाने निदेश दिल्यास;

(ब) [५][अशा संघास, त्याची नोंदणी रद्द कां करू नये याविषयी कारण दाखविण्याबाबत नोटीस दिल्यानंतर आणि] निबंधकाला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर,--

(एक) असा संघ चुकीने, अपवेदनामुळे किंवा कपटाने नोंदण्यात आला होता; किंवा

(दोन) संघाच्या सदस्यांची संख्या लागोपाठ तीन [६][कॅलेंडर] महिन्यांच्या कालावधीत कलम १३ अन्वये तिच्या नोंदणीसाठी आवश्यक असलेल्या किमान संख्येतून कमी झालेली आहे:

---

[१] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ८ (अ) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ८ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ८ (क) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम ८ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[५] सन १९६३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६२, कलम ४ (१) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[६] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम ४ (२) अन्वये "महिन्याच्या " या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु एखाद्या क्षेत्रातील कोणत्याही उद्योगात कोणत्याही कॅलेंडर महिन्यात चौदा दिवसांहून अधिक अशा कालावधीपर्यंत एखादा संघ किंवा कामबंदी चालू राहिली असेल व असा संप किंवा कामबंदी या अधिनियमान्वये बेकायदेशीर नसून त्यात अशा उद्योगातील एक तृतीयांशाहून अधिक कामगारांचा संबंध आलेला असेल तर, उक्त तीन महिन्याचा कालावधी मोजताना असा महिना वगळण्यात येईल :

परंतु आणखी असे की, [१][ज्या कॅलेंडर महिन्यात कारण दाखविण्यासंबंधीची नोटीस या कलमान्वये देण्यात आली असेल त्या महिन्यात] संघाच्या सदस्यांची संख्या अशा किमान संख्येहून कमी असल्याखेरीज अशा संघाची नोंदणी या उप-खंडाच्या तरतुदीअन्वये रद्द करता येणार नाही ; किंवा

(तीन) नोंदणीकृत संघ हा प्राथमिक संघ असून नोंदणी केल्यानंतर त्याने कलम २३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तीपैकी कोणतीही एखादी शर्त पाळण्यात कसूर केली असेल ; किंवा

(चार) नोंदणीकृत संघ हा कामगारांच्या हितासाठी चालविण्यात येत नसून तो कामगारांच्या हितास बाधक होईल अशा प्रकारे मालकांच्या हितासाठी चालविण्यात येत असेल ; किंवा

(पाच) [२][जो संप किंवा कामरोध बेकायदेशीर म्हणून ठरविण्यात किंवा जाहीर करण्यात आलेला असेल असा संप किंवा असा कामरोध] सुरू करण्यात किंवा चालू ठेवण्यात त्याने चिथावणी दिली आहे, मदत दिली आहे किंवा सहाय्य केले आहे ;

अशी निबंधकाची खात्री होईल तर ;

१९२६ चा १६. (क) त्याची भारतीय कामगार संघ अधिनियम, १९२६ खालील नोंदणी रद्द करण्यात आली असल्यास.

**विद्यमान नोंदणीकृत संघाच्या जागी दुसऱ्या संघाची नोंदणी करणे**

**१६.** (१) एखाद्या स्थानिक क्षेत्रातील उद्योगात कामाला असलेल्या कामगारांपैकी आपल्याकडील सदस्य संख्या जास्त आहे या कारणासाठी जर कोणत्याही वेळी कोणत्याही संघाने (ज्याचा या कलमात यापुढे "अर्जदार संघ" म्हणून निर्देश करण्यात आला आहे), अशा उद्योगांसाठी आधीच नोंदणीकृत संघाच्या (ज्याचा या कलमात यापुढे "नोंदणीकृत संघ" म्हणून निर्देश करण्यात आला आहे) जागी नोंदणी करण्याकरिता निबंधकाकडे अर्ज केल्यास निबंधक [३][जर नोंदणीकृत संघाची ज्या तारखेस नोंदणी करण्यात आली असेल त्या तारखेपासून दोन वर्षांचा कालावधी लोटलेला असेल तर] नोंदणीकृत संघास एक लेखी नोटीस देऊन अर्जदार संघाची त्याच्या जागी नोंदणी का करू नये याचे कारण, अशी नोटीस मिळाल्यापासून [४][तीस दिवसांच्या] आत दर्शविण्यास फर्मावील. या पोट-कलमान्वये केलेल्या अर्जासोबत विहित करण्यात येईल अशी फी पाठविण्यात येईल :

[५][परंतु संघाचा पूर्वीचा अर्ज निकालात काढल्याच्या तारखेपासून एक वर्षाचा अवधी लोटल्याशिवाय निबंधक संघाच्या नोंदणीसाठी कोणताही अर्ज स्वीकारणार नाही.]

(२) निबंधक अशा अर्जाची व नोटिशीची एक प्रत कामगार अधिकाऱ्याकडे पाठवील.

---

[१] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम ४ (३) अन्वये "नोंदणी रद्द करण्याच्या वेळी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम ४ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ९ (अ) (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम ५ (१) अन्वये "एक महिन्याच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ९ (अ) (दोन) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

(३) पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या नोटीसीचा अवधी संपल्यावर निबंधकाची, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर अशी खात्री होईल की, अर्जदार संघ कलम १३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नोंदणीसाठी आवश्यक असलेल्या शर्ती पुऱ्या करीत आहे आणि [१][ज्या कॅलेंडर महिन्यात त्याने या कलमान्वये अर्ज केला असेल त्या महिन्यापूर्वीच्या निकटपूर्वीच्या तीन कॅलेंडर महिन्यांत] त्याच्या सदस्यांची संख्या नोंदणीकृत संघाच्या सदस्याच्या संख्येहून अधिक होती, तर कलम १४ च्या तरतुदींच्या अधिनतेने निबंधक नोंदणीकृत संघाच्या जागी अर्जदार संघाची नोंदणी करील [२][आणि विहित करण्यात येईल अशा नमुन्यात नोंदणी प्रमाणपत्र देईल.]

(४) या कलमान्वये करण्यात आलेला प्रत्येक अर्ज, पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या नोटिशीचा अवधी संपण्यापूर्वी निदान १४ दिवस अगोदर, विहित रीतीने प्रसिध्द करण्यात येईल.

फेर नोंदणीसाठी अर्ज.

**१७.** (१) कोणत्याही संघाची चुकीने नोंदणी करण्यात आली होती या कारणावरुन किंवा कलम १५, खंड (ब), उप-खंड (दोन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारणावरून त्याची नोंदणी रद्द करण्यात आली असेल तर अशा संघास अशा रीतीने नोंदणी रद्द झाल्याच्या तारखेपासून तीन महिन्यानंतर व विहित करण्यात येईल अशी फी दिल्यानंतर, कोणत्याही वेळी, फेरनोंदणीसाठी अर्ज करता येईल. अशा अर्जाच्या बाबतीत कलमे १३ व१४ यांच्या तरतुदी लागू असतील.

(२) ज्या संघाची नोंदणी इतर कोणत्याही कारणावरून रद्द करण्यात आली असेल त्या संघास [३][राज्य] शासनाची परवानगी असेल तेवढे सोडून एरव्ही फेरनोंदणीसाठी अर्ज करण्याचा हक्क असणार नाही.

नोंदणी रद्द झाल्याने संघाची किंवा सदस्याची दायित्वातून मुक्तता होत नाही.

**१८.** त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, संघाची नोंदणी रद्द झाल्याने, अशी नोंदणी रद्द होण्यापूर्वी या अधिनियमान्वये झालेली कोणतीही शास्ती किंवा ओढवलेले कोणतेही दायित्व यातून अशा संघाची किंवा त्याच्या कोणत्याही सदस्यांची मुक्तता होणार नाही.

नियतकालिक विवरणपत्रे निबंधकाना सादर करणे.

**१९.** प्रत्येक नोंदणीकृत संघ विहित करण्यात येतील अशा तारखांस व विहित करण्यात येईल अशा रीतीने आपल्या सदस्यांची संख्या दर्शविणारी नियतकालिक विवरणपत्रे निबंधकाला सादर करील.

[४] * * * निबंधकाने दिलेल्या आदेशावर औद्योगिक न्यायालयाकडे अपील.

**२०.** (१) निबंधकापुढे चालू असलेल्या कार्यवाहीतील कोणत्याही पक्षकारास या प्रकरणान्वये निबंधकाने दिलेल्या कोणत्याही आदेशाविरूध्द अशा आदेशाच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत औद्योगिक न्यायालयाकडे अपील करता येईल :

परंतु, औद्योगिक न्यायालयास पुरेसा करणास्तव असा कालावधी संपल्यानंतर केलेले कोणतेही अपील दाखल करून घेता येईल.

---

[१] सन १९६३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम (५) (२) अन्वये "अर्ज केल्याच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या तीन महिन्यांच्या मुदतीत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ९ (ब) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[३] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम १० अन्वये "नोंदणी रद्द करण्याबाबत" हे शब्द वगळण्यात आले.

(२) अपिलाचे ज्ञापन व ज्याविरूध्द अपील करण्यात आले असेल तो निर्णय याच्या अवलोकनानंतर औद्योगिक न्यायालयास जर असे आढळून आले की, दिलेला निर्णय कायद्याच्या उलट किंवा अन्यथा चुकीचा आहे तर, पोट-कलम (१) अन्वये सादर केलेले अपील दाखल करून घेता येईल.

(३) औद्योगिक न्यायालयास निबंधकाने दिलेला कोणताही आदेश अपिलात कायम करता येईल, त्यात फेरफार करता येईल किंवा तो विखंडित करता येईल व त्यास योग्य वाटतील असे परिणामरूप आदेश देता येतील, औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या आदेशांची एक प्रत निबंधकाकडे पाठविण्यात येईल.

आदेश प्रसिध्द करणे.

**२१.** कलम १४, १५ किंवा १६ अन्वये दिलेला प्रत्येक आदेश व कलम २० अन्वये अपिलात दिलेला प्रत्येक आदेश विहित रीतीने प्रसिध्द करण्यात येईल.

एकाहून अधिक स्थानिक क्षेत्रांकरिता संघाची नोंदणी.

**२२.** या प्रकरणाचा पूर्ववर्ती तरतुदीच्या अधीनतेने कोणत्याही संघाची एखाद्या उद्योगाच्या संबंधाने एकापेक्षा अधिक क्षेत्रांकरिता विहित रीतीने नोंदणी करता येईल.

## प्रकरण चार

### मान्यताप्राप्त संघ

मान्यताप्राप्त संघाची यादी, ती चालू ठेवणे, तीत नावे दाखल करून घेण्याच्या शर्ती.

**२३.** (१) एखाद्या संघाने मान्यताप्राप्त संघाच्या यादीत नाव दाखल करून घेण्यासाठी विहित नमुन्याप्रमाणे अर्ज केल्यावर निबंधकाला त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर आणि संघाने नियम केलेले असून अशा नियमांच्या तरतुदींचे संघाकडून योग्य रीतीने पालन करण्यात येत आहे व अशा नियमात पुढीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे, अशी त्यांची खात्री झाल्यास, अशा संघाचे नाव अशा यादीत दाखल करता येईल--

(एक) संघाच्या सदस्यत्वासाठी असणारी वर्गणी दरमहा [1][पन्नास पैशापेक्षा] कमी असणार नाही ;

(दोन) त्यांच्या कार्यकारी समितीची सभा कमीत कमी तीन महिन्यांच्या अंतराने भरेल ;

(तीन) त्यांच्या कार्यकारी समितीने किंवा अधिमंडळाने संमत केलेले सर्व ठराव त्या प्रयोजनासाठी ठेवलेल्या कार्यवृत्त पुस्तकात नोंदण्यात येतील ;

(चार) शासनाने नेमलेल्या लेखापरीक्षकास प्रत्येक वित्तीय वर्षात निदान एकदा तरी संघाच्या लेख्यांची तपासणी करता येईल ;

(पाच) ज्या औद्योगिक विवादाची मिटवणूक समेटाद्वारे घडून आली नसेल अशा प्रत्येक औद्योगिक विवाद लवादासाठी सादर करण्यात येईल आणि प्रकरण ११ अन्वये तरतूद केलेली लवादी कोणत्याही विवादात नाकारता येणार नाही ;

---

[1] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ११ (अ) (एक) अन्वये "चार आण्यांपेक्षा" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

(सहा) या अधिनियमान्वये किंवा तदनुसार एखाद्या औद्योगिक विवादाची मिटवणूक करण्यासाठी तरतूद करण्यात आलेले सर्व उपाय करून संपलेले असल्याशिवाय [१][किंवा कलम ९७, पोट-कलम (१), खंड (ह) याच्या परंतुकात उललेख केलेली परिस्थिती असल्याशिवाय] व संघाच्या सदस्यांपैकी बहुसंख्य सदस्यांनी गुप्त मतदान पध्दतीने अशा संपास अनुकूल मत दिलेले असल्याशिवाय संघाकडून कोणताही [२][संप मंजूर करण्यात येणार नाही, संपाचा अवलंब करता येणार नाही किंवा त्यास पाठिंबा देण्यात येणार नाही].

[३][(सात) या अधिनियमान्वये जो कोणताही कामरोध बेकायदेशीर असेल तो करण्यात येणार नाही, [४][त्याचा अवलंब करण्यात येणार नाही किंवा त्यास पाठिंबा देण्यात येणार नाही].

[५][(आठ) "मंद गतीने काम" मंजूर करण्यात येणार नाही, त्याचा अवलंब करण्यात येणार नाही किंवा त्यास पाठिंबा देण्यात येणार नाही] :

परंतु, एखादा संघ खराखुरा सदस्याच्या हितासाठी नव्हे तर त्यांच्या हितास बाधक होईल अशा प्रकारे चालविला जात आहे, अशी निबंधकाची खात्री झाल्यास तो त्या संघास मान्यताप्राप्त संघाच्या यादीत दाखल करणार नाही :

[६][परंतु आणखी असे की,--

(अ) संघाने मान्यताप्राप्त यादीत नोंदणी करण्यासाठी पूर्वी केलेला अर्ज निबंधकाकडून अंतिमरित्या निकालात काढण्यात येईपर्यंत, निबंधक कोणत्याही संघाचा नवीन अर्ज स्वीकारणार नाही ;

(ब) जेव्हा कोणत्याही स्थानिक क्षेत्रातील एकाच उद्योगाच्या बाबतीत, मान्यताप्राप्त यादीत नोंदणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या शर्ती पूर्ण करणारे दोन किंवा अधिक संघ एकाच कॅलेंडर महिन्यात अर्ज करतील तेव्हा, ज्या कॅलेंडर महिन्यात त्यांनी अर्ज केला असेल त्या महिन्याच्या निकटपूर्वीच्या कॅलेंडर महिन्यात त्या उद्योगातील अधिकतर कामगार ज्या संघाचे सदस्य असतील त्या संघाची मान्यताप्राप्त संघाच्या यादीत नोंदणी करण्यात येईल ;

(क) पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही संघाकडून कोणताही अर्ज मिळाल्यानंतर, जर इतर कोणताही संघ किंवा इतर कोणतेही संघ त्याच स्थानिक क्षेत्रातील त्याच उद्योगासाठी मान्यताप्राप्त यादीत नोंदणी करण्यासाठी नंतरच्या कोणत्याही कॅलेंडर महिन्यात अर्ज करतील तर, निबंधकाकडून पहिला अर्ज निकालात काढला गेल्याशिवाय असा अर्ज किंवा असे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.]

**स्पष्टीकरण.**--खंड (सहा) च्या प्रयोजनाकरिता "सदस्य" या शब्दाचा अर्थ, भारतीय कामगार संघ अधिनियम, १९२६ याच्या प्रयोजनाकरिता असणारा संघाचा सदस्य. १९२६ चा १६.

---

[१] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ११ (अ) (दोन) (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ११ (अ) (दोन) (अ) अन्वये "संप मंजूर करण्यात येणार नाही अगर संपाचा अवलंब करण्यात येणार नाही" या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम ५ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ११ (अ) (तीन) अन्वये "त्याचा अवलंब करण्यात येणार नाही" या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ११ (अ) (चार) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ११ (अ) (पाच) अन्वये हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

(२) [१][राज्य] शासनास **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असा निदेश देता येईल की, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही संघाच्या किंवा संघाच्या वर्गाच्या बाबतीत सदस्य वर्गणी दरमहा [२][पंचवीस पैसे] या किमान मर्यादेच्या अधीनतेने [२][पन्नास पैशांपेक्षा] कमी ठेवता येईल.

(३) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही स्थानिक क्षेत्रात एखाद्या उद्योगाच्या बाबतीत कोणत्याही वेळी एकाहून अधिक मान्यताप्राप्त संघ असणार नाहीत.

(४) जो कोणताही संघ पोट-कलम (१) यात विनिर्दिष्ट केलेल्या शर्ती पुऱ्या करीत असेल व एखाद्या स्थानिक क्षेत्रातील उद्योगात ज्याचे सदस्य [३][त्या स्थानिक क्षेत्रातील] अशा उद्योगांसाठी असलेल्या मान्यताप्राप्त संघाच्या सदस्यांपेक्षा अधिक असतील त्या संघाने याबाबत अर्ज केला असता त्याचे नाव [४][निबंधक] [५][त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर त्या स्थानिक क्षेत्रातील अशा उद्योगात मान्यताप्राप्त संघापेक्षा अर्ज करणाऱ्या संघाचे, ज्या महिन्यात असा अर्ज करण्यात आला त्या कॅलेंडर महिन्याच्या निकटपूर्वीच्या महिन्यात अधिक सदस्य आहेत अशी त्याची खात्री होईल तर, अशा मान्यताप्राप्त संघाच्या जागी मान्यताप्राप्त संघांच्या यादीत नाव दाखल करील] :

[६][परंतु निबंधक--

(अ) मान्य केलेल्या यादीत मान्यताप्राप्त संघाची नोंदणी झाल्यापासून दोन वर्षाचा कालावधी लोटला असल्याखेरीज असा कोणताही अर्ज ;

(ब) निबंधकाने संघांचा पूर्वीचा अर्ज निकालात काढल्याच्या तारखेपासून एक वर्षाचा अवधी लोटला असल्याखेरीज अशा संघाचा कोणताही नवीन अर्ज,

स्वीकारणार नाही.]

फेरबदल झालेल्या स्थानिक क्षेत्रासाठी मान्यताप्राप्त संघ काही काळ तसाच चालू राहणे.

[७][ **२३. अ.** कलम २३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर एका किंवा अनेक स्थानिक क्षेत्रांत कोणताही फेरबदल झाला असेल तर :--

(अ) फेरबदल झालेल्या एका किंवा अनेक स्थानिक क्षेत्रांमधील एखाद्या उद्योगातील एखादा मान्यताप्राप्त संघ किंवा,

(ब) असा फेरबदल झालेल्या एक किंवा अनेक स्थानिक क्षेत्रांमधील एखाद्या उद्योगातील दोन किंवा अधिक संघ अस्तित्वात असतील तेव्हा, सर्वात अधिक सदस्य असलेला संघ, मग त्याचे सदस्य सर्वात अधिक आहेत- ही गोष्ट इतर मान्यताप्राप्त संघांनी संमत होऊन मान्य केलेली असो किंवा ती निबंधकाने त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर निर्धारित केलेली असो--

फेरबदल झालेल्या एक किंवा यथास्थिति, अनेक स्थानिक क्षेत्रांसाठी, असा फेरबदल ज्या तारखेस अंमलात आला त्या तारखेपासून बारा महिन्यांच्या अवधीपर्यंत किंवा जर असा मान्यताप्राप्त संघ किंवा असा

---

[१] विधि अनुकूल आदेश,१९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ११ (ड) अन्वये हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ११ (क) (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम ६ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[५] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ११ (क) (दोन) अन्वये "त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ११ (क) (तीन) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[७] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम ७ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

फेरबदल झालेल्या एका किंवा अनेक स्थानिक क्षेत्रांतील कोणताही इतर संघ कलम २३ अन्वये अर्ज करील तर, निबंधक असा अर्ज निकालात काढील त्या कालावधीपर्यंत मान्यताप्राप्त संघ आहे असे समजण्यात येईल.]

सन १९४७ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २३ या अन्वये मान्य केलेला संघ हा या अधि-नियमाच्या प्रयोजनासाठी मान्यताप्राप्त संघ राहील.

[1][२३-ब. कलम २३, पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मध्यप्रांत व वऱ्हाड औद्योगिक विवाद मिटवणूक अधिनियम, १९४७ अन्वये कोणत्याही उद्योगाच्या बाबतीत, कोणत्याही स्थानिक क्षेत्रात मान्यताप्राप्त संघ म्हणून नोंदणी करण्यात आलेला कोणताही संघ हा, मुंबई औद्योगिकसंबंध (विस्तार व सुधारणा) अधिनियम, १९६४ अन्वये त्या उद्योगाच्या बाबतीत त्या स्थानिक क्षेत्रासाठी मान्य केलेल्या यादीत नोंदणी करण्यात आलेला मान्यताप्राप्त संघ असल्याचे समजण्यात येईल.]

सन १९४७ चा मध्य प्रांत व वऱ्हाड २३. सन १९६५ चा महा. २२.

मान्यताप्राप्त संघाच्या यादीतून नाव काढून टाकणे.

**२४.** जर एखाद्या संघाची भारतीय कामगार संघ अधिनियम, १९२६ अन्वये झालेली नोंदणी रद्द करण्यात आली असेल तर निबंधक त्या संघाचे नाव मान्यताप्राप्त संघाच्या यादीतून काढून टाकील, तसेच योग्य वाटेल अशी कोणतीही चौकशी करावयाची असल्यास, ती केल्यानंतर निबंधकाची अशी खात्री होईल की,-- सन १९२६ चा १६.

(एक) चुकीने, अपवेदनामुळे किंवा कपट करून अशा संघाचे नाव अशा यादीत दाखल करण्यात आले होते, किंवा

(दोन) मान्यताप्राप्त संघाच्या यादीत त्याचे नाव दाखल करण्यात आल्यापासून त्याने कलम २३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्ती पाळण्यात कसूर केली आहे,

तर त्यास अशा संघाचे नाव अशा यादीतून काढून टाकता येईल :

[2][परंतु, निबंधक, मुंबई औद्योगिक संबंध (विस्तार व सुधारणा) अधिनियम, १९६४ याच्या प्रारंभापासून सहा महिन्याच्या कालावधीपर्यंत अशा प्रारंभापूर्वी मान्यताप्राप्त यादीत नोंदणी करण्यात आलेल्या कोणत्याही संघाचे नाव, अशा संघाने उक्त अधिनियमान्वये कलम २३ मध्ये नवीन दाखल केलेल्या जादा शर्तींचे पालन केले नाही या कारणावरून काढून टाकणार नाही. १९६५ चा महा. २२

व्याख्या.

**स्पष्टीकरण :--**खंड (दोन) च्या प्रयोजनांसाठी कलम २३-ब अन्वये जो संघ मान्यताप्राप्त संघ समजण्यात येत असेल अशा संघाने औद्योगिक संबंध (विस्तार व सुधारणा) अधिनियम, १९६४ याच्या प्रारंभाच्या तारखेपासून सहा महिन्याच्या कालावधीत कलम २३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींसाठी तरतूद करणारे नियम केले नाही तर, त्यामुळे अशा संघाने कलम २३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अटींचे पालन करण्यात कसूर केल्याचे मानण्यात येईल.] १९६५ चा महा. २२

---

[1] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम १२ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १३ अन्वये हे परंतुक व स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

*प्रकरण चार अन्वये निबंधकाच्या आदेशाविरुध्द औद्योगिक न्यायालयाकडे अपील.*

[१][**२४-अ** (१) निबंधकापुढे असलेल्या कार्यवाहीतील कोणत्याही पक्षस, या प्रकरणान्वये निबंधकाने दिलेल्या आदेशाच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत औद्योगिक न्यायालयाकडे अशा आदेशाविरुध्द अपील करता येईल :

परंतु, औद्योगिक न्यायालयास असा कालावधी संपल्यानंतर पुरेशा कारणावरून असे कोणतेही अपील दाखल करून घेता येईल.

(२) औद्योगिक न्यायालयास अपील आणि ज्या निर्णयाविरुध्द अपील केले असेल तो निर्णय यांचे अवलोकन केल्यानंतर जर त्यास असा निर्णय कायद्याच्या उलट दिला असल्याचे किंवा तो अन्यथा चूक असल्याचे दिसून येईल तर त्यास पोट-कलम (१) खालील अपील दाखल करून घेता येईल.

(३) औद्योगिक न्यायालयास अपिलात निबंधकाने दिलेला कोणताही आदेश कायम करता येईल, त्यात फेरफार करता येईल किंवा तो विखंडित करता येईल. तसेच त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे परिणामरूप आदेश देता येतील. औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या आदेशाची एक प्रत निबंधकाकडे पाठविण्यात येईल.]

*मान्यताप्राप्त संघाच्या अधिकाऱ्यांचे हक्क.*

२५. मान्यताप्राप्त [२][राज्य] शासनाने याबाबत केलेल्या नियमांन्वये किंवा नियमांखाली प्राधिकृत करण्यात येतील [३][असे अधिकारी], [४][त्याच्या कार्यालयीन कर्मचारी वर्गातील व्यक्ती] व सदस्य यांस विहित करण्यात येईल अशा रीतीने व विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने पुढील गोष्टी करण्याचा हक्क असेल व त्या करण्यास संबंधित मालक त्यास परवानगी देईल :--

(अ) सदस्यांनी संघास द्यावयाच्या रकमा, ज्या परिवस्तूमध्ये त्यांना वेतन देण्यात येते त्या परिवस्तूमध्ये गोळा करणे ;

(ब) संघाचे सदस्य ज्या उपक्रमांत कामावर असतील त्या उपक्रमांच्या वास्तूमध्ये सूचनाफलक लावणे किंवा लावण्याची तजवीज करणे व त्यावर नोटीस लावणे किंवा लावण्याची तजवीज करणे ;

(क) औद्योगिक विवादास आळा घालण्यासाठी किंवा तयाची मिटवणूक करण्यासाठी--

(एक) संघाचे सदस्य असलेल्या संबंधित कामगारांशी उपक्रमाच्या परिवास्तूमध्ये चर्चा करणे ;

(दोन) मालकास किंवा त्याने कामासाठी नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीस भेटून त्याच्या उपक्रमात कामावर लावलेल्या संघाच्या सदस्यांच्या गाऱ्हाण्यासंबंधी चर्चा करणे ;

(तीन) संघाचा कोणताही सदस्य कोणत्याही उपक्रमाच्या ज्या कोणत्याही परिवास्तूमध्ये काम करीत असलेल्या परिवास्तूची आवश्यकता असल्यास तपासणी करणे.

*महत्त्वाच्या कार्यवाह्यांमध्ये मान्यताप्राप्त संघास शासकीय खर्चाने कायदेविषयक सहाय्य देणे.*

**२६.** (१) ज्या कोणत्याही मान्यताप्राप्त संघास --

(अ) एखादा संप, टाळेबंदी, [५][कामबंदी, कामरोध] किंवा बदल बेकायदेशीर आहे किंवा कसे हे ठरविण्यासाठी कामगार न्यायालयापुढे चालू असलेल्या कामकाजात अशा न्यायालयापुढे हजर राहण्याचा हक्क असेल, अथवा

(ब) ज्या कार्यवाहीत औद्योगिक न्यायालयाच्या मते एखादा कायदेविषयक किंवा तथ्यविषयक महत्वाचा प्रश्न उद्भवला असेल त्या कामकाजात अशा न्यायालयापुढे हजर राहण्याचा हक्क असेल ; त्या संघास [२][राज्य] शासनाच्या खर्चाने कायदेविषयक सहाय्य मिळविण्यासाठी अर्ज करता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये केलेल्या प्रत्येक अर्जाची एक प्रत फारसा विलंब न लावता निबंधकाकडे पाठविण्यात येईल.

---

[१] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम १४ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] सन १९४८चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३, कलम ३ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९५३चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम ८ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९४८चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम ६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(३) पोट-कलम (१) अन्वये ज्या न्यायालयाकडे अर्ज करण्यात आला असेल त्या न्यायालयास अशा अर्जाच्या सुनावणीसाठी एक दिवस निश्चित करता येईल ; अशा दिवसाबद्दल निबंधकाला निदान तीन दिवसांची नोटीस दण्यात येईल.

(४) न्यायालय त्याने निश्चित केलेल्या दिवशी अगर त्यानंतर सोयीस्कर होईल तितक्या लवकर संघ व निबंधक जे कोणी साक्षीदार हजर करतील त्यांची तपासणी करील, तसेच त्या संघाच्या अधिकाऱ्यांची तपासणीही करील. न्यायालय अशा पुराव्याच्या सारांशाचे एक टाचण तयार करील.

(५) पोट-कलम (४) अन्वये हजर केलेल्या पुराव्याचा विचार केल्यानंतर न्यायालयास असा अर्ज मंजूर करता येईल किंवा नाकारता येईल.

(६) [१][राज्य] शासनास औद्योगिक न्यायालयाशी विचारविनिमय करून संघास कायदेविषयक सहाय्य देण्याबद्दलची व त्याच्या वतीने न्यायालयापुढे हजर राहण्याबद्दलची फी विहित करता येईल.

(७) या कलमाच्या प्रयोजनाकरिता कायदेविषयक सहाय्य या संज्ञेत संघास सल्ला देणे व संघाच्या वतीने विधि व्यवसायीने न्यायालयापुढे हजर राहणे, या गोष्टींचा समावेश होतो.

## प्रकरण पाच

## मालक व कामगार यांचे प्रतिनिधी आणि त्यांच्या वतीने हजर राहणे

मालकाच्या गटास मालक अधिसंघ म्हणून मान्यता देणे.

२७. (१) [१] [राज्य] शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिचसूचनेद्वारे, वेळोवेळी पुढील गोष्टी करता येतील:--

(अ) [२][एखाद्या स्थानिक क्षेत्रातील] एखाद्या उद्योगातील मालकांच्या कोणत्याही गटास, मग तो निगमित असो अगर नसो, या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता मालक अधिसंघ म्हणून मान्यता देणे, मात्र मालकांच्या अशा गटाच्या उद्देशांपैकी एक उद्देश [२][त्या स्थानिक क्षेत्रातील] अशा उद्योगातील नोकरीच्या शर्तीचे विनिमयन करणे हा असेल.

(ब) खंड (अ) अन्वये दिलेली कोणतीही मान्यता काढून घेणे :

परंतु, मालकाच्या अशा अधिसंघास आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यावाचून अशी कोणतीही मान्यता काढून घेण्यात येणार नाही.

(२) या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीत मालक संघास पुढील व्यक्तींचे प्रतिनिधित्व करण्याचा हक्क असेल --

(अ) अधिसंघाचा सदस्य असलेला कोणीही मालक ;

(ब) अशा अधिसंघाचा सदस्य नसून ज्याने अशा कार्यवाहीत अधिसंघाने आपले प्रतिनिधित्व करावे म्हणून संमती दिल्याचे विहित प्राधिकाऱ्यास लेखी कळवले असेल, असा त्याच उद्योगाशी संबंधित असलेला कोणताही मालक ;

आणि अशा अधिसंघाने दिलेली किंवा अशा अधिसंघास दिलेली कोणतीही नोटीस अगर सूचना ही, असा अधिसंघ ज्याचे प्रतिनिधित्व करीत असेल अशा प्रत्येक मालकाने दिलेली किंवा मालकास दिलेली नोटीस किंवा सूचना आहे असे मानण्यात येईल.

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० या अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम १५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(३) जेव्हा एकापेक्षा अधिक मालकांचा संबंध येत असेल किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींअन्वये त्यांचा संबंध येतो असे समजण्यात आले असेल आणि पोट-कलम (२) अन्वये मालकांच्या कोणत्याहीअधिसंघास त्या सर्वांचे प्रतिनिधित्व करण्याचा हक्क नसेल तेव्हा विहित केलेल्या रितीने ठरविलेल्या प्रतिनिधीस त्यांचे प्रतिनिधित्व करण्याचा हक्क असेल.

[१][ **२७-अअ** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असेल तरी या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी अधिसूचनेत करण्यात आलेल्या एखाद्या स्थानिक क्षेत्रात किंवा अनेक क्षेत्रांत जर कोणताही फेरबदल करण्यात आला तर, मान्यताप्राप्त मालक अधिसंघ, फेरबदल केलेल्या स्थानिक क्षेत्रासाठी मान्यताप्राप्त अधिसंघ म्हणून चालू राहणे.

(अ) अशा संबंधित एखाद्या वा अनेक स्थानिक क्षेत्रांत फेरबदल करण्याच्या निकटपूर्वी कोणत्याही उद्योगाचे कलम २७, पोट-कलम (२) अन्वये या अधिनियमाखाली प्रतिनिधित्व करण्याचा हक्क असलेल्या मान्यतेप्राप्त संघास किंवा (ब) कलम २७, पोट-कलम (२) अन्वये प्रतिनिधित्व करण्यास पात्र असलेले एकाहून अधिक मान्यताप्राप्त मालक अधिसंघ असतील तर त्याबाबतीत त्याच उद्योगाशी संबंधित असलेल्या ज्या मालक अधिसंघाचे अधिक सदस्य असतील त्या अधिसंघास,

असा फेरबदल ज्या तारखेस करण्यात आला असेल त्या तारखेपासून बारा महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा जर अशा कालावधीत अशा अधिसंघाकडून किंवा फेरबदल केलेल्या स्थानिक क्षेत्रातील इतर कोणत्याही अधिसंघाकडून कलम २७ खाली अर्ज करण्यात आला तर असा अर्ज राज्य शासनाकडून निकालात काढण्यात येईपर्यंत, यथास्थिति, फेरबदल केलेल्या एका किंवा अनेक स्थानिक क्षेत्रांचे प्रतिनिधित्व करण्याचा हक्क असेल.]

[२] [**२७-अ.** कलमे ३२, [३][३३ व ३३-अ] यात जी तरतूद केली असेल ती खेरीज करून इतर कोणत्याही रीतीने, कोणत्याही कामगारास, या अधिनियमान्वये चालू असलेल्या कोणत्याही कार्यवाहीत कामगारांच्या प्रतिनिधीवाचून हजर राहण्याची अथवा कृती करण्याची परवानगी देण्यात येणार नाही.] कामगारांच्या वतीने हजर राहणे.

२८. (१) जेव्हा कोणत्याही स्थानिक क्षेत्रातील कोणत्याही उद्योगासाठी कोणताही प्रातिनिधिक संघ नसेल तेव्हा अशा उद्योगातील प्रत्येक उपक्रमातील व त्यातील प्रत्येक व्यवसायातील कामगारांस या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता आपले प्रतिनिधित्व करण्यासाठी विहित रीतीने आपणामधून पाच व्यक्ती निवडून देता येतील : कामगारांच्या प्रतिनिधींची निवडणूक.

परंतू, ज्या कोणत्याही व्यवसायातील कामगारांची संख्या दहापेक्षा अधिक नसेल त्याकरिता अशा कोणत्याही व्यक्ती निवडून देता येणार नाहीत.

(२) पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही व्यक्ती निवडून दिलेल्या असतील तर त्या विहित करण्यात येईल अशा रीतीने कार्य करतील.

(३) पोट-कलम (१) अन्वये ज्या तारखेस निवडणूक घेण्यात आली असेल त्या तारखेपासून [४][दोन वर्षाच्या] आत व त्यानंतर दर [४][दोन वर्षाच्या] आत नवीन निवडणूक घेण्यात येईल :

---

[१] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम १६ अन्वये कलम २७-अअ हे समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५, कलम ४ अन्वये कलम २७-अ समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम १७ अन्वये "व ३३" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम ७ अन्वये "बारा महिन्यांच्या" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

परंतु, अशा कोणत्याही निवडणुकीच्या वेळी कोणत्याही व्यक्तीस पुन्हा निवडून देता येईल.

(४) कामगारांना पोट-कलम (१) किंवा (३) अन्वये निवडून आलेल्या कोणत्याही किंवा सर्व व्यक्तींना विहित रीतीने परत बोलविता येईल.

(५) पोट-कलम (१) किंवा (३) अन्वये निवडून आलेल्या व्यक्तींच्या रिकाम्या झालेल्या जागा विहित रीतीने निवडणूक घेऊन भरण्यात येतील.

बहुमताने केलेली कृती किंवा घेतलेला निर्णय सर्वांची कृती किंवा निर्णय म्हणून असणे.

२९. कलम २८ अन्वये कोणत्याही कामगारांनी निवडून दिलेल्या व्यक्तींनी बहुमताने केलेली कोणतीही कृती किंवा घेतलेला निर्णय हा, त्यांनी याप्रमाणे निवडून दिलेल्या सर्व व्यक्तींची कृती किंवा सर्व व्यक्तींचा निर्णय आहे असे मानण्यात येईल.,

कामगारांचा प्रतिनिधी

३०. कोणत्याही स्थानिक क्षेत्रातील एखाद्या उद्योगातील कामगारांचे प्रतिनिधी म्हणून विनिर्दिष्ट केलेल्या अग्रमान्यतेच्या क्रमानुसार [१][हजर राहण्याचा किंवा कृती करण्याचा] [२][कलम ३३-अ च्या तरतुदींच्या अधीनतेने पुढील संघ व व्यक्ती यास हक्क असेल]--

(एक) अशा उद्योगांसाठी असलेला प्रातिनिधिक संघ ;

(दोन) संबंधित बदलाशी ज्यांचा प्रत्यक्ष संबंध पोहोचत असेल अशा कामगारांपैकी बहुसंख्य कामगार ज्याचे सदस्य आहेत असा अर्हताप्राप्त प्रातिनिधिक संघ ;

(तीन) संबंधित कामगारांनी विहित रीतीने त्याबाबत प्राधिकृत केलेला असा, अशा उद्योगासाठी असलेला कोणताही अर्हताप्राप्त किंवा प्राथमिक संघ ;

(चार) संबंधित कामगारांनी प्राधिकृत केलेला कामगार अधिकारी असल्यास ;

(पाच) कलम २८ च्या तरतुदींअनुसार कामगकारांनी निवडून दिलेल्या व्यक्ती किंवा त्या कलमाचे पोट-कलम (१) याचे परंतुक लागू असेल तेव्हा, स्वतः कामगार ;

(सहा) कागगार अधिकारी ;

परंतु--

पहिली गोष्ट अशी की, खंड (पाच) अन्वये [१][हजर राहण्याचा किंवा कृती करण्याचा] हक्क असलेल्या व्यक्तीस स्वतःऐजवी अशा उद्योगासाठी असलेल्या कोणत्याही अर्ह किंवा प्राथमिक संघास [१][हजर राहण्यास किंवा कृती करण्यास] प्राधिकृत करता येईल :

दुसरे असे की, जेव्हा कामगार अधिकारी कामगारांचा प्रतिनिधी असेल तेव्हा, कलम ४४ अन्वये केलेल्या कोणत्याही कराराच्या किंवा कलम ५८ अन्वये केलेल्या कोणत्याही मिटवणुकीच्या अटी कामगारांनी विहित रीतीने मान्य केल्यावाचून कामगार अधिकारी असा करार किंवा यथास्थिति, अशी मिटवणूक करणार नाही :

तिसरे असे की, जेव्हा कोणत्याही कार्यवाहीत खंड (पाच) अन्वये [१][हजर राहण्याचा किंवा कृती करण्याचा] हक्क असलेल्या व्यक्ती पाचापेक्षा अधिक असतील तेव्हा, त्यांच्याऐवजी विहित संख्येइतक्या ज्या व्यक्ती विहित रीतीने त्यांच्यामधून निवडून येतील त्यांस [१][हजर राहण्याचा किंवा कृती करण्याचा] हक्क असेल.

---

[१] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५, कलम ५ अन्वये "काम चालविण्याचा", "काम चालविण्यास" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम १८ अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

[१][३१. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता जाहीर केलेल्या कोणत्याही एका किंवा अनेक स्थानिक क्षेत्रांत कोणताही फेरबदल झाला असेल तर,--

नोंदणीकृत किंवा प्रातिनिधिक संघ हा फेरबदल झालेल्या स्थानिक क्षेत्रासाठी काही काळ तसाच चालू राहणे.

(अ) संबंधित एका किंवा अनेक स्थानिक क्षेत्रांत फेरबदल झाल्याच्या निकटपूर्वी या अधिनियमान्वये एखाद्या उद्योगातील कामगारांचा प्रतिनिधी म्हणून हजर राहण्याचा किंवा कृती करण्याचा हक्क असलेल्या कोणत्याही नोंदणीकृत किंवा प्रातिनिधिक संघास ; किंवा

(ब) या अधिनियमान्वये एखाद्या उद्योगातील कामगारांचे प्रतिनिधी म्हणून हजर राहण्याचा किंवा कृती करण्याचा हक्क असलेले एकाहून अधिक नोंदणीकृत किंवा प्रातिनिधिक संघ असतील तेव्हा, अशा उद्योगात कामावर लावलेले कामगार ज्याचे सर्वात अधिक सदस्य असतील त्या संघास--मग त्याचे सदस्य अधिक आहेत ही गोष्ट इतर नोंदणीकृत किंवा प्रातिनिधिक संघांनी संमत होऊन मान्य केलेली असो किंवा ती निबंधकाने त्यास योगय वाटेल अशी चौकशी केल्यानंतर ठरविलेली असो--

यथास्थिति, फेरबदल झालेल्या एक किंवा अनेक स्थानिक क्षेत्रांसाठी पुढील कालावधीपर्यंत हजर राहण्याचा किंवा कृती करण्याचा हक्क असेल, म्हणजे असा फेरबदल ज्या तारखेस अंमलात आला त्या तारखेपासून बारा महिन्यांच्या कालावधीपर्यंत किंवा असा संघ किंवा असा फेरबदल झालेल्या एका किंवा अनेक स्थानिक क्षेत्रांतील कोणत्याही इतर संघ कलम १३ अन्वये अर्ज करील तेव्हा, निबंधक असा अर्ज निकालात काढील त्या कालावधीपर्यंत हजर राहण्याचा किंवा कृती करण्याचा हक्क असेल.]

[२][३२. समेटकर्ता, मंडळ, लवाद, वेतन मंडळ, कामगार न्यायालय व औद्योगिक न्यायालय यांस, न्यायदानाची उद्दिष्टे सफल व्हावीत, यासाठी तसे करणे इष्ट आहे असे वाटल्यास, कोणत्याही व्यक्तीस--मग ती कामगार असो अगर नसो--आपल्यापुढे चालू असलेल्या कार्यवाहीत हजर राहण्याची परवानगी देता येईल :

कार्यवाहीत ज्यांना हजर राहता येईल अशा व्यक्ती.

परंतु, [३][कलम ३३-अ च्या तरतुदींच्या अधीनतेने] ज्यात प्रतिनिनिक संघ हा कामगारांचा प्रतिनिधी म्हणून हजर राहिला असेल अशा कोणत्याही कार्यवाहीत [४][कामगार न्यायालयात किंवा औद्योगिक न्यायालयात एखाद्या कामगारास बडतर्फ केल्याबाबत, सेवामुक्त केल्याबाबत, काढून टाकल्याबाबत, कमी केल्याबाबत, त्याच्या सेवा समाप्त केल्याबाबत किंवा पदावरून तात्पुरते दूर केल्याबाबत दिलेल्या आदेशाच्या कायदेशीरपणाबद्दल किंवा औचित्याबद्दल जी कार्यवाही चालू असेल ती खेरीज करून] अशा कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्याची परवानगी देण्यात येणार नाही.]

३३. या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदीत काहीही अंतर्भूत असले तरी कामगारास, [६][किंवा प्रातिनिधिक संघास] पुढील कार्यवाह्यांत कोणत्याही व्यक्तीमार्फत हजर राहण्याचा हक्क असेल.--

[५][कामगारांच्या वतीने हजर राहणे.]

(अ) औद्योगिक न्यायालयापुढील सर्व कार्यवाह्या ;

[७][(अअ) वेतन मंडळापुढील सर्व कार्यवाह्या ;]

---

[१] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम ९ अन्वये कलम ३१ हे मूळ कलमाऐवजी दाखल करण्यात आले.

[२] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५, कलम ७ अन्वये कलम ३२ हे मूळ कलमाऐवजी दाखल करण्यात आले.

[३] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम १९ (३) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १९ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९४९ च्या मुंबई अधिनियम क्रमांक ५५, कलम ८ (तीन) अन्वये "कामगारांचे प्रतिनिधित्व" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३, कलम ४ (अ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ४ (ब) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

(ब) एखादा संप, टाळेबंदी [१][कामबंदी किंवा कामरोध] किंवा बदल किंवा स्थायी आदेशान्वये मालकाने दिलेला कोणताही आदेश बेकायदेशीर किंवा कसे हे ठरविण्यासाठी [२][ * * * * * ]

(क) त्याबाबत अर्ज केला असता, औद्योगिक न्यायालय परवानगी देईल अशा इतर कार्यवाह्या :

परंतु, कोणत्याही विधिव्यवसायीस, या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीत [३][कलम ८३-अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे] कामगार न्यायालय किंवा औद्योगिक न्यायालय याखेरीज इतर कोठेही खंड (क) अन्वये हजर राहण्याची परवानगी देण्यात येणार नाही :

[४][परंतु आणखी असे की, [५][कलम ३३-अ च्या तरतुदींच्या अधीनतेने या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीत [६][एखाद्या कामगारास बडतर्फ केल्याबाबत, काढून टाकल्याबाबत, कमी केल्याबाबत, त्याच्या सेवा समाप्त केल्याबाबत किंवा निलंबित केल्याबाबत दिलेल्या आदेशाच्या कायदेशीरपणाबद्दलची किंवा औचित्याबद्दलची कार्यवाही कामगार न्यायालयापुढे किंवा औद्योगिक न्यायालयापुढे असेल ती खेरीजकरून)] प्रातिनिधिक संघ कामगारांचा प्रतिनिधी म्हणून हजर राहिला असेल त्या कार्यवाहीत कोणत्याही कामगारास कोणत्याही व्यक्तीमार्फत हजर राहण्याचा हक्क असणार नाही.]

[७][तसेच, पूर्वोक्त तरतुदीखेरीज करून कोणत्याही व्यक्तीस (प्रातिनिधिक संघ किंवा विधि व्यवसायी याच्याहून अन्य) न्यायालयाच्या परवानगीशिवाय या अधिनियमान्वये कोणत्याही न्यायालयात चालू असलेल्या कोणत्याही कार्यवाहीत कामगारांच्या वतीने हजर राहण्याची परवानगी देण्यात येणार नाही.]

ज्या कार्यवाहीत कामगारा-कामगारांमध्ये विवाद असेल अशा कार्यवाहीत ज्यांना हजर राहता येईल त्या व्यक्ती.

[८][**३३-अ.** (१) कामगारा-कामगारांमध्ये असलेला जो कोणताही विवाद कलम ७२ अन्वये कामगार न्यायालयाकडे किंवा औद्योगिक न्यायालयाकडे लवादासाठी निर्देशित करण्यात आला असेल अशा विवादात पक्षकार असलेल्या सर्व व्यक्तींना अशा न्यायालयापुढील कार्यवाहीत हजर राहण्याचा व कृती करण्याचा हक्क असेल :

परंतु, प्रत्येक पक्षाच्या कामगारांची संख्या पाचहून अधिक असेल तर त्याबाबतीत असे कामगार विहित केलेल्या पध्दतीने त्यांच्या वतीने हजर राहण्यासाठी व कृती करण्यासाठी त्यांच्यामधून दोन व्यक्ती निवडून देतील.

(२) जर प्रातिनिधिक संघास अशा विवादात आपली बाजू मांडण्याची इच्छा असेल तर त्यालाही न्यायालयाकडे अर्ज केल्यानंतर अशा न्यायालयापुढे आपली बाजू मांडता येईल.]

---

[१] सन १९४८ च्या मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम ८ (अ) अन्वये हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन १९६५ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम २० (अ) अन्वये "किंवा कलम ७२ अन्वये निर्देशित केलेल्या कोणत्याही औद्योगिक विवादाचा निर्णय करण्यासाठी" हा मजकूर वगळण्यात आला.

[३] सन १९४९ च्या मुंबई अधिनियम क्रमांक ५५, कलम ८ (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ८ (दोन) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[५] सन १९६५ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम २० (ब) (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम २० (ब) (दोन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम २० (क) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[८] वरील अधिनियमाच्या कलम २१ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

प्रकरण सहा

## कामगार अधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्ये

**३४.** (१) कामगार अधिकारी, या अधिनियमान्वये किंवा त्यानुसार त्यास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करील व त्याच्याकडे सोपविलेली कर्तव्ये पार पाडील. कामगार अधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये.

(२) अशा अधिकारांचा वापर करण्यासाठी व कर्तव्ये बजावण्यासाठी कामगार अधिकाऱ्यास, विहित करण्यात येतील अशा शर्तीच्या अधीनतेने कामाच्या वेळात केव्हाही आणि कामाच्या वेळाव्यतिरिक्त इतर वेळी वाजवी नोटीस देऊन,--

(अ) कोणत्याही उद्योगासाठी वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही जागेत ;

(ब) कोणत्याही संघाचे कार्यालय म्हणून वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही जागेत ;

(क) मालकाने आपल्या कामगारांना राहण्याकरिता दिलेल्या कोणत्याही परिवास्तूमध्ये ;

प्रवेश करता येईल व तिची तपासणी करता येईल. तसेच या अधिनियमान्वये त्याच्याकडे सोपविलेली कर्तव्य योग्य रीतीने पार पाडण्यासाठी व त्यास प्रदान केलेल्या अधिकारांचा योग्य रीतीने वापर करण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील असे सर्व संबंधित दस्तऐवज मागविण्याचा व ते तपासण्याचा त्यास हक्क असेल.

(३) पोट-कलम (२) अन्वये तपासण्यात आलेल्या किंवा मागविण्यात आलेल्या कोणत्याही दस्तऐवजात असलेला सर्व तपशील किंवा त्यातून मिळालेली सर्व माहिती ही, असा दस्तऐवज जिच्या कब्जात असेल अशा व्यक्तीची तशी इच्छा असल्यास गोपनीय ठेवण्यात येईल.

(४) कामगार अधिकाऱ्यास या अधिनियमाच्या प्रयोजनांपैकी कोण्त्याही प्रयोजनाकरिता कामगारांची सभा, ते ज्या परिवास्तूमध्ये कामावर लावले असतील त्या परिवास्तूवर, वाजवी नोटीस दिल्यानंतर बोलाविता येईल. तसेच त्यास, अशा सभेची लेखी नोटीस ती आदेश देऊन विनिर्दिष्ट करील अशा परिवास्तूत ठळक ठिकाणी लावण्याविषयी मालकास फर्माविता येईल आणि त्याला अशी नोटीस स्वतः लावता येईल किंवा लावण्याची तजवीज करता येईल. अशा नोटिशीत सभेची तारीख, वेळ व जागा, संबंधित कामगार किंवा कामगारांचा वर्ग व सभा बोलाविण्याचे कारण या सर्व गोष्टी विनिर्दिष्ट करण्यात येतील :

परंतु, बेकायदेशीर नसलेली टाळेबंदी चालू असताना, तिच्याशी संबंध असलेल्या कामगारांची कोणतीही सभा मालकाच्या संमतीवाचून अशा परिवास्तूवर बोलविण्यात येणार नाही.

(५) कामगार अधिकाऱ्यास या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीत हजर राहण्याचा हक्क असेल.

(६) पुढील गोष्टी करणे हे कामगार अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल :--

(अ) कामगारांच्या हितसंबंधाकडे लक्ष पुरविणे आणि मालक व कामगार यांच्या दरम्यान सलोख्याचे संबंध वाढविणे.

(ब) कामगारांच्या गाऱ्हाण्यांची चौकशी करणे आणि अशी गाऱ्हाणी मालकापुढे मांडून ती दूर करण्यासाठी संबंधित कामगारांशी विचारविनिमय करून मालकांना शिफारशी करणे ;

(क) बदलासंबंधी नोटीस ज्याबाबत देण्यात आलेली नसेल असा कोणताही औद्योगिक विवाद चालू असेल त्या विषयीचे प्रतिवृत्त विवादातील पक्षकारांच्या नावासह, [१] [राज्य] शासनाकडे पाठविणे :

परंतु कामगार अधिकारी पुढील गोष्टी करणार नाही :--

(अ) चालू असलेल्या ज्या कार्यवाहीत प्रातिनिधिक संघ हा अशा कार्यवाहीतील पक्षकार असलेल्या कामगारांचा प्रतिनिधी असेल अशा कोणत्याही कार्यवाहीत हजर राहणे ;

---

[१] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(ब) जेव्हा एखाद्या स्थानिक क्षेत्रातील एखाद्या उद्योगासाठी [१] [ एखादा मान्यताप्राप्त संघ] असेल तेव्हा, [२] [ संघाशी विचारविनिमय केल्याशिवाय] कामगारांच्या संबंधात पोट-कलम (६), खंड (ब) अन्वये कोणतीही कृती करणे.

प्रकरण सात

## स्थायी आदेश

कामगार आयुक्ताने स्थायीआदेश निश्चित करणे.

**३५.** (१) हा अधिनियम एखाद्या उद्योगास लागू झाल्याच्या तारखेपासून सहा आठवड्यांच्या आत त्या उद्योगातील प्रत्येक मालक, अनुसूची एकमध्ये उल्लेखलेल्या औद्योगिक बाबींसंबंधी आपण स्वत: व आपले कामगार यांच्या दरम्यान असलेलया संबंधींचे विनियमन कारणाऱ्या स्थायी आदेशाचा मसुदा विहित रीतीने कामगार आयुक्ताकडे मंजुरीसाठी सादर करील :

परंतु, हा अधिनियम एखाद्या उद्योगास लागू करण्यात आल्यानंतर, अशा उद्योगातील एखादा उपक्रम सुरू मरण्यात येईल तेव्हा, स्थायी आदेशांचा मसुदा असा उपक्रम सुरू झाल्यापासून सहा महिन्यांच्या आत सादर करण्यात येईल.

(२) स्थायी आदेशांचा मसुदा मिळाल्यानंतर कामगार आयुक्त, हा कामगार व मालक यांचे प्रतिनिधी व उद्योगातील व इतर हितसंबंधित व्यक्ती यांच्याशी विहित केलेल्या रीतीने, विचारविनिमय करून व त्यास योग्य वाटेल अशी चौकशी करून उक्त स्थायी आदेश निश्चित करील.

(३) याप्रमाणे निश्चित केलेल्या आदेशांची एक प्रत कामगार आयुक्त निबंधकाकडे पाठवील व निबंधक ती मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत, त्यांची नोंद करण्यासाठी ठेवलेल्या नोंदवहीत त्यांची नोंद करील.

(४) याप्रमाणे निश्चित केलेले स्थायी आदेश हे पोट-कलम (३) अन्वये त्यांची नोंदवहीत नोंद केल्याच्या तारखेपासून अंमलात येतील.

(५) एखाद्या उपक्रमाच्या बाबतीत केलेले स्थायी आदेश पोट-कलम (४) च्या तरतुदींअन्वये प्रवर्तनात येईतोपर्यंत अशा उद्योगाच्या संबंधात [३] [राज्य] शासनाने **शासकीय राजपत्रात** कोणतेही आदर्श स्थायी आदेश अधिसूचित केले असतील तर ते अशा उपक्रमास लागू होतील.

औद्योगिक न्यायालयाकडे अपील.

**३६.** (१) [४] [या प्रकरणाखालील कामगार आयुक्ताच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या अशा कोणत्याही व्यक्तीस], ते प्रवर्तनात आल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत औद्योगिक न्यायालयाकडे अपील करता येईल :

परंतु, औद्योगिक न्यायालयास, पुरेशा कारणावरून कोणतेही अपील तीस दिवसांचा कालावधी संपल्या नंतरही दाखल करून घेता येईल.

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३, कलम ५ अन्वये "प्रातिनिधिक संघ" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम २२ अन्वये "अशा संघाने विनंती केली नसेल तर" या मजकुराऐवजी हा महकूर दाखल करण्यात आला.

[३] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम २३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) अपील दाखल करण्यात आल्यावर, औद्योगिक न्यायालयास अशा अपिलातील कोणत्याही पक्षकाराच्या अर्जावरून व त्यास योग्य वाटतील अशा शर्तीवर, अशा सर्व किंवा कोणत्याही स्थायी आदेशांचे प्रवर्तन अपिलाचा निकाल होईपर्यंत स्थगित करता येईल.

(३) अपिलात औद्योगिक न्यायालयास असे सर्व किंवा कोणतेही स्थायी आदेश कायम करता येतील, त्यात फेरबदल करता येईल, किंवा त्यात भर घालता येईल अगर ते विखंडित करता येतील.

(४) औद्योगिक न्यायालय, पोट-कलम (३) अन्वये त्याने निश्चित केलेले सर्व किंवा कोणतेही स्थायी आदेश ज्या तारखेस प्रवर्तनात आले पाहिजेत ती तारीख ठरवील.

(५) औद्योगिक न्यायालयाने पोट-कलम (३) अन्वये दिलेल्या आदेशांची एक प्रत निबंधकाकडे पाठविण्यात येईल व निबंधक कलम ३५, पोट-कलम (३) मध्ये उल्लेख केलेल्या नोंदवहीत त्यांची नोंद करील.

**३७.** (१) औद्योगिक न्यायालयाने कलम ३६ अन्वये दिलेल्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोण्त्याही व्यक्तीस अशा निर्णयाच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत उक्त निर्णयाचे पुनर्विलोकन व्हावे यासाठी औद्योगिक न्यायालयाकडे अर्ज करता येईल : पुनर्विलोकन.

[१] [परंतू, औद्योगिक न्यायालयास पुरेशा कारणावरून असा कोणताही अर्ज उक्त तीस दिवसांचा कालावधी संपल्यानंतरही दाखल करून घेता येईल.]

(२) एखादी नवीन व महत्वाची गोष्ट किंवा पुरावा उघडकीस आला आहे व ती गोष्ट किंवा पुरावा, योग्य दक्षता घेऊनही अर्जदारास कळू शकला नसता किंवा औद्योगिक न्यायालयाने निर्णय दिला त्यावेळी ती गोष्ट किंवा तो पुरावा हजर करणे त्यास शक्य नव्हते किंवा कागदपत्रावरून उघड उघड दिसून येणारी चूक किंवा प्रमाद त्यात आहे किंवा असा अर्ज मंजूर करण्यास इतर कोणतेही पूरेसे कारण आहे, अशी औद्योगिक न्यायालयाची खात्री झाल्याखेरीज ते असा अर्ज मंजूर करणार नाही.

(३) कलम ३६, पोट-कलमे (२), (३), (४), व (५) यांच्या तरतुदी या, कामगार आयुक्ताने कलम ३५, पोट-कलम (२) खाली निश्चित केलेल्या स्थायी आदेशांविरुध्द केलेल्या अपिलांच्या बाबतीत जशा लागू असतात तशाच रीतीने त्या पोट-कलम (१) खालील कार्यवाह्यांच्या बाबतीत शक्य तेथवर लागू असतील.

**३८.** (१) ज्या औद्योगिक न्यायालयाकडे अपील करता येते किंवा पुनर्विलोकनासाठी अर्ज करता येतो त्या न्यायालयाने, अशा अपिलात किंवा पुनर्विलोकनात, या प्रकरणाच्या पूर्ववर्ती तरतूदींपैकी कोणत्याही तरतूदी अनुसार निश्चित केलेल्या कोणत्याही स्थायी आदेशात जो फेरबदल केला असेल त्याव्यतिरिक्त इतर कोणताही फेरबदल अशा आदेशात, तो अंमलात आल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीपर्यंत करता येणार नाही. स्थायी आदेशांत एक वर्षापर्यंत कोणतेही फेरबदल न करणे.

(२) कोणत्याही मालकास किंवा कामगारास, पुढे सांगितलेल्या स्थायी आदेशांत बदल करण्याविषयी, ते प्रवर्तनात आल्याच्या तारखेपासून एक वर्ष संपल्यानंतर, कामगार आयुक्ताकडे अर्ज करता येईल :--

(अ) कलम ३५, पोट-कलम (२) अन्वये निश्चित केलेला व ज्याविरुध्द कोणतेही अपील करण्यात आलेले नाही असा कोणताही स्थायी आदेश, अथवा

(ब) कलम ३६, पोट-कलम (३) अन्वये अपिलात निश्चित केलेला व ज्याच्या बाबतीत पुनर्विलोकन होण्यासाठी कोणताही अर्ज करण्यात आलेला नाही असा कोणताही स्थायी आदेश, अथवा

(क) कलम ३७ अन्वये पुनर्विलोकनाच्या वेळी निश्चित केलेला कोणताही स्थायी आदेश.

---

[१] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८६, कलम १० अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

स्थायी आदेशाल फेरबदल.

**३९.** (१) कलम ३८, पोट-कलम (२) अन्वये केलेला अर्ज मिळाल्यावर, कामगार आयुक्त, दुसऱ्या पक्षास आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर आणि त्याच्या मते ज्यांचा संबंध येत असेल अशा उद्योगातील ज्या इतर हितसंबंधित व्यक्तींना बाधा पोहोचलेली असेल त्यांच्याशी विचारविनिमय करून, त्यास योग्य वाटेल असा आदेश देईल आणि त्या आदेशामुळे कोणत्याही स्थायी आदेशात फेरबदल होत असेल तर, अशा तऱ्हेने फेरबदल केलेल्या स्थायी आदेशाची एक प्रत निबंधकाकडे पाठवील व निबंधक, ती मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत कलम ३५, पोट-कलम (३) मध्ये उल्लेख केलेल्या नोंदवहीत त्याची नोंद करील. अशा रीतीने फेरबदल करण्यात आलेला स्थायी आदेश त्याची नोंदवहीत नोंद झाल्याच्या तारखेपासून प्रवर्तनात येईल.

(२) कलमे ३६, ३७ व ३८ यांच्या तरतुदी या कलम ३५, पोट-कलम (२) अन्वये ठरविलेल्या स्थायी आदेशांच्या बाबतीत जशा लागू होतात तशांच रीतीने त्या पोट-कलम (१) अन्वये कामगार आयुक्ताने दिलेल्या आदेशांच्या बाबतीत शक्य तेथवर लागू होतील.

स्थायी आदेश निश्चायक असणे.

**४०.** (१) मालक व त्यांचे कामगार यांच्याबाबत या प्रकरणान्वये निश्चित केलेले स्थायी आदेश किंवा असे कोणतेही स्थायी आदेश नासतील तेव्हा, कलम ३५, पोट-कलम (५) च्या तरतूदींअन्वये लागू असलेले कोणतेही आदर्श स्थायी आदेश हे, अनुसूची एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व औद्योगिक बाबींच्या संबंधात मालक व त्यांचे कामगार यांच्या दरम्यान असलेल्या संबंधाबाबत निश्चायक असतील.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, [१][राज्य] शासनास, कलम ७८, परिच्छेद "अ", खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरुपाचा कोणताही विवाद कामगार न्यायालयाकडे निर्देशित करता येईल किंवा कोणत्याही कामगारास [२][किंवा प्रातिनिधिक संघास] अशा विवादाच्या बाबतीत कामगार न्यायालयाकडे अर्ज करता येईल.

अतिरिक्त किंवा फेरबदल केलेल्या बाबींच्या संबंधातील आदर्श स्थायी आदेश कमी लाभप्रद नसतील तर ते विवक्षित कामगारांना लागू असणे.

[३] [**४०-अ.** या प्रकरणाच्या पूर्वगामी तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मुंबई औद्योगिक संबंध (सुधारणा) अधिनियम, १९७७ याच्या प्रारंभाच्या तारखेला किंवा त्यानंतर अनुसूची एकमध्ये समाविष्ट केलेल्या कोणत्याही अतिरिक्त बाबींच्या संबंधात किंवा त्या अनुसूचीत केलेल्या कोणत्याही फेरबदलाच्या संबंधात, राज्य शासनाने **शासकीय राजपत्रात** वेळोवेळी दिलेले व अधिसूचित केलेले कोणतेही आदर्श स्थायी आदेश, असे आदर्श स्थायी आदेश कामगारांना लागू असलेल्या तदनुरूप स्थायी आदेशांपेक्षा कमी लाभप्रद आहेत म्हणून कामगार आयुक्तांनी ते रोखून ठेवलेले नसतील तर ज्या उपक्रमांतील कामगारांच्या संबंधात कलम ३५ अन्वये स्थायी आदेश आगोदरच निश्चित करण्यात आलेले असतील, त्यांच्या बाबतीत सुध्दा ते लागू होतील. ]

१९७७ चा महा. ४७.

सन १९४६ चा अधिनियम क्रमांक २० विवक्षित उद्योगांना लागू नसणे.

**४१.** या प्रकरणाच्या तरतुदी ज्या कोणत्याही उद्योगांस लागू करण्यात आल्या असतील अशा उद्योगांस, औद्योगिक सेवायोजन (स्थायी आदेश) अधिनियमन, १९४६ याच्या तरतुदी लागू होणार नाहीत.

१९४६ चा महा. २०.

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम ११ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियमन क्रमांक ४७, कलम ५ अन्वये हे कलम जादा दाखल करण्यात आले.

## प्रकरण आठ

## बदल

**४२.** (१) अनुसूची दोनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोण्त्याही औद्योगिक बाबीच्या संबंधात कोणताही बदल करण्याचा ज्याचा इरादा असेल असा कोणताही मालक अशा इराद्याची नोटीस विहित नमुन्यात कामगार प्रतिनिधीस देईल. तो अशा नोटिशीची एक प्रत मुख्य समेटकर्ता, स्थानिक क्षेत्रातील संबंधित उद्योगासाठी असलेला समेटकर्ता, निबंधक, कामगार अधिकारी व विहित करण्यात येईल अशी इतर व्यक्ती यांच्याकडे पाठवील. तसेच तो अशा नोटिशीची एक प्रत ज्यांना अशा बदलाची बाधा पोहोचली असेल असे कामगार ज्या परिवास्तूवर कामावर लावले असतील तेथील एखाद्या ठळक ठिकाणी किंवा कोणत्याही विवक्षित बाबतीत मुख्य समेटकर्ता विनिर्दिष्ट करील अशा इतर ठिकाणी लावील. बदलाची नोटीस.

(२) अनुसूची एक किंवा तीन यात जी कोणतीही औद्योगिक बाब विनिर्दिष्ट करण्यात आली नसेल तिच्या संबंधात बदल व्हावा अशी ज्यांची इच्छा असेल असा कोणताही कामगार विहित नमुन्यात कामगारांच्या प्रतिनिधीमार्फत मालकास नोटीस देईल व असा प्रतिनिधी अशा नोटिशीची एक प्रत मुख्य समेटकर्ता, स्थानिक क्षेत्रातील संबंधित उद्योगांसाठी असलेला समेटकर्ता, निबंधक, कामगार अधिकारी व विहित करण्यात येईल अशा इतर व्यक्तींकडे पाठवील.

(३) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या कोणत्याही बदलासंबंधीच्या नोटिशीमुळे उद्‌भवलेल्या कोण्त्याही औद्योगिक विवादाच्या बाबतीतील कोणत्याही समेटाच्या कार्यवाहीत कोणतीही मिटवणूक घडून न आल्यास, कलम ६३ च्या अर्थानुसार कार्यवाही पूर्ण झाल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांचा अवधी संपण्यापूर्वी त्याच बदलासंबंधी किंवा सर्व महत्वाच्या तपशीलाच्या बाबतीत तशाच प्रकारच्या बदलासंबंधी नवीन नोटीस देता येणार नाही. उक्त दोन महिन्यांचा अवधी संपल्यानंतर जर कोणत्याही वेळी तोच बदल किंवा सर्व महत्वाच्या तपशीलाच्या बाबतीत तशाच प्रकारचा बदल करावा अशी कोणत्याही मालकाची किंवा कामगाराची पुन्हा इच्छा असेल तर, तो, यथास्थिति, पोट-कलम (१) किंवा (२) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने नवीन नोटीस देईल.

(४) एखाद्या कामगाराची [1][किंवा प्रातिनिधिक संघाची] --

(एक) स्थायी आदेशान्वये [2][***] मालकाने दिलेला कोणताही आदेश किंवा

(दोन) स्थायी आदेशांची प्रयुक्ती किंवा त्यांचे अर्थ-विवरण यांमधून उद्‌भवलेली कोणतीही औद्योगिक बाब किंवा,

(तीन) अनुसूची तीनमध्ये विनिर्दिष्ट केलेली [3] [त्यातील बाब (५) खेरीज करून] औद्योगिक बाब या संबंधात एखादा बदल करावा अशी इच्छा असेल तर तो कामगार न्यायालयाकडे अर्ज करील [4] [आणि अनुसूची तीनच्या बाब ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही औद्योगिक बाबतीत औद्योगिक न्यायालयाकडे] अर्ज करील :

परंतु, त्या कामगाराने [1][किंवा प्रातिनिधिक संघाने] बदल करण्याऱ्याविषयी [2][***] मालकास विनंती केलेली आहे व अशा बदलाच्या बाबतीत विहित कालावधीत कोणताही करार केलेली नाही असे असल्याखेरीज एरव्ही असा कोणताही अर्ज करता येणार नाही.

---

[1] सन १९४८ चा मुंबई अनिनियम क्रमांक ४३, कलम ६ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ६ (ब) अन्वये " आपल्या" हा शब्द वगळण्यात आला.

[3] सन १९६५ चा मुंबई अनिनियम क्रमांक २२, कलम २४ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम २४ (ब) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

बदलाची नोटीस ही सर्वसाधारण नोटीस म्हणून केव्हा मानावी.

४३. [1][(१) मालकाने कलम ४२, पोट-कलम (१) अन्वये एखाद्या स्थानिक क्षेत्रातील एखाद्या उद्योगातील कामगारांपैकी काही कामगारांवर ज्याचा परिणाम होत असेल अशा प्रस्तावित बदलाची नोटीस दिली असेल, तेव्हा त्या स्थानिक क्षेत्रातील त्या उद्योगात गुंतलेल्या कोणत्याही इतर मालकास किंवा मालक अधिसंघास किंवा कोणत्याही कामगार प्रतिनिधीस, उक्त नोटीस बजावल्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत, अशा मालकास अशी लेखी सुचना देता येईल की, त्या क्षेत्रातील त्या उद्योगात गुंतलेले व उक्त सूचनेत उल्लेख केलेले यथास्थिति, इतर कामगार किंवा इतर मालक यांच्यावर अशा बदलांचा परिणाम झालेला आहे. संबंधित एक किंवा अनेक मालक अशा सूचनेची एक प्रत संबंधित कामगार ज्या परिवास्तूमध्ये कामावर लावले असतील त्या प्रत्येक जागेतील ठळक ठिकाणी लावतील.

(२) एखादा कामगार एखाद्या स्थानिक क्षेत्रातील एखाद्या उद्योगातील मालकांपैकी एका किंवा काही मालकांवर ज्याचा परिणाम होत असेल अशा प्रस्तावित बदलाची नोटीस जेव्हा कलम ४२, पोट-कलम (२) अन्वये देईल तेव्हा त्या स्थानिक क्षेत्रातील त्या उद्योगात गुंतलेल्या कामगार प्रतिनिधीस, किंवा कोणत्याही मालकास किंवा कोणत्याही मालक अधिसंघास, अशी नोटीस बजावल्याच्या तारखेपासून [2][तीस दिवसांच्या आत] कामगारास व त्याच्या मालकास किंवा यथास्थिति, कामगार प्रतिनिधीस अशी विशेष नोटीस देता येईल की, त्या क्षेत्रातील त्या उद्योगात गुंतलेले व अशा विशेष नोटिशीत उल्लेख केलेले इतर कामगार किंवा यथास्थिति, इतर मालक यांच्यावर अशा बदलाचा परिणाम झालेला आहे अशा विशेष नोटिशीची एक प्रत संबंधित एक किंवा अनेक मालक, संबंधित कामगार जेथे कामावर लावले असतील त्या प्रत्येक परिवास्तूवरील ठळक ठिकाणी लावील किंवा लावतील.]

(३) पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या प्रत्येक सूचनेची व पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या प्रत्येक विशेष नोटिशीची एक प्रतही, कामगार आयुक्त, मुख्य समेटकर्ता, त्या स्थानिक क्षेत्रातील संबंधित उद्योगासाठी असलेला समेटकर्ता, निबंधक, कामगार अधिकारी व विहित करण्यात येईल अशा इतर व्यक्ती यांच्याकडे पाठविण्यात येईल.

(४) पोट-कलम (१) अन्वये सूचना देण्यात आल्यावर किंवा पोट-कलम (२) अन्वये विशेष नोटिस देण्यात आल्यावर आणि पोट-कलम (३) च्या तरतुदींचे अनुपालन करण्यात आल्यावर यथास्थिति, सूचनेत उल्लेख केलेले कामगार किंवा विशेष नोटीशीत उल्लेख केलेले मालक यांच्यावरदेखील या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता अशा बदलाचा परिणाम झालेला आहे व त्यांना देखील यथास्थिति, कलम ४२ याचे पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) या अन्वये नोटीस देण्यात आली आहे, असे मानण्यात येईल.

(५) जेव्हा एखादा मालक किंवा कामगार, हा यथास्थिति, कलम ४२ याचे पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये प्रस्तावित बदलाची नोटीस देईल आणि [3][राज्य] शासनाच्या मते अशा बदलाशी स्थानिक क्षेत्रातील त्या उद्योगात किंवा व्यवसायात गुंतलेल्या बहुसंख्य मालकांवर किंवा कामगारांवर परिणाम होत असेल तेव्हा [3][राज्य] शासनास **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असे घोषीत करता येईल की, अशा संपूर्ण अद्योगावर किंवा यथास्थिति, व्यवसायावर अशा बदलाचा परिणाम झालेला आहे ; आणि त्यानंतर त्यांच्यावर अशा रीतीने परिणाम झालेला आहे असे मानण्यात येईल.

बदलाबाबत करार.

४४. (१) कलम ४२ अन्वये नोटीस बजावल्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत किंवा कलम ४३ अन्वये सूचना दिल्याच्या किंवा विशेष नोटीस बलावल्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत किंवा कलम ४३, पोट-कलम (५) अन्वये अधिसूचना प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत किंवा परिणाम झालेले मालक व कामगार प्रतिनिधी हे आपसात ठरवतील अशा आणखी कालावधीच्या आत नियोजित बदलाबाबत करार करण्यात आला तर

---

[1] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम ९ अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी पोट-कलमे (१) व (२) ही दाखल करण्यात आली.

[2] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम २५ अन्वये "सात दिवसांच्या आत" या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

एक किंवा अनेक मालक, तसेच कामगार प्रतिनिधी यांनी सही केलेले अशा कराराचे टिपण मुख्य समेटकर्ता, निबंधक कामगार व अधिकारी यांच्याकडे विहित रीतीने पाठविण्यात येईल :

परंतु, कलम ४३, पोट-कलम (४) अन्वये ज्यांच्यावर परिणाम झाला आहे असे मानण्यात आले असेल ते कामगार अशा उद्योगातील बहुसंख्य कामगार आहेत असे [१] [राज्य] शासनाचे मत असेल किंवा त्या कलमांचे पोट-कलम (५) अन्वये संपूर्ण उद्योगांवर परिणाम झाला आहे असे मानण्यात आले असेल, तेव्हा, कामगार अधिकारी या पोट-कलमान्वये कोणतेही करार करणार नाही.

(२) कराराचे असे टिपण मिळाल्यानंतर निबंधक त्याची नोंद त्या प्रयोजनार्थ ठेवलेल्या नोंदवहीत करील ; मात्र असा करार या अधिनियमाच्या तरतुदीपैकी कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करून करण्यात आला होता, किंवा तो चुकीने, अपवेदनामुळे, कपटाने, गैरवाजवी वजन खर्च करून, जबरदस्तीने किंवा धाक दाखवून करण्यात आला होता अशी निबंधकाची चौकशीअंती खात्री झालेली असेल तर ती गोष्ट वेगळी.

(३) पोट-कलम (२) अन्वये कराराची नोंदणी करण्याचे निबंधकाने ज्या आदेशाद्वारे नाकारले असेल त्या आदेशाविरुध्द औद्योगिक न्यायालयाकडे अपील करता येईल. अशा अपिलास कलम २० च्या तरतुदी लागू होतील.

[२][**४४-अ.** जेव्हा कलम ४२, पोट-कलम (४) याच्या परंतुकात उल्लेख केलेला करार झाला असेल तेव्हा, कोणत्याही पक्षास अशा कराराचे टिपण निबंधकाकडे नोंदणीकृत डाकेने पाठविता येईल. त्यानंतर कलम ४४, पोट-कलमे (२) व (३) याच्या तरतूदी अशा कराराच्या नोंदणीच्या बाबतीत लागू होतील. कलम ४२ (४) अन्वये कराराची नोंदणी करणे.

**४४-ब.** कोणतेही समेटाचे कामकाज पूर्ण झाल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत एखादी मिटवणूक घडून आली असेल तेव्हा, अशी मिटवणूक कलम ४४ च्या प्रयोजनांकरिता करार आहे असे मानण्यात येईल आणि उक्त कलम ४४ च्या तरतुदी अशा कराराच्या नोंदणीच्या बाबतीत लागू होतील.] विवक्षित मिटवणूकी करार आहेत असे समजणे.

**४५.** कलम ४४ अन्वये नोंदण्यात आलेला करार हा त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपासून प्रवर्तनात येईल किंवा जर अशी कोणतीही तारीख विनिर्दिष्ट करण्यात आली नसेल तर, निबंधक तिची नोंदणी ज्या तारखेस करतील त्या तारखेस तो प्रवर्तनात येईल. करार अंमलात येणे.

**४६.** (१) कोणत्याही मालकाला, प्रकरण ७ अन्वये ठरविलेल्या कोणत्याही स्थायी आदेशात बदल करण्याविषयी या अधिनियमात विहित करण्यात आलेली कार्यपध्दती अनुसरल्याशिवाय अशा कोणत्याही स्थायी आदेशात कोणताही बदल करता येणार नाही. बेकायदेशीर बदल.

(२) कोणत्याही मालकास अनुसूची दोनमध्ये नमूद केलेल्या कोणत्याही औद्योगिक बाबतीत--

[३][ (अ-एक) कलम ४२, पोट-कलम (१) च्या तरतुदीअन्वये आवश्यक असलेली बदलाची नोटीस देण्यापूर्वी ;]

(एक) कलम ४४, पोट-कलम (१) मध्ये तरतूद केलेल्या कालावधीच्या आत करार झालेला नसल्यास ;

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम १२ अन्वये कलमे ४४-अ आणि ४४-ब ही समाविष्ट करण्यात आली.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १३ (अ) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

[१][ (दोन) जेव्हा कोणताही करार झालेला नसेल तेव्हा, समेटाची कार्यवाही पूर्ण होण्यापूर्वी व तद्नंतर दहा दिवसांच्या कालावधीत ; ]

[२][ (तीन) कोणतीही मिटवणूक घडून आली नसेल तर त्या बाबतीत, लवादी किंवा औद्योगिक न्यायालय याचा निवाडा किंवा यथास्थिति, वेतन मंडळाचा निर्णय प्रवर्तनात येण्याच्या तारखेपूर्वी ; ] कोणताही बदल करता येणार नाही.

(३) कोणत्याही मालकाला, कोणतीही मिटवणूक [३][ परिणामक्षम निवाडा, नोंदणीकृत करार किंवा वेतनमंडळाचा परिणामक्षम आदेश किंवा निर्णय ] यात असलेल्या अटींचे उल्लंघन करून असा कोणताही बदल करता येणार नाही.

(४) पोट-कलम (१), (२) किंवा (३) याच्या वस्तुदीचे उल्लंघन करुन केलेला कोणताही बदल बेकायदेशीर असेल ;

(५) औद्योगिक बाबींवर परिणाम करणारी कोणतीही मिटवणूक निवाडा, [४][ नोंदणीकृत करार किंवा वेतन मंडळाचा, कामगार न्यायालयाचा किंवा औद्योगिक न्यायालयाचा परिणामक्षम आदेश किंवा निर्णय ] याच्या अटी पूर्ण करण्यात कसूर करणे हे बेकायदेशीर बदल करणे होय, असे मानण्यात येईल.

मालकाने विवाक्षित अवधीत बदल वगैरे करणे.

**४७.** [५][वेतन मंडळ,] कामगार न्यायालय किंवा औद्योगिक न्यायालय याच्या कोणत्याही [६] [परिणाम-क्षम निर्णयाच्या किंवा आदेशाच्या] अटीअन्वये बदल अंमलात आणण्याविषयी किंवा बेकायदेशीर बदल मागे घेण्यासाठी ज्या मालकास फर्माविण्यात आले असेल ती, असा निर्णय किंवा आदेश देणारे [७][वेतन मंडळ किंवा] न्यायालय जो अवधी विहित करील त्या अवधीत, अशी गोष्ट करील आणि असा कोणताही अवधी विहित करण्यात आला नसेल तेव्हा असा निर्णय किंवा आदेश दिल्यापासून [८][किंवा यथास्थिति, कलम ७६-अ किंवा ८६-फ यात उल्लेख केलेले अधिकथन केल्यापासून] अठ्ठेचाळीस तासांच्या आत अशी गोष्ट करील.

## प्रकरण नऊ

## संयुक्त समित्या

संयुक्त समित्यांची रचना.

**४८.** (१) मालक व त्या स्थानिक क्षेत्रातील उद्योगासाठी असलेले नोंदणीकृत संघ या दोहोंच्या संमतीने एखाद्या उपक्रमाकरिता किंवा व्यवसायाकरिता संयुक्त समितीची रचना करता येईल [९] [आणि नोंदणीकृत संघाने याबाबत अर्ज केला असता [१०][ राज्य ] शासनाने तसा निदेश देईल तर, अशा संयुक्त समितीची स्थापना करण्यात येईल मग तेथे अशी संमती देण्यात आलेली असो किंवा नसो ] :

[१] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम १३ (ब) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[२] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम २६ अन्वये, खंड (तीन), (चार), व (पाच) या खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[३] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३, कलम ७ (दोन) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ७ (तीन) अन्वये हे शब्द दाखल करण्यात आले.

[५] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५, कलम ९ अन्वये हे शब्द दाखल करण्यात आले.

[६] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३, कलम ८ (एक) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ८ (दोन) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम ८ (दोन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[९] वरील अधिनियमाच्या कलम ९ (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१०] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

परंतु, प्रातिनिधिक संघ नसलेल्या उपक्रमाच्या किंवा व्यवसायांच्या बाबतीत शेकडा पंधरा टक्क्यांहून कमी नाही इतके कामगार एखाद्या नोंदणीकृत संघाचे सदस्य असल्याबाबत कोणतीही संयुक्त समिती याप्रमाणे स्थापन करता येणार नाही.

(२) मालकाने किंवा संघाने निबंधकाकडे याबाबत अर्ज केला असता, निबंधक, त्याने ठेवलेल्या संयुक्त समित्यांच्या यादीत अशा संयुक्त समितीचें नाव दाखल करील, आणि त्यानंतर या अधिनियमाच्या सर्व तरतुदी अशा संयुक्त समितीस लागू होतील.

[१][(३) प्रत्येक संयुक्त समिती पोट-कलम ७१) च्या परंतुकात विनिर्दिष्ट केलेल्या शर्तीचे अनुपालन होण्याचे बंद होईल त्या त्या वेळी विसर्जित झालेली असेल ; आणि मालक व नोंदणीकृत संघ यांच्या संमतीने रचना करण्यात आलेली संयुक्त समिती ही सुध्दा, मालकाने संघास किंवा संघाचे मालकास त्याबाबत दिलेल्या तीन महिन्यांच्या नोटिशीचा कालावधी संपल्यानंतर विसर्जित झालेली असेल.]

**४९.** (१) संयुक्त समिती ही, विहित करण्यात येईल इतक्या सदस्यांची मिळून होईल, यापैकी निम्मे सदस्य संघाने [२][संबंधित उपक्रम किंवा व्यवसाय यातील कामगारांमधून] विहित केलेल्या रीतीने नामनिर्दिष्ट केलेले असतील व राहिलेले निम्मे सदस्य संबंधित मालकाने नेमलेले असतील. संयुक्त समितीची रचना.

[३][नोंदणीकृत संघाने केलेल्या अर्जावरुन [४] [राज्य] शासनाने दिलेल्या निदेशानुसार संयुक्त समितीची रचना करावयाची असेल तेव्हा, संघ व मालक [४] [राज्य] शासनाच्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीत सदस्य नामनिर्दिष्ट करील व त्यांची नेमणूक करील. अशा आदेशाची एक प्रत शक्य तितक्या लवकर विहित रीतीने संघास व मालकास देण्यायत येईल. ]

(२) अध्यक्षांची नेमणूक याबाबत केलेल्या नियमांनुसार करण्यात येईल. तों आपली कर्तव्ये विहित रीतीने बजावील.

**५०.** (१) नोंदणीकृत संघाच्या प्रतिनिधीस कामगारांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांस सल्ला देण्यासाठी संयुक्त समितीच्या कोणत्याही सभेस हजर राहता येईल. संयुक्त समितीचे कामकाज.

(२) संयुक्त समितीने कामकाज विहित रीतीने चालविण्यात येईल.

(३) अशा कामकाजाची नोंद एका कार्यवृत्त पुस्तकात [५] [बहुसंख्या कामगारांस जी भाषा अवगत असेल त्या भाषेत ] करण्यात येईल.

**५१.** (१) संयुक्त समितीच्या कोणत्याही सदस्यास, कोणत्याही स्थायी आदेशातील बदलाव्यतिरिक्त इतर कोणत्याही बदलाबाबत किंवा यथास्थिति, ज्या उपक्रमासाठी किंवा व्यवसायासाठी अशा समितीची रचना करण्यात आली असेल अशा उपक्रमातील किंवा व्यवसायातील मालक व कामगार यांच्या संबंधास जिच्यामुळे बाध येत असेल अशा इतर कोणत्याही गोष्टीबाबत प्रस्ताव मांडता येईल. बदलाबाबत प्रस्ताव.

परंतु, कोणत्याही औद्योगिक बाबीच्या संबंधात या अधिनियमान्वये बदल करणे त्या त्या वेळी शक्य असेल तर, अशा बदलाबाबत कोणताही प्रस्ताव मांडण्यात येणार नाही.

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३, कलम ९ (दोन) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम १० अन्वये, हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३, कलम १० अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[५] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम १४ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये प्रस्तावित केलेल्या प्रत्येक बदलासंबंधीची संयुक्त समितीने दिलेला निर्णय हा अशा बदलाच्या सर्व आवश्यक तपशीलासह नोंदणीकृत संघ व मालक, तसेच कामगार अधिकारी व कामगार आयुक्त यांना अठ्ठेचाळीस तासांच्या आत कळविण्यात येईल.

बदलासंबंधी विशेष सूचना देणे व कामगार न्यायालयाकडे विशेष अर्ज करणे.

**५२.** (१) कलम ५१, पोस्ट-कलम (१) अन्वये संयुक्त समितीत सुचविलेल्या कोणत्याही बदलासंबंधी मालक व संघ यामध्ये कोणताही करार झाला असेल तेव्हा त्यांनी सही केलेले अशा कराराचे टिपण विहित रीतीने मालकाकडून निबंधक व कामगार अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात येईल आणि या अधिनियमाच्या सर्व तरतुदी, कलम ४४, पोट-कलम (१) अन्वये केलेल्या कराराच्या बाबतीत जशा लागू असतात त्याचप्रमाणे त्या अशा करारास लागू होतील.

(२) संयुक्त समितीत सुचविलेला बदल हा अनूसूची एक किंवा तीन मध्ये विनिदिष्ट न केलेल्या बाबीसंबंधी बदल आहे व तो तशाच किंवा विनिर्दिष्ट केलेल्या बदलानिशी करण्यात यावा व त्या बाबतीत संघ व मालक यांच्यामध्ये कोणताही करार करण्यात आला नाही, अशी सूचना (जिला यात यापुढे विशेष सूचना असे म्हटले आहे) कलम ५१, पोट-कलम (२) अन्वये निर्णय प्राप्त झाल्यापासून सात दिवसांच्या आत जर मालक किंवा संघ स्थानिक क्षेत्रातील उद्योगासाठी असलेल्या समेटकर्त्याकडे विहित केलेल्या नमुन्याप्रमाणे पाठवील तर, समेटकर्ता कलम ५५ अन्वये ठेवलेल्या नोंदवहीत त्या प्रकरणाची, औद्योगिक विवाद म्हणून ताबडतोब नोंद करील, आणि या अधिनियमाच्या तरतुदी त्या प्रकरणास जणू ते कलम ५४ अन्वये सादर केलेले निवेदन असावे त्याप्रमाणे लागू होतील.

(३) कलम ७८, पोस्ट-कलम (१), परिच्छेद अ, खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबीसंबंधी कलम ५१, पोट-कलम (२) अन्वये दिलेला निर्णय मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत मालक किंवा संघ, अशा बाबीसंबंधी एक विशेष अर्ज, अधिकारिता असलेल्या कामगार न्यायालयाकडे पाठवील तर, कामगार न्यायालय प्रकरण बाराच्या तरतुदींअन्वये विवादाचा निर्णय करण्यासाठी ताबडतोब कार्यवाही करील.

(४) पोट-कलम (२) अन्वये पाठविलेल्या प्रत्येक विशेष सूचनेची एक प्रत प्रमूख समेटकर्ता संबंधित स्थानिक क्षेत्रातील उद्योगासाठी असलेला समेटकर्ता, निबंधक, कामगार अधिकारी व विहित करण्यात येईल अशी इतर व्यक्ती यांच्याकडे पाठविण्यात येईल.

आपल्या प्रतिनिधींचा निर्णय संघ व मालक यांना बंधनकारक असणे.

**५३.** (१) संघ संयुक्त समितीत कामगारांचे प्रतिनिधी असलेल्या सदस्यांच्या संख्येच्या तीन चतुर्थांशापेक्षा कमी नाही इतक्या प्रमाणात (ज्यास यापुढे अधिकृत प्रमाण असे म्हटले आहे) असलेल्या सदस्यांस, समितीत मांडलेला कोणताही प्रस्ताव किंवा प्रस्तावांच्या वर्ग आपल्यावतीने स्वीकारण्यास अगर पाठविण्यास प्राधिकृत करू शकेल.

(२) मालक, समितीत आपले प्रतिनिधी म्हणून विशिष्ट प्रमाणात असलेल्या सदस्यांस, समितीत मांडण्यात आलेला कोणताही प्रस्ताव किंवा प्रस्तावांचा वर्ग आपल्यावतीने स्वीकारण्यात अगर फेटाळण्यास प्राधिकृत करु शकेल.

(३) समितीच्या निर्णयानंतर दोन महिन्यांच्या कालावधीत--

(अ) संघ, पोट-कलम (१) अनुसार कृती करील तेव्हा, ज्या प्रस्तावाच्या बाबतीत अधिकृत प्रमाणातील सदस्यास प्राधिकृत करण्यात आले असेल, तो प्रस्ताव स्वीकारण्याबाबत त्यांनी घेतलेल्या निर्णयाविरुध्द संबंधित कामगार किंवा संघ आणि

(ब) मालक, पोट-कलम (२) अनुसार कृती करील तेव्हा, प्राधिकृत प्रमाणात असलेल्या त्याच्या प्रतिनिधीच्या निर्णयाविरुध्द मालक,

कलम ४२ अन्वये कोणत्याही बदलाबद्दलची नोटीस देणार नाही किंवा कलम ५२ अन्वये कोणतीही विशेष सूचना किंवा अर्ज देणार किंवा करणार नाही.

(४) संघ पोट-कलम (१) अन्वये कृती करील तेव्हा तो आणि मालक जेव्हा पोट-कलम (२) अन्वये कृती करील तेव्हा तो, ती गोष्ट मुख्य समेटकर्ता, संबंधित स्थानिक क्षेत्रातील उद्योगासाठी असलेला समेटकर्ता व निबंधक यास कळवील.

प्रकरण दहा

## समेटासंबंधीची कार्यवाही

*विवादाचे प्रतिवृत्त निबंधक, मुख्य समेटकर्ता व समेटकर्ता यांच्याकडे पाठविणे.*

**५४.** (१) ज्या कोणत्याही प्रस्तावित बदलाबद्दल कलम ४२ अन्वये नोटीस देण्यात आली असेल, किंवा कलम, ४३ अन्वये सूचना किंवा विशेष नोटीस देण्यात आली असेल, अशा कोणत्याही बदलास, यथास्थिति, मालकाकडून किंवा कामगाराकडून हरकत घेण्यात आली असेल तर, ज्या पक्षाने अशी नोटीस, सूचना, अगर विशेष नोटीस दिली असेल त्याची असा बदल घडून यावा अशी अजूनही इच्छा असल्यास तो त्या प्रकरणाचे संपूर्ण निवेदन, विहित केलेल्या नमुन्याप्रमाणे, दुसऱ्या पक्षावर अशी नोटीस बजावल्याच्या किंवा अशी सूचना दिल्याच्या किंवा विशेष नोटीस बजावल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत अगर करार करण्यासाठी कलम ४४, पोट-कलम (१) अन्वये उभय पक्षांनी निश्चिम केलेल्या कालावधी संपल्यानंतर एक आठवड्याच्या आत, मुख्य समेटकर्ता आणि संबंधित स्थानिक क्षेत्रातील उद्योगधंद्यासाठी असलेला समेटकर्ता यांच्याकडे पाठवील.

**स्पष्टीकरण** :-- जर अशी नोटीस बजावल्याच्या किंवा सूचना दिल्याच्या किंवा विशेष नोटीस बजावल्याचा तारखेपासून सात दिवसांच्या आत, किंवा करार करण्यासाठी कलम ४४, पोट-कलम (१) अन्वये उभय पक्षांनी निश्चित केलेल्या कालावधीच्या आत कराराचे टिपण उक्त पोट-कलमान्वये निबंधकाकडे पाठविण्यात आले नसेल तर, या पोट-कलमाच्या प्रयोजनाकरिता, अशा बदलास, यथास्थिति, मालकाकडून किंवा कामगारांकडून हरकत घेण्यात आली आहे, असे समजण्यात येईल.

(२) जेव्हा अशा बदलाच्या बाबतीत कलम, ४३, पोट-कलम (५) अन्वये अधिसूचना काढण्यात आली असेल तेव्हा, अद्योगातील कोणत्याही मालकास किंवा कर्मचाऱ्यास अशी अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत उक्त अधिकायांकडे असे निवेदन पाठविता येईल.

*समेटाच्या कार्यवाहीचा प्रारंभ.*

**५५.** कलम ५४ अन्वये प्रकरणाचे निवेदन मिळाल्यावर समेटकर्ता कलम ६४ च्या तरतुदीमुळे ज्या बाबतीत समेट संबसंधीची कार्यवाही सुरु करता येणार नाही त्याव्यतिरिक्त इतर बाबतीत, [१] [ एक आठवडाच्या आत] अशा औद्योगिक विवादाची नोंद त्या प्रयोजनार्थ ठेवलेल्या नोंदवहीत करील, आणि त्यानंतर समेटासंबंधीची कार्यवाही [२][अशी नोंद नोंदवहीत झाल्याच्या तारखेपासून ] सुरु झाली असे मानण्यात येईल. [२] [ ही तारीख समेटकर्ता संबंधित पक्षांस कळवील.]

*समेटाची कार्यवाही.*

**५६.** (१) समेटकर्ता समेटासंबंधीची कार्यवाही विहित रीतीने चालवील.

(२) औद्योगिक विवादाची मिटवणूक घडवून आणण्याचा प्रयत्न करणे हे समेटकर्त्याचे कर्तव्य असेल, आणि या प्रयोजनाकरिता समेटकर्ता विवादाची व त्याच्या गुणवत्तेला परिणामक ठरणाऱ्या सर्व बाबींची चौकशी करील, तसेच त्यास विवादाची न्याय्य व सलोख्याची मिटवणूक व्हावी म्हणून उभयपक्षांची मने वळविण्याच्या कामी त्यास योग्य वाटतील त्या सर्व गोष्टी करता येतील. तसेच उभयपक्षांत मिटवणूक घडून येण्यासाठी किंवा कोणत्याही इतर कारणासाठी त्याच्या मते पुरेशा अशा कोणत्याही कालावधीपर्यंत मिटवणुकीसंबंधी चालविलेली कार्यवाही तहकूब करता येईल.

*मुख्य समेटकर्त्यांचा मध्ये पडण्याचा अधिकार.*

**५७.** (१) इतर समेटकर्त्याने समेटासंबंधी चालविलेल्या कोणत्याही कार्यवाहीत, ती ज्या कोणत्याही टप्प्यावर असेल त्या टप्प्यात मुख्य समेटकर्त्याने मध्ये पडणे किंवा कोणत्याही समेटकर्त्यांस मध्ये पडण्याविषयी निदेश देणे, हे विधिसंमत असेल, आणि त्यानंतर मुख्य समेटकर्ता किंवा अशा रीतीने निदेश देण्यात आलेला समेटकर्ता समेटाची कार्यवाही अशा समेटकर्त्याच्या मदतीने किंवा मदतीवाचून पुढे चालवील.

(२) मुख्य समेटकर्त्यास, समेटासंबंधीच्या कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर त्यास योग्य वाटतील असे निदेश कोणत्याही समेटकर्त्याला वेळोवेळी देता येतील.

---

[१] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम १५ (१) अन्वये "तांबडतोब" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १५ (२) अन्वये मूळ शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

मिटवणूक व प्रतिवेदन.

**५८.** (१) जर समेटासंबंधीच्या कार्यवाहीत औद्योगिक विवादासंबंधी मिटवणूक घडून आली तर समेटकर्ता अशा मिटवणुकीचे टिपण विहित नमुन्यात तयार करील व त्यावर मालक आणि कामगार प्रतिनिधी सह्या करतील. समेटकर्ता अशा कार्यवाहीचे प्रतिवृत्त मिटवणुकीच्या टिपणाच्या प्रतिसह निबंधक व मुख्य समेटकर्ता यांच्याकडे पाठवील निबंधक अशा मिटवणुकीची नोंद कराराच्या नोंदवहित करील व नंतर तो अशी मिटवणूक विहित रितीने प्रसिध्द करील. अशा मिटवणुकीत ज्या कोणत्याही बदलासंबंधी एकमत झाले असेल, तो बदल अशा मिटवणुकीत ज्या तारखेविषयी एकमत झाले असेल अशा तारखेपासून प्रवर्तनात येईल आणि जेव्हा अशा तारखेविषयी एकमत झाले नसेल तेव्हा, नोंदवहीत मिटवणुकीची ज्या तारखेस नोंद करण्यात आली असेल त्या तारखेपासून अंमलात येईल.

(२) जर अशी कोणतीही मिटवणूक घडून आली नाहीतर, समेटकर्ता त्याच्यापुढे चालू असलेली कार्यवाही संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर मुख्य समेटकर्त्याकडे संपूर्ण हकिकतीचे एक प्रतिवेदन सादर करील. अशा प्रतिवेदनात विवादासंबंधीची वस्तूस्थिती व परिस्थिती याबद्दल खातरजमा करण्यासाठी त्याने केलेली उपाययोजना व त्यांच्या मते ज्या कारणांमुळे मिटवणूक होऊ शकली नाही ती कारणे नमूद करण्यात येतील :

परंतु, असा समेटकर्ता हा मुख्य समेटकर्ता असेल तेव्हा, तो असे प्रतिवेदन [१] [राज्य] शासनाकडे पाठवील.

(३) मुख्य समेटकर्ता, पोट-कलम (२) अन्वये त्यास सादर करण्यात आलेले प्रतिवेदन, त्यास योग्य वाटेल अशा अभिप्रायासह [१] [राज्य] शासनाकडे पाठवील.

(४) [१] [राज्य] शासन, विवादाची बाब मंडळाकडे निर्देशित करण्यात आली असेल किंवा विवादातील पक्षांनी अशा विवादाच्या बाबतीत विनंतीपत्र सादर केले असेल तर ते खेरीज करून एरव्ही पोट-कलम (२) च्या परंतुकान्वये किंवा पोट-कलम (३) अन्वये त्यास सादर करण्यात आलेले समेटकर्त्याचे किंवा मुख्य समेटकर्त्याचे प्रतिवेदन प्रसिध्द करील.

[२][(४-अ) या कलमात काहीही अंतर्भूत असेल तरी, जेव्हा एखाद्या औद्योगिक विवादात अंतर्भूत असलेल्या औद्योगिम बाबींपैकी काही बाबीपुरती अशा विवादाची मिटवणूक झाली असेल आणि इतर बाबींसंबंधी मिटवणूक झालेली नसेल आणि ज्या औद्योगिक बाबीसंबंधी अशारीतीने मिटवणूक घडून आली आहे त्या बाबीसंबंधी मिटवणूक अंमलात येईल असा लेखी करार उभयपक्षात झाला असेल तेव्हा, उक्त औद्योगिक बाबींच्या मिटवणुकीची नोंदणी करण्यात येईल आणि ज्या औद्योगिक बाबींसंबंधी मिटवणूक झाली नाही त्या बाबींचे प्रतिवेदन या कलमाच्या तरतुदींअनुसार पाठविण्यात येईल.]

(५) समेटकर्ता आपल्यापुढे चालू असलेली कार्यवाही संपण्यापूर्वी विवादाची बाब लवादीसाठी सादर करण्यास उभयपक्ष तयार आहेत किंवा कसे, याबाबत त्यांच्याकडून खातरजमा करून घेईल.

(६) (अ) वरील पोट-कलमात काहीही अंतर्भूत असेल तरी, समेटासंबंधीच्या कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर विवादाची बाब लवादीसाठी सादर करण्याविषयी उभयपक्षांमध्ये लेखी करार झाला तर, असा करार कलम ६६ च्या अर्थानुसार विनंतीपत्रक आहे असे समजण्यात येईल.

(ब) लवादीचे काम कामगार न्यायालयाने किंवा औद्योगिक न्यायालयाने करण्याबाबत करारामध्ये तरतूद करण्यात आली असेल तेव्हा समेटकर्ता विवादाची बाब यथास्थिति, कामगार न्यायालयाकडे किंवा औद्योगिक न्यायालयाकडे ताबडतोब निर्देशीत करील.

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम ११ अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

**५९.** (१) [1][राज्य] शासन कोणत्याही वेळी तसेच समेटकर्त्यापुढील कार्यवाहीच्या प्रारंभापूर्वी किंवा मिटवणूक घडून आणण्याचा त्याचा प्रयत्न निष्फळ झाल्यानंतर दोन्ही पक्षांची संमती असेल तेव्हा, असा विवाद अशा मंडळाकडे निर्देशित करील आणि त्यानंतर मंडळापुढे असलेली समेटासंबंधी कार्यवाही ही विवादाची बाब अशा रीतीने ज्या तारखेस निर्देशित केली असेल त्या तारखेपासून सुरू झाली असे मानण्यात येईल. मंडळाकडे निर्देशित करणे.

(२) विवादाची बाब अशा रीतीने निर्देशित करण्यात आल्यावर, मंडळ विवादातील पक्षांस विहित रीतीने नोटीस देऊन अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वेळी व जागी आपल्यापुढे हजर राहण्याविषयी त्यास कळवील. अशा नोटिशीची एक प्रत कामगार अधिकाऱ्याकडे पाठविण्यात येईल.

(३) नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा मंडळाकडून ठरविण्यात येईल अशा इतर तारखेस मंडळ समेटाची कार्यवाही चालवील. औद्योगिक विवादाची मिटवणूक घडवून आणण्याचा प्रयत्न करणे हे या मंडळाचे कर्तव्य असेल. आणि कलमे ५५, ५६, ५८, यांच्या तरतुदी शक्य तेथवर मंडळापुढे चालू असलेल्या कार्यवाहीस लागू होतील.

**६०.** (१) यथास्थिति, समेटकर्ता किंवा मंडळ या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, समेटासंबंधीच्या कार्यवाहीत, विहित करण्यात येईल अशा कार्यपध्दतीस अनुसरून कृती करील. कार्यपध्दती आणि समेटकत्याचे व मंडळाचे अधिकार.

(२) समेटकर्त्यापुढील कार्यवाह्या गुप्तरीत्या चालविण्यात येतील व मंडळापुढील कोणतीही कार्यवाही मंडळ ठरवील त्याप्रमाणे उघडपणे किंवा गुप्तरीत्या चालविता येईल.

(३) जर औद्योगिक विवादातील पक्षकार किंवा समेटासंबंधीच्या चालू कार्यवाहीत कोणतीही माहिती देणारा किंवा कोणताही दस्तऐवज हजर करणारा साक्षीदार किंवा कोणतीही इतर व्यक्ती अशी माहिती किंवा अशा दस्तऐवजातील मजकूर गोपनीय राखण्यात यावा अशी लेखी विनंती यथास्थिति, समेटकर्त्यास किंवा मंडळास करील तर, समेटकर्ता किंवा मंडळ अशी माहिती किंवा दस्तऐवज गोपनीय समजण्यात यावा, असा निदेश देईल :

परंतु, समेटकर्त्यास किंवा मंडळास अशी माहिती किंवा अशा दस्तऐवजातील मजकूर दुसऱ्या पक्षास उघड करण्यात परवानगी देता येईल.

(४) पोट-कलम (३) मध्ये जी तरतूद केली असेल ती खेरीज करून समेटकर्ता किंवा मंडळाचा कोणताही सदस्य किंवा समेटासंबंधीच्या कार्यवाहीत हजर असणाऱ्या किंवा त्याच्याशी संबंध असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, पोट-कलम (३) अन्वये ज्या बाबत विनंती करण्यात आली आहे अशी कोणतीही माहिती किंवा अशा कोणत्याही दस्तऐवजातील मजकूर, उक्त पोट-कलमान्वये विनंती करणाऱ्या पक्षकाराच्या लेखी संमतीवाचून उघड करता येणार नाही.

(५) या कलमातील कोणताही मजकूर, या अधिनियमाखालील किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याखालील खटल्याच्या प्रयोजनार्थ कोणतीही माहिती किंवा कोणत्याही दस्तऐवजातील मजकूर उघड करण्याच्या बाबतीत लागू होणार नाही.

**६१.** समेटकर्त्यास किंवा मंडळास, समेटासंबंधीच्या कोणत्याही कार्यवाहीत त्याच्यापुढे उद्‌भवलेला कोणताही कायदेविषयक प्रश्न औद्योगिक न्यायालयाकडे निर्णयासाठी निर्देशित करता येईल. अशा कार्यवाहीत समेटकर्त्याने किंवा मंडळाने दिलेला कोणताही आदेश अशा निर्णयास अनुसरून असेल. समेटकर्त्याने किंवा मंडळाने औद्योगिक न्यायालयाकडे निर्देश करणे.

[1] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

समेटाच्या कार्यवाहीच्या टप्प्यांकरिता कालमर्यादा.

**६२.** (१) [1][राज्य] शासन **शासकीय राजपत्रात** अधिसूचना केलेल्या सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे या प्रकरणांन्वये तरतूद केलेल्या समेटविषयक कार्यवाहीचा प्रत्येक टप्पा ज्या कालमर्यादेत पूर्ण झाला पाहिजे ती कालमर्यादा निश्चित करील :

परंतु, समेटाच्या कार्यवाहीचे सर्व टप्पे पूर्ण होण्यासाठी निश्चित केलेली एकूण कालमर्यादा ही समेटकर्त्याने कलम ५५ अन्वये अशा विवादाची नोंद नोंदवहीत ज्या तारखेस केली असेल त्या तारखेपासून किंवा कलम ५९ अन्वये अशा विवादाची बाब मंडळाकडे ज्या तारखेस पाठविण्यात आली असेल त्या तारखेपासून एक महिन्यापेक्षा अधिक असता कामा नये.

परंतु, आणखी असे की, [1][राज्य] शासनास असा एक महिन्याचा अवधी, एका वेळी आणखी पंधरा दिवसाच्या कालावधीने वाढविता येईल. परंतु कोणत्याही बाबतीत एकूण अवधी दोन महिन्यांहून अधिक असता कामा नये.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही औद्योगिक विवादातील पक्षास कोणत्याही बाबतीत समेटाच्या कार्यवाहीचा कोणताही टप्पा पूर्ण होण्यासाठी ठरविलेला अवधी आणखी वाढविण्यासाठी मान्यता देता येईल आणि असा वाढीस अवधी उक्त पोट-कलमातील उल्लेख केलेला अवधी मोजताना हिशेबात धरण्यात येणार नाही :

[2][परंतु समेटाची कार्यवाही पूर्ण होण्यासाठी लागणारा एकूण कालावधी हा पक्षांनी आपसात ठरविलेला वाढीव कालावधी धरून एक वर्षाहून अधिक असता कामा नये :

परंतु आणखी असे की, राज्य शासनास उक्त एक वर्षाचा कालावधी हा एका वेळी एक महिन्यांच्या कालावधीने आणखी वाढविता येईल. परंतु कोणताही बाबतीत असा कालावधी एकूण दोन महिन्याहून अधिक असता कामा नये.]

[3][(३) जेव्हा समेटकर्ता किंवा मंडळ कलम ६१ अन्वये एखादा कायदेविषयक प्रश्न औद्योगिक न्यायालयाकडे निर्णयासाठी निर्देशित करील, तेव्हा असा प्रश्न ज्या तारखेस निर्देशित करण्यात आला ती तारीख व औद्योगिक न्यायालयाचा निर्णय, समेटकर्त्यास किंवा यथास्थिति, मंडळास ज्या तारखेस कळविण्यात आला असेल ती तारीख, या दोहोंमधील कालावधी, पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केलेला कालावधी मोजताना वगळण्यात येईल.]

समेटाच्या कार्यवाहीची समाप्ती.

**६३.** समेटाची कार्यवाही--

(एक) जेव्हा समेटाच्या कामकाजात घडून आलेल्या मिटवणुकीच्या टिपणांवर कलम ५८, पोट-कलम (१) अन्वये उभयपक्षांच्या सह्या होतील तेव्हा, किंवा

(दोन) जेव्हा अशा विवादाची बाब लवादासाठी सादर करण्याबद्दल उभय पक्ष लेखी संमती देतील तेव्हा, किंवा

(तीन) कोणतीही मिटवणूक घडून न आल्यास, समेटकर्त्याचे किंवा मंडळाचे प्रतिवेदन [1] [राज्य ] शासनाकडून प्रसिध्द करण्यात येईल, तेव्हा, किंवा

(चार) जेव्हा कलम ६२ अन्वये अशी कार्यवाही पूर्ण करण्यासाठी निश्चित केलेली कालमर्यादा संपली असेल तेव्हा,

समेटासंबंधीची कार्यवाही पूर्ण झाली आहे असे मानण्यात येईल.

[4][**स्पटीकरण**:-- जेव्हा औद्योगिक विवादाची मिटवणूक त्यात अंतर्भूत असलेल्या काही औद्योगिक बाबींपुरतीच झाली असेल तेव्हा मिटवणुकीची कार्यवाही या कलमाच्या अर्थानुसार फक्त त्या बाबीपुरतीच पूर्ण झाली आहे, असे मानण्यात येईल.]

---

[1] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[2] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम १६ (१) अन्वये ही परंतुके जादा दाखल करण्यात आली.

[3] वरील अधिनियमाच्या कलम १६ (२) अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[4] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम १२ अन्वये हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

**६४.** (अ) (एक) जर विवादाशी प्रत्यक्ष संबंध असलेल्या कामागारांचा प्रतिनिधी नोंदणीकृत संघ असून तो अशा विवादाबाबत सादर केलेल्या विनंतीपत्रकातील अगर ज्या औद्योगिक बाबीसंबंधी विवाद उद्भवला असेल, त्यासारख्या औद्योगिक बाबीसंबंधीच्या विवादाबाबत सादर केलेल्या विनंतीपत्रकातील एक पक्ष असेल तर ; विवक्षित प्रकरणांत समेटाच्या कार्यवाह्या सुरु न करणे किंवा पुढे न चालविणे.

(दोन) जर कलम ७२ [१][किंवा ७३] च्या तरतुदीअन्वये विवादाची बाब लवादासाठी निर्देशित करण्यात आली असेल तर ;

(तीन) कलम ११४, पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या निदेशामुळे [२][किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही इतर तरतुदीमुळे] संबंधित मालक व कामगार अशा विवादाच्या बाबतीत नोंदलेल्या कराराने, मिटवणुकीने, विनंतीपत्रकाने किंवा निवाड्याने बांधले गेले असतील तर,

अशा औद्योगिक विवादाच बाबतीत कोणत्याही समेटाची कार्यवाही सुरु करण्यात येणार नाही.

(ब) ज्या तारखेस--

(एक) कलम ५८ किंवा ६६ अन्वये संबंधित मालकाने व कामगारानी अशा विवादासंबंधी विनंती पत्रक सादर केले असेल ;

(दोन) तो विवाद कलम, ७२ [३][७३ किंवा ७३-अ] अन्वये लवादीसाठी [४][ किंवा कलम ८६-क किंवा ८६-कक अन्वये वेतन मंडळाकडे ] निर्देशित करण्यात आला असेल, किंवा

(तीन) खंड (अ), उपखंड (तीन) मध्ये उल्लेख केलेला निदेश देण्यात आला असेल ;

त्या तारखेनंतर औद्योगिक विवादासंबंधी कोणत्याही समेटाची कार्यवाही पुढे चालविण्यात येणार नाही.

**६५.** कलम ६४, खंड (ब) अन्वये खंडीत करण्यात आलेली समेटाची कार्यवाही उक्त खंडात उल्लेख केलेल्या तारखेस पूर्ण झाली आहे असे मानण्यात येईल आणि प्रतिवेदने सादर करणे, पाठविणे व प्रसिध्द करणे यासंबंधी कलम ५८ च्या तरतुदी समेटाच्या अशा कार्यवाहीस लागू होतील. खंडीत करण्यात आलेली समेटाची कार्यवाही पूर्ण झाली आहे असे मानणे.

---

[१] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम १७ अन्वये " ७३ किंवा ७३-अ" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५, कलम १० (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १० (२) अन्वये " किंवा ७३" या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आल.

[४] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम २७ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

## प्रकरण अकरा

## लवाद

सादर निवेदन.

**६६.** (१) कोणताही मालक व प्रतिनिधिक संघ किंवा कामगार प्रतिनिधी असलेला कोणताही इतर नोंदणीकृत संघ यांना कोणताही विद्यमान किंवा भावी औद्योगिक विवाद किंवा अशा विवादांचा वर्ग कोणत्याही व्यक्तीकडे लवादीसाठी पाठविण्याविषयी लेखी करार करता येईल-- मग अशा करारात लवादाचे नाव निर्दिष्ट केलेले असो वा नसो-- अशा करारास सादर निवेदन असे म्हणता येईल :

(२) असा विवाद कामगार न्यायालयाकडे किंवा औद्योगिक न्यायालयाकडे लवादीसाठी पाठविण्यात यावा, अशी विनंती सादर निवेदनात करता येईल.

[1][परंतु जेव्हा या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीअन्वये असा कोणताही विवाद निर्णयासाठी कामगार न्यायालयाकडे निर्देशित करणे आवश्यक असेल तेव्हा ती लबादीसाठी औद्योगिक न्यायालयाकडे निर्देशित करण्यात यावा अशी विनंती सादरनिवेदनात करता येणार नाही.]

(३) अशा प्रत्येक सादर निवेदनाची एक प्रत निबंधकाकडे पाठविण्यात येईल. निबंधक त्या प्रयोजनाकरिता ठेवलेल्या नोंदवहीत त्याची नोंद करील आणि तो, विहित करण्यात येईल अशा रीतीने तो प्रसिध्द करील.

सादर निवेदन केव्हा रद्द करता येईल.

**६७.** प्रत्येक सादर निवेदन हे त्यात तद्विरुध्द कोणतीही तरतूद नसल्यास रद्द करता येणार नाही:

परंतु, भावी विवाद लवादासाठी निर्देशित करण्यासाठी केलेले सादर निवेदन हे, अशा सादर निवेदनातील कोणत्याही एका पक्षास, दुसऱ्या पक्षास सहा महिन्यांची लेखी नोटीस देऊन कोणत्याही वेळी रद्द करता येईल:

परंतु, आणखी असे की, असा सहा महिन्यांचा कालावधी संपण्यापूर्वी उभयपक्षांमध्ये असे सादर निवेदन ते आपसात ठरवतील अशा आणखी कालावधीपर्यंत चालू ठेवण्याविषयी, करार करता येईल.

लवादी संबंधीची कार्यवाही.

**६८.** या प्रकरणान्वये चालवावयाची लवादीसंबंधीची कार्यवाही ही लवादी अधिनियम, १९४० याच्या तरतुदी १९४० चा १ जेथवर लागू होतील तेथवर त्यास अनुसरून चालविण्यात येईल. आणि उक्त तरतुदींन्वये दिवाणी न्यायालयास ज्या अधिकारांचा वापर करता येईल त्या अधिकारांचा वापर कामगार न्यायालयास व औद्योगिक न्यायालयास करता येईल.

एखादी विशेष बाब औद्योगिक न्यायालयकडे निर्णयासाठी पाठविणे.

**६९.** लवादास, या अधिनियमान्वये चालविलेल्या कोणत्याही कार्यवाहीत आपल्यापुढे उद्भवलेला कोणताही कायदेविषयक प्रश्न औद्योगिक न्यायालयाकडे निर्णयासाठी पाठविता येईल. लवादाने दिलेला कोणताही निवाडा अशा निर्णयानुसार असेल.

---

[1] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३, कलम १२ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

**लवादाने निवाडा देणे.**

**७०.** लवाद संबंधित पक्षाचे म्हणणे ऐकून घेऊन निवाडा देईल व त्यावर त्याची सही करील.

**लवाद न नेमल्यास विवाद कामगार न्यायालयाकडे किंवा औद्योगिक न्यायालयाकडे निर्देशित करणे.**

**७१.** या प्रकरणात काहीही अंतर्भूत असले तरी, जर कोणत्याही सादर निवेदनात लवाद नेमण्याविषयी कोणातीही तरतूद करण्यात आली नसेल किंवा कोणत्याही परिस्थितीमुळे लवाद नेमण्यात आला नसेल तर, असा विवाद [१][राज्य] शासन ठरवील त्याप्रमाणे कामगार न्यायालयाकडे किंवा औद्योगिक न्यायालयाकडे लवादीसाठी निर्देशित करण्यात येईल.

**[१][राज्य] शासनास कामगारा-कामगारामधील विवाद लवादीसाठी कामगार न्यायालयाकडे किंवा औद्योगिक न्यायालयाकडे निर्देशित करता येतील.**

**७२.** (१) या अधिनियमात यापूर्वी काहीही अंतर्भूत असले तरी [१] [राज्य ] शासनास कामगार अधिकाऱ्याच्या प्रतिवेदनावरून किंवा स्वतः होऊन कामगार-कामगारांमधील कोणताही औद्योगिक विवाद लवादीसाठी कामगार न्यायालयाकडे किंवा औद्योगिक न्यायालयाकडे कोणत्याही वेळी निर्देशित करता येईल.

(२) या प्रकरणाच्या तरतुदी, विहित करण्यात येतील अशा फेरफारासंह, अशा लवादीस लागू होतील.

(३) अशा कामगारांच्या मालकांना अशा लवादीत, विहित रीतीने पक्षकार करून घेण्यात येईल.

**[१][राज्य] शासनास औद्योगिक विवाद लवादीसाठी औद्योगिक न्यायालयाकडे निर्देशित करता येईल.**

**७३.** कामगार अधिकाऱ्याने केलेल्या प्रतिवेदनावरून किंवा अन्यथा [१][राज्य ] शासनाची अशी खात्री होईल की,--

(१) विवाद चालू राहिल्यामुळे--

(अ) गंभीर अव्यवस्था माजण्याचा किंवा सार्वजनिक शांततेचा भंग होण्याचा संभव आहे ; किंवा

(ब) समाजातील बहुसंख्य लोकांचे गंभीर व दीर्घकाळपर्यंत हाल होण्याचा संभव आहे ; किंवा

(क) संबंधित उद्योगावर गंभीर परिणाम होण्याचा संभव आहे, किंवा अशा उद्योगातील संभाव्य संधी व नोकरीत वाव मिळण्याची शक्यता कमी होण्याचा संभव आहे ; किंवा

(२) इतर उपायांनी विवादाची मिटवणूक होण्याचा संभव नाही ; किंवा

(३) तसे करणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे ;

तर या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी [१][राज्य ] शासनास, कोणत्याही वेळी असा औद्योगिक विवाद लवादीसाठी औद्योगिक न्यायालयाकडे निर्देशित करता येईल.

---

[१] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

कामगार किंवा औद्योगिक न्यायालयाकडे सोपविण्यात आलेल्या बाबीत इतर उपक्रमांच्या बाबी समाविष्ट करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

[१] [**७३-अअ.** एखाद्या उद्योगातील किंवा त्याच्या विभागातील कोणत्याही उपक्रमाशी संबंधित असलेला औद्योगिक विवाद कलम ७२ किंवा ७३ अन्वये कामगार न्यायालयाकडे किंवा औद्योगिक न्यायालयाकडे निर्देशित करण्यात आला असेल किंवा करावयाचा असेल आणि राज्य शासनाकडे याबाबतीत करण्यात आलेल्या अर्जावरून किंवा अन्यथा राज्य शासनाच्या मते, त्या उद्योगातील किंवा त्याच्या विभागातील तशाच स्वरुपाच्या उपक्रमाचा किंवा उपक्रमांच्या गटाचा किंवा वर्गाचा अशा विवादात हितसंबंध असणे संभवनीय असेल किंवा त्यामुळे त्याच्यावर परिणाम होण्याचा संभव असेल तर राज्य शासनास असा विवाद निर्देशित करण्याच्या वेळी किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी परंतु निवाडा देण्यापूर्वी त्या निर्देशित अशा उपक्रमाचा, उपक्रमांच्या गटांचा किंवा वर्गाचा किंवा त्याच्या भागाचा समावेश करता येईल, मग असा समावेश करण्याच्या वेळी त्या आस्थापनेत, उपक्रमांच्या गटात किंवा वर्गात किंवा त्याच्या विभागात कोणताही विवाद अस्तित्वात असो वा नसो किंवा विवाद होण्याचा शक्यता असो वा नसो.]

संघांनी लवादीसाठी औद्योगिक विवाद निर्देशित करणे.

[२][**७३-अ** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी [३][ एखाद्या मालकास किंवा ] जो नोंदणीकृत संघ कामगारांचा प्रतिनिधी असेल तसेच जो मान्यताप्राप्त संघ असेल त्या संघास कोणताही औद्योगिक विवाद लवादीसाठी औद्योगिक न्यायालयाकडे निर्देशित करता येईल :

परंतु असा कोणताही विवाद--

(एक ) समेटकर्त्यापुढे चालू असलेली कार्यवाही पूर्ण झाल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांनंतर ;

[४] [ (दोन) जेव्हा नोंदणीकृत संघाचे किंवा यथास्थिति, मालकाने असा विवाद या अधिनियमान्वये लवादीसाठी सादर करण्याविषयी आपली तयारी समेटकर्त्यापुढे लेखी दर्शविली असेल, आणि मालकाने किंवा यथास्थिति, संघाने तसे करण्यास कबुली दिली नसेल तेव्हा ;]

(तीन) विवाद प्रथम समेटकर्त्यास सादर केल्यावाचून व समेटाची कार्यवाही पूर्ण झाल्यावाचून अगर विवादाची मिटवणूक समेटाद्वारे होणे शक्य नाही, असे प्रमाणपत्र समेटकर्त्याने दिल्यावाचून ;

औद्योगिक न्यायालयाकडे निर्देशित करण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, जेव्हा या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीन्वये असा कोणताही विवाद निर्णयासाठी कामगार न्यायालयाकडे निर्देशित करणे आवश्यक असेल तेव्हा, तो औद्योगिक न्यायालयाकडे निर्देशित करता येणार नाही. ]

पक्षांना निवाड्याची नोटीस.

**७४.** (१) यथास्थिति, लवाद, कामगार न्यायालय, किंवा औद्योगिक न्यायालय आपण दिलेल्या निवाड्याच्या प्रति उभयपक्षांकडे तसेच कामगार आयुक्त व निबंधक यांच्याकडे पाठवील.

(२) अशा निवाड्याची प्रत मिळाल्यानंतर निबंधक त्या निवाड्याची नोंद त्या प्रयोजनासाठी ठेवलेल्या नोंदवहीत करील, आणि तो, तो निवाडा विहित करण्यात येईल अशा रीतीने प्रसिध्द करील.

---

[१] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम २८ अन्वये कलम ७३-अअ समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम १८ अन्वये कलम ७३-अ हे मूळ कलमाऐवजी दाखल करण्यात आले.

[३] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम २९ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २९ (ब) अन्वये मूळ खंड (२) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

**७५.** [१] [कलम ११८-ब मध्ये जी कोणतीही तरतूद केली असेल ती बेरीज करून] निवाडा, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या तारखेस प्रवर्तनात येईल किंवा अशी कोणतीही तारीख त्यात विनिर्दिष्ट करण्यात आली नसेल तेव्हा, कलम ७४ अन्वये ज्या तारखेस तो प्रसिध्द करण्यात येईल, त्या तारखेस प्रवतनात येईल.

निवाडा ज्या तारखेस प्रवर्तनात येईल ती तारीख.

**७६.** लवादीची कार्यवाही ही, कलम ७४ अन्वये निवाडा प्रसिध्द करण्यात आल्यावर पूर्ण झाली आहे, असे मानण्यात येईल.

लवादी कार्यवाहीची समाप्ती.

[२] [ **७६-अ.** (१) कलमे ७४ ते ७६ (दोन्ही धरून) यांत काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा एखादा उद्योग [३][ राज्य] शासनाच्या विभागाकडून चालविण्यात येत असेल आणि अशा उद्योगाशी निवाड्याचा संबंध येत असेल तेव्हा, पोट-कलम (२) व (३) यांत जी कार्यपध्दती विनिर्दिष्ट केली असेल ती अनुसरल्यावाचून कोणताही निवाडा परिणामक होणार नाही.

[३][राज्य] शासनाशी संबंध येणारे निवाडे परिणामात्मक करण्याची कार्यपध्दती.

(२) लवाद कामगार न्यायालय किंवा औद्योगिक न्यायालय आपली कार्यवाही पूर्ण झाल्यावर शक्य तितक्या लवकर, आपण केलेला निवाडा [३] [राज्य ] शासनाला सादर करील, आणि त्यानंतर [३][राज्य], शासन, लेखी आदेशाद्वारे, असा [४] [निवाडा] बंधनकारक असल्याचे घोषित करील:

परंतु जेव्हा संपूर्ण निवाडा किंवा त्याचा कोणताही भाग परिणामक करणे हे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने इष्ट नाही, असे [३] [ राज्य] शासनाचे मत असेल तेव्हा, [३] [राज्य] शासन पहिली संधी मिळताच असा [४] [निवाडा ] व तसेच वर सांगितल्याप्रमाणे निवाड्याबाबत अधिकथन आपण का केले नाही याविषयीच्या आपल्या कारणांचे निवेदन [३] [राज्य] विधानसभेपुढे ठेवील आणि [४] [निवाड्याचा ] विचार व्हावा म्हणून शक्य तितक्या लवकर, विधानसभेत ठराव आणण्याची तजवीज करील; त्यानंतर विधानसभेत ठरावाद्वारे असा [४] [ निवाडा] कायम करता येईल, त्यात फेरफार करता येईल किंवा तो नामंजूर करता येईल.

(३) पोट-कलम (२) च्या परंतुकान्वये ठराव संमत करण्यात आल्यावर अशा ठरावाद्वारे निवाडा नामंजूर करण्यात आला नसेल तर, [३][राज्य ] शासन लेखी आदेशाद्वारे असा निवाडा उक्त ठरावावरुन, कायम करण्यात आला असेल किंवा यथास्थिति, त्यात फेरबदल करण्यात आला असेल त्या स्वरुपात तो बंधनकारक आहे असे घोषित करील.]

## प्रकरण बारा

## कामगार न्यायालये

**७७.** कामगार न्यायालयांची प्रादेशिक अधिकारिता ही, ज्या स्थानिक क्षेत्रासाठी त्यांची रचना करण्यात आली आहे, त्या क्षेत्रापुरती असेल.

प्रादेशिक अधिकारिता.

---

[१] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ३० अन्वये "निवाडा" या शब्दापूर्वी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३, कलम १४ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[३] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५, कलम ११ अन्वये "निर्णय" या शब्दाऐवजी "निवाडा" हा शब्द दाखल करण्यात आला.

कामगार न्यायालयाचा अधिकार.

**७८.** (१) कामगार न्यायालयास पुढील गोष्टी करण्याचा अधिकार असेल :-

**अ.** पुढील विवादांचा निर्णय करणे :-

(अ) [1] [(एक) स्थायी आदेशान्वये कृती करणाऱ्या किंवा कृती करीत असल्याचे दिसून येणाऱ्या मालकाने दिलेल्या आदेशाने औचित्य, कायदेशीरपणा याविषयी उद्‌भवलेल्या विवादांचा निर्णय करणे ;

(दोन) स्थायी आदेश लागू करणे व त्यांचे अर्थविवरण याविषयी उद्‌भवलेल्या विवादांचा निर्णय करणे ;

(तीन) अनुसूचि तीनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या औद्योगिक बाबीसंबंधी [2] [त्यातील बाब (५) बेरीज करून] मालकाने केलेला किंवा कामगारास पाहिजे असलेला कोणताही बदल आणि अशा बदलापासून उद्‌भवणाऱ्या बाबी यासंबंधी विवादांचा निर्णय करणे ;

(ब) (एक) कलम ७१ किंवा ७२ अन्वये त्याच्याकडे पाठविलेल्या औद्योगिक विवादांचा निर्णय करणे ;

(दोन) ज्या औद्योगिक विवादांच्या संबंधात त्यास सादरनिवेदनाद्वारे लवाद म्हणून नेमण्यात आले असेल अशा विवादांचा निर्णय करणे ;

(क) एखादा संप, टाळेबंदी [3] [कामसंदी, कामरोध] किंवा कोणताही बदल या अधिनियमान्वये बेकायदेशीर आहे किंवा कसे याविषयी निर्णय देणे ;

**ब.** या अधिनियमान्वये शिक्षेस पात्र असलेल्या अपराधांची संपरीक्षा करणे आणि सिध्दापराध ठरविण्यात आले असता भरपाईची तरतूद करण्यात आली असेल तेव्हा भरवाईची रक्कम निर्धारित करणे व ती देण्याबद्दल आदेश देणे ;

**क.** कोणत्याही मालकास--

(अ) जो कोणताही बदल, कामगार न्यायालयाने बेकायदेशीर ठरविला असेल, ती मागे घेण्यास किंवा [4] [ज्या कोणत्याही कार्यवाहीतील ज्या कोणत्याही फेरबदलाचा बेकायदेशीरपणा हा वादग्रस्त मुद्दा असेल त्या कार्यवाहीचा अंतिम निर्णय होईपर्यंत फेरबदल तात्पुरता मागे घेण्यात ] फर्मविणे किंवा ;

(ब) या अधिनियमान्वये कामगार न्यायालयापुढे चालू असलेल्या कोणत्याही कामात जो कोणताही बदल वादविषय झाला असेल तो अंमलात आणण्यास फर्माविणे ;

[5] [**ड.** जर मालकाने एखाद्या कामगारास बडतर्फ करण्यासंबंधी सेवामुक्त करण्यासंबंधी, त्यास काढून टाकण्यासंबंधी, त्यास कामावरून कमी करण्यासंबंधी किंवा त्याची सेवा समाप्त करण्यासंबंधी किंवा त्यास निलंबित करण्यासंबंधी काढलेले आदेश,--

(एक) कामगाराने केलेल्या चुकीमुळे किंवा गैरवर्तणुकीमुळे काढलेला असेल आणि जी चूक असा आदेश काढल्याच्या तारखेच्या सहा महिने आधी मालकांच्या निदर्शनास आली असेल ; किंवा

---

[1] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम १९ अन्वये मूळ परिच्छेदाऐवजी हा परिच्छेद दाखल करण्यात आला.

[2] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ३१ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम १३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ३१ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ३१ (क) अन्वये हा परिच्छेद जादा दाखल करण्यात आला.

(दोन) कोणत्याही कायद्याच्या किंवा अशा कामगारास लागू असलेला जो कोणताही स्थायी आदेश अंमलात असेल त्या स्थायी आदेशाच्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करून असा आदेश काढलेला असेल, किंवा--

(तीन) अन्यथा तो अयोग्य किंवा बेकायदेशीर असेल तर.--

(अ) कामगारास ताबडतोब किंवा त्याने याबाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपर्यत पुन: स्थापित करण्यास आणि त्यास, यथास्थिति, बडतर्फ करण्यासंबंधी, सेवामुक्त करण्यासंबंधी, काढून टाकण्यासंबंधी, त्यास कामावरून कमी करण्यासंबंधी किंवा त्याची सेवा समाप्त करण्यासंबंधी किंवा त्यास पदावरून निलंबित करण्यासंबंधी दिलेल्या अशा आदेशाच्या तारखेपासून सुरू होणाऱ्या आणि ज्या तारखेस कामगार न्यायालय त्यास पुन:स्थापित करण्याचा आदेश देईल त्या तारखेस किंवा पुन:स्थापित केल्याच्या तारखेस, यापैकी जी तारीख नंतरची असेल तारखेस संपणाऱ्या कालावधीचे वेतन देण्यास, किंवा,

(ब) नोकरी जाणे व त्यानंतर योग्य नोकरी मिळण्याची शक्यता या गोष्टी विचारात घेऊन कामगारास वेतनाच्या जोडीला (असे वेतन त्यास बडतर्फ केल्याच्या, सेवामुक्त केल्याच्या किंवा काढून टाकल्याचा, त्यास कामावरून कमी केल्याच्या किंवा त्याची सेवा समाप्त केल्याच्या तारखेस सुरू होणाऱ्या आणि ज्या तारखेस कामगार न्यायालय अशी रक्कम देण्याचा आदेश देईल त्या तारखेस संपणाऱ्या कालावधीचे वेतन असल्यामुळे) भरपाईच्या रूपाने चार हजार रुपयांहून अधिक नसेल अशी रक्कम देण्यास मालकास फर्माविता येईल.]

(२) या अधिनियमान्वये शिक्षेस पात्र असलेला प्रत्येक अपराध ज्या कामगार न्यायालयाच्या अधिकरितेच्या स्थानिक हद्दीत घडला असेल, ते न्यायालय त्याची संपरीक्षा करील.

**स्पटीकरण** :-- कलम ४२, पोट-कलम (४) याच्या परतुकान्वये विहित केलेल्या कालावधीत उक्त परंतुकात उल्लेख केलेला आदेश, बाब किंवा फेरबदल यासंबंधी कोणताही करार झाला नाही तर, पोट-कलम (१) परिच्छेद अ, खंड (अ) च्या कक्षेत येणारा विवाद उद्‌भवला आहे, असे मानण्यात येईल.

कार्यवाह्यांचा प्रारंभ.

**७९.** (१) कलम ७८, पोट-कलम (१), परिच्छेद अ, खंड (अ) च्या कक्षेत येणाऱ्या विवादासंबंधी कामगार न्यायालयापुढील कार्यवाह्या या विवादातील कोणत्याही पक्षाने केलेल्या अर्जावरून किंवा कलम ५२, पोट-कलम (३) अन्वये केलेल्या विशेष अर्जावरून किंवा कामगार अधिकाऱ्याने [१] [किंवा प्रातिनिधिक संघाने] केलेल्या अर्जावरून सुरू करण्यात येतील आणि उक्त परिच्छेद अ, खंड (क) च्या कक्षेत येणाऱ्या बाबीसंबंधीच्या कार्यवाह्या या प्रत्यक्ष संबंध असलेल्या कोणत्याही मालकाने किंवा कामगाराने किंवा कामगार अधिकाऱ्याने [१] [किंवा प्रातिनिधिक संघाने] केलेल्या अर्जावरून सुरू करण्यात येतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये करावयाचा प्रत्येक अर्ज विहित नमुन्यात व विहित रीतीने करण्यात येईल.

(३) कलम ७८, पोट-कलम (१), परिच्छेद अ, खंड (अ) च्या कक्षेत येणाऱ्या विवादासंबंधीचा अर्ज पुढे सांगितलेल्या अवधीत करण्यात येईल--

(अ) जर असा विवाद उक्त खंडाच्या उप-खंड (एक) किंवा (दोन) च्या कक्षेत येत असेल तर असा विवाद उद्‌भवल्यापासून तीन महिन्यांच्या आत ;

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३, कलम १५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(ब) जर असा विवाद उक्त खंडाचा उपखंड (तीन) च्या कक्षेत येत असेल तर, कलम ४२, पोट-कलम (४) याच्या परंतुकान्वये संबंधित कामगाराने मालकास अखेरची विनंती केल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत [१][ परंतु कामगार न्यायालयाला पुरेशा कारणासाठी त्याच्याकडे या पोट-कलमान्वये केलेल्या कोणत्याही विवादाच्या बाबतीत कोणताही अर्ज, यथास्थिति, उपखंड (अ) किंवा (ब) अन्वये त्यासाठी विनिर्दिष्ट केलेली तीन महिन्याची मुदत संपल्यानंतर, दाखल करून घेता येईल.]

(४) कलम-७८, पोट-कलम (१) परिच्छेद अ, खंड (क) च्या कक्षेत येणाऱ्या बाबीसंबंधी करावयाचा अर्ज, यथास्थिति, संप [२] [टाळेबंदी, कामबंदी किंवा कामरोध] सुरु झाल्याच्या तारखेपासून किंवा बेकायदेशीर बदल केल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत करण्यात येईल :

[१] [परंतु, कामगार न्यायलयास, पुरेशा कारणावरून एखादा बदल या अधिनियमान्वये बेकायदेशीर आहे असे न्यायालयाने घोषित करावे म्हणून कोणताही अर्ज असा बदल झाल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांचा अवधी संपल्यानंतरही दाखल करून घेता येईल :

परंतु आणखी असे की, वरील परंतुकान्वये जेव्हा एखादा अर्ज तीन महिन्यांचा अवधी संपल्यानंतर दाखल करून घेण्यात आला असेल तेव्हा ज्याने बदल केला असेल तो मालक कलम १०६ अन्वये तरतूद तरतूद केलेल्या शास्तीस पात्र असणार नाही.]

कामगार न्यायालयाने संबंधित पक्षांस नोटीस देणे व पक्षांस हजर राहण्याची परवानगी देणे.

[३] [**८०.** कलम ७९ अन्वये केलेला अर्ज मिळाल्यावर, कामगार न्यायालय विवादाशी संबंधित असलेल्या सर्व पक्षांस कलम ८५ अन्वये केलेल्या नियमान्वये तरतूद केलेल्या रीतीने नोटीस देईल. प्रकरण ५ च्या तरतुदींच्या अधीनतेने कामगार न्यायालयास, संबंधित पक्षांना कलम ८०-अ ते ८०-क यात तरतूद केलेल्या रीतीने हजर राहण्याची परवानगी देता येईल. त्यानंतर कामगार न्यायालय चौकशी करील.

संबंधित कामगार अनेक असतील, तेव्हा कलम ७९ अन्वये मालकाने केलेल्या अर्जाच्या बाबतीत अनसरावयाची कार्यपध्दती.

**८०-अ.** (१) मालकाने किंवा कामगार अधिकाऱ्याने कामगार न्यायालयाच्या निर्णयासाठी कलम ७९ अन्वये अर्ज दाखल केला असेल आणि संबंधित कामगार अनेक असतील व त्यांचा एकच हितसंबंध असेल तेव्हा, न्यायालयास याप्रमाणे हितसंबंध असलेल्या सर्व कामगारांच्या वतीने अशा एका किंवा अधिक कामगारांना हजर राहण्याची व अर्जाच्या बाबतीत प्रतिवाद करण्याची परवानगी देता येईल.

(२) तसेच कामगार न्यायालय, अशा बाबतीत अर्ज दाखल केल्याची नोटीस अर्जदाराच्या खर्चाने अशा सर्व कामगारांना देण्याविषयी निदेश देईल. अशी नोटीस एकतर व्यक्तिशः बजावून अथवा कामगारांच्या संख्येमुळे किंवा कोणत्याही इतर कारणांमुळे नोटीस अशा रीतीने बजावणे वाजवी रीतीने व्यवहार्य नसेल तेव्हा सार्वजनिक जाहिरात देऊन व ज्या प्रवेशद्वारे बहुसंख्य कामगार काम करण्यासाठी परिवास्तूमध्ये प्रवेश करत असतील त्या प्रवेशद्वाराजवळ अशी नोटीस तिच्या प्रादेशिक भाषेतील भाषांतरासह अर्जदाराकडून चिकटविण्यासाठी कामगार न्यायालय वरील निदेशान्वये फर्मावील. ज्या व्यक्तीने अशी नोटीस चिकटविली असेल व अशी जाहिरात प्रसिध्द केली असेल ती आपण तसे केले असल्याचा प्रतिज्ञालेख न्यायालयात दाखल करील.

---

[१] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ६ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम १४ अन्वये "किंवा टाळेबेदी" या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

[३] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४९, कलम २ अन्वये कलमे ८० ते ८०-ड ही मूळ कलम ८० ऐवजी दाखल करण्यात आली.

**८०-ब.** कलम ८०-अ अन्वये राहण्याची परवानगी न दिलेल्या परंतु ज्याच्या वतीने अर्जाच्या बाबतीत प्रतिवाद करण्यात आला असेल अशा कोणत्याही कामगारास अशा अर्जात त्याला पक्षकार करण्यासाठी न्यायालयाकडे अर्ज करता येईल. कामगारास अर्जातील पक्षकार म्हणून सामील केले नाही तर, त्याच्या हितसंबंधास पृथकपणे व मोठ्या प्रमाणात बाध येईल अशी न्यायालयास खात्री झाल्यास न्यायालयास असा अर्ज मंजूर करता येईल.

हजर राहण्याची परवानगी न दिलेल्या कामगारास पक्षकार म्हणून सामील होण्यास केव्हा परवानगी देता येईल.

**८०-क** (१) जेव्हा एकच हितसंबंध असलेले अनेक कामगार असतील तेव्हा अशा कामगारांपैकी एका कामगारास किंवा अधिक कामगारांस किंवा कामगार अधिकाऱ्यास न्यायालयाच्या परवानगीने कलम ७९ अन्वये अर्ज दाखल करता येईल. असा अर्ज सर्व कामगारांच्या वतीने व त्यांच्या हितासाठी करता येईल. न्यायालय अशा बाबतीत अर्ज दाखल केल्याची नोटीस अर्जदाराच्या खर्चाने अशा कामगारांस देण्याविषयी निदेश देईल. अशी नोटीस एकतर व्यक्तिशः बजावून अथवा कामगारांच्या संख्येमुळे किंवा कोणत्याही इतर कारणांमुळे, नोटीस अशा रीतीने बजाविणे व्यवहार्य नसेल तेव्हा, सार्वजनिक जाहिरात देऊन बजाविण्यात यावी, असे न्यायालय वरील निदेशान्वये फर्मावील. ज्या व्यक्तीने अशी जाहिरात प्रसिध्द केली असेल ती आपण तसे केले असल्याचा प्रतिज्ञालेख न्यायालयात दाखल करील.

संबंधित कामगार अनेक असतील तेव्हा कामगाराने कलम ७९ अन्वये केलेल्या अर्जात अनुसरावयाची कार्यपध्दती.

(२) ज्या कामगारांच्या वतीने पोट-कलम (१) अन्वये अर्ज दाखल करण्यात आला असेल त्यास अशा अर्जात आपणास पक्षकार करून घेण्यासाठी न्यायालयाकडे अर्ज करता येईल. कामगारास अर्जातील पक्षकार म्हणून सामील केले नाही तर, त्याच्या हितसंबंधास पृथकपणे व मोठ्या प्रमाणात बाध येईल अशी न्यायालयाची खात्री झाल्यास, न्यायालयास अर्ज मंजूर करता येईल.

**८०-ड.** कलमे ८० व ८०-अ ते ८०-क अन्वये करावयाच्या चौकशीत कामगार न्यायालयाचा न्यायाधीश, अशी चौकशी चालू असताना स्वतःच्या हस्ताक्षरात संबंधित पक्षकारांनी केलेली महत्वाची विधाने व पुराव्यातील महत्वाचे भाग धरून कार्यवाहीची कार्यवृत्ते अभिलिखित करील. न्यायाधीश ज्या मुद्याच्या आधार त्याने निर्णय दिला असेल ते मुद्दे आपल्या निर्णयात नमूद करील आणि त्यावर आपली सही करील.]

कामगार न्यायालयाच्या न्यायाधीशाने कार्यवाहीची कार्यवृत्ते, विधाने इत्यादी अभिलिखित करणे.

**८१.** कामगार न्यायालयास आपल्यापुढे चालू असलेल्या कोणत्याही कार्यवाहीत उद्‌भवलेल्या कोणताही कायदेविषयक प्रश्न निर्णयासाठी औद्योगिक न्यायालयाकडे निर्देशित करता येईल. कामगार न्यायालयाने अशा कार्यवाहीत दिलेला कोणताही आदेश अशा निर्णयानुसार असेल.

कामगार न्यायालयाने औद्योगिक न्यायालयाकडे कायदेविषयक प्रश्न निर्देशित करणे.

अपराधांची दखल घेणे.

८२. कोणतेही कामगार न्यायालय कोणत्याही अपराधाची दखल, [१] [ अशा अपराधात घटकभूत असणाऱ्या वस्तुस्थितीबाबत अशा अपराधाची बाधा पोचलेल्या व्यक्तीने ] [२] [किंवा प्रतिनिधिक संघाने ] तक्रार केल्यावाचून किंवा कामगार अधिकाऱ्याकडून लेखी प्रतिवेदन आल्यावाचून घेणार नाही.

संपरीक्षेच्या कामकाजात कामगार न्यायालयांचे अधिकार व त्यांनी अनुसरावयाची कार्यपध्दती.

८३. या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाच्या बाबतीत कामगार न्यायालयास [३] [ फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अन्वये महानगर क्षेत्रात महानगर दंडाधिकाऱ्यांस व इतरत्र प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्यास ] असलेले सर्व अधिकार असतील, आणि [४] * * * * *संक्षिप्त संपरीक्षेच्या कार्यवाहीसाठी उक्त संहितेत [५] [ प्रकरण २१ मध्ये ] जी कार्यपध्दती सांगितलेली असेल ती कार्यपध्दती तो अशा प्रत्येक अपराधाच्या संपरीक्षेमध्ये अनुसरील; आणि उक्त संहितेच्या उर्वरित तरतुदी, शक्य तेथवर, अशा संपरीक्षेस लागू होतील.

विधी व्यवसायीस कामगार न्यायालयात विवक्षित कार्यवाह्यांत हजर राहण्याची मनाई.

[६] [ ८३-अ. या अधिनियमाखालील अपराधाच्या संबंधातील कार्यवाही खेरीज करून या अधिनियमाखालील इतर कोणत्याही. कार्यवाहीत, कोणत्याही विधि व्यवसायीस कोणत्याही पक्षातर्फे कामगार न्यायालयापुढे, अशा न्यायालयाच्या परवानगीवाचून हजर राहण्याचा हक्क असणार नाही.]

---

[१] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५, कलम १३ अन्वये "ज्यास नुकसान पोहोचले असेल त्या इसमाने असा अपराध ज्या गोष्टी मिळून होतो त्या गोष्टीबाबत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ३२ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ७ (१) अन्वये, "दंड प्रक्रिया संहिता, १९९८ अन्वये बृहन्मुंबई इलाखा शहर दंडाधिकाऱ्यास व इतरत्र पहिल्या वर्गाच्या शहर दंडधिकाऱ्यास" या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल केला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ७ (३) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ७ (२) अन्वये "प्रकरण २२ मध्ये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५, कलम १४ अन्वये कलम ८३-अ समाविष्ट करण्यात आले.

[१][८३-ब. [२][(१) कामगार न्यायालयात त्याच्यापुढे चालू असलेल्या कोणत्याही कार्यवाहीचा संपूर्ण खर्च किंवा त्याचा कोणताही भाग कोणी दिला पाहिजे यासंबंधी निदेश देण्याचा अधिकार असेल : खर्चासंबंधी निवाडा देण्याचा [३][आणि खर्चाबाबतच्या कोणत्याही आदेशाची अंमलबजावणी करण्याचा कामगार न्यायालयाचा अधिकार.

परंतु कोणत्याही पक्षाने नेमलेल्या कोणत्याही विधि सल्लागाराच्या सेवांबद्दल असा कोणताही खर्च देण्यासंबंधी निदेश देता येणार नाही.]

[३][२] कलम ९३ च्या तरतुदी, औद्योगिक न्यायालयाकडून काढण्यात आलेल्या अशा कोणत्याही आदेशाला त्या ज्याप्रमाणे लागू होतात त्याप्रमाणेच तेथील औद्योगिक न्यायालय या संदर्भाऐवजी कामगार न्यायालय हा संदर्भ दाखल करून, औद्योगिक न्यायालयाकडून काढण्यायत आलेल्या खर्चाबाबतच्या कोणत्याही आदेशाच्या अंमलबजावणीस देखील लागू होतील.]

८४. (१) कलम ८३ मध्ये काहीही अंतर्भुत असले तरी-- अपिले.

(अ) कलम ७८, पोट-कलम (१), परिछेद अ, खंड (अ) किंवा (क) च्या कक्षेत येणाऱ्या बाबीसंबंधी कामगार न्यायालयाच्या निर्णयात संप, [४][टाळेबंदी, कामबंदी किंवा कामरोध] हे बेकायदेशीर आहे किंवा नाही यासंबंधी जो निकाल दिलेला असेल तो सोडून, त्याच्या इतर भागाविरुध्द किंवा उक्त कलमाचे पोट-कलम (१), परिछेद क अन्वये अशा न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुध्द औद्योगिक न्यायालयाकडे अपील करता येईल.

(ब) जिला सिध्दापराध ठरविण्यात आले असेल अशा व्यक्तीस कामगार न्यायालयाने दिलेल्या अपराधसिध्दीच्या आदेशाविरुध्द औद्योगिक न्यायालयाकडे अपील करता येईल ;

(क) कामगार न्यायालयाने आपल्या विशेष अधिकारितेअन्वये दिलेल्या अपराधमुक्तीविरुध्द [५][राज्य] शासनास औद्योगिक न्यायालयाकडे अपील करता येईल ;

(ड) कामगार न्यायालयाने आपल्या विशेष अधिकारितेमध्ये दिलेल्या शिक्षावाढीकरिता [५][राज्य] शासनास औद्योगिक न्यायालयाकडे अपील करता येईल.

(२) प्रत्येक अपील, यथास्थिति, निर्णयाच्या, अपराधसिध्दीच्या, अपराधमुक्तीच्या किंवा शिक्षादेशाच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत करण्यात येईल :

परंतु औद्योगिक न्यायालयास पुरेशी कारणे असल्यास उक्त कालावधी संपल्यानंतरही अपील दाखल करण्याची परवानगी देता येईल.

८५. औद्योगिक न्यायालयाचे सर्व कामगार न्यायालयांवर अधीक्षक असेल, तसेच त्यास पुढील गोष्टी करता येतील :-- औद्योगिक न्यायालयाने कामगार न्यायालयांवर अधीक्षक करणे.

(अ) विवरणपत्रे मागविणे ;

(ब) या अधिनियमात ज्यासंबंधी स्पष्टपणे तरतूद करण्यात आलेली नाही अशा बाबतीत अशा न्यायालयाची प्रथा व कार्यपध्दती यांचे विनियमन करण्यासाठी आणि विशेषकरून प्रकरणे सत्वर निकालात काढली जावीत यासाठी सर्वसाधारण नियम करुन ते प्रसिध्द करणे व नमुने विहित करणे ;

---

[१] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ३३ अन्वये कलम ८३-ब समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ८ (१) अन्वये कलम ८३-ब यास त्या कलमाचे पोट-कलम (१) म्हणून फेर क्रमांक देण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ८ (२) अन्वये पोट-कलम (२) हे जादा दाखल करण्यात आले.

[४] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम १५ अन्वये "किंवा टाळेबंदी" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[५] विधी व अनुकूलन आदेश, १९५० अन्वये, "प्रतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(क) अशा कोणत्याही न्यायालयांच्या अधिकाऱ्यांनी पुस्तके, नोंदी व लेखे ज्या नमुन्यात ठेवले पाहिजेत ते नमुने विहित करणे ;

(ड) कामगार न्यायालयाने किंवा औद्योगिक न्यायालयाने काढलेल्या आदेशिकेसाठी द्यावयाच्या फीचा तक्ता निश्चित करणे.

कार्यवाह्या करण्याचा औद्योगिक न्यायालयाचा अधिकार.

[१][**८५-अ.** औद्योगिक न्यायालयास, लेखी आदेशाद्वारे व त्यात नमूद करण्यात येतील अशा कारणांस्तव कामगार न्यायालयापुढे प्रलंबित असलेल्या या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाह्या काढून घेता येतील व अशा कार्यवाह्या निकालात काढण्यासाठी दुसऱ्या कामगार न्यायालयाकडे वर्ग करता येतील. आणि ज्या कामगार न्यायालयाकडे ती कार्यवाही अशा रीतीने वर्ग केली असेल त्या कामगार न्यायालयास ती कार्यवाही निकालात काढता येईल. परंतु कार्यवाही वर्ग करण्यासंबंधीच्या आदेशातील कोणत्याही विशेष निदेशाच्या अधीनतेने, त्यास ती कार्यवाही नव्याने सुरू करता येईल किंवा ज्या टप्प्यावर ती याप्रमाणे वर्ग केली असेल त्या टप्पापासून सुरू करता येईल.]

कामगार न्यायालयाचा निर्णय वगैरे आक्षेप न घेणे.

**८६.** या अधिनियमान्वये अन्यथा जी तरतूद केली असेल ती खेरीज करून कामगार न्यायालयाच्या कोणत्याही निर्णयावर, निवाड्यावर किंवा आदेशावर कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी न्यायालयापुढील कोणत्याही कार्यवाहीत आक्षेप घेता येणार नाही.

[२][प्रकरण बारा-अ]

## वेतन मंडळे

वेतन मंडळे.

**८६-अ.** [३][राज्य] शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, एका किंवा अनेक उद्योगांकरिता [४][राज्य] वेतन मंडळ स्थापन करता येईल.

वेतनमंडळाची रचना.

**८६-ब.** वेतन मंडळ हे, [३][राज्य] शासनाने, मालक व कामगार यांचे प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी जेवढ्या व्यक्ती नामनिर्देशित केलेल्या असतील तेवढीच संख्या असलेल्या व्यक्ती तसेच राज्य शासन नामनिर्देशित करील इतक्या स्वतंत्र व्यक्ती, यांचे मिळून होईल. त्याचा सभापती [३][राज्य] शासनाकडून नेमण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**--जी औद्योगिक बाब कलम ८६-क, [५][किंवा ८६-कक] अन्वये वेतन मंडळाकडे पाठविता येईल त्या बाबींशी आणि अशा औद्योगिक बाबींशी प्रत्यक्ष संबंध असलेल्या उद्योगांशी जिचा काही एक संबंध नाही, अशी व्यक्ती या कलमाच्या प्रयोजनाकरिता स्वतंत्र व्यक्ती आहे असे मानण्यात येईल.

वेतन मंडळाकडे निर्देशित करणे.

**८६-क.** (१) या अधिनियमाच्या कोणत्याही इतर तरतुदी काहीही अंतर्भूत असले तरी, [३][राज्य] शासनास, **शासकीय राजपत्रातील** आदेशाद्वारे, अनुसूची दोन मधील क्रमांक १,२,४,९ व १० या बाबींसंबंधी कोणतीही औद्योगिक बाब किंवा औद्योगिक विवाद विहित करण्यात येतील अशा इतर औद्योगिक बाबी किंवा विवाद निर्णयासाठी वेतन मंडळाकडे निर्देशित करता येतील.

---

[१] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ३४ अन्वये कलम ८५-अ समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३, कलम १६ अन्वये प्रकरणे १२-अ आणि १२ ब ही समाविष्ट करण्यात आली.

[३] विधी व अनुकूलन आदेश, १९५० अन्वये, 'प्रतिक' या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ३५ अन्वये " महाराष्ट्र राज्याच्या मुंबई प्रदेशाकरिता" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[५] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम २० अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(२) पोट-कलम (१) खालील निर्देशाच्याबाबत दिलेल्या आदेशात, कोणते मालक व कामगार (कामगारांचा प्रतिनिधी असल्यास, तो आणि मालकांचा अधिसंघ असल्यास तो धरून) वेतन मंडळापुढील कार्यवाहीत पक्षकार असतील ते विनिर्दिष्ट करण्यात येईल.

विवक्षित नोंदणीकृत संघाने वेतन मंडळाकडे निर्देश करणे.

[१][**८६-कक.** या अधिनियमाच्या कोणत्याही इतर तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, [२] [मालकास किंवा] जी नोंदणीकृत संघ कामगारांचा प्रतिनिधी असेल व तसेच जी मान्यताप्राप्त संघसुध्दा असेल त्या संघास, अधिलाभांशासंबंधीच्या विवादाव्यतिरिक्त, कलम ८६-क, पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या स्वरूपाचा कोणताही औद्योगिक विवाद निर्णयासाठी वेतन मंडळाकडे निर्देशित करता येईल :

परंतु असा कोणताही विवाद --

(एक) समेटकर्त्यापुढील कार्यवाही पूर्ण झाल्याच्या तारखेपासून दोन महिन्यानंतर ;

[३] [(दोन) जेव्हा नोंदणीकृत संघाने किंवा यथास्थिति, मालकाने, असा विवाद या अधिनियमान्वये लवादीसाठी सादर करण्याविषयी आपली तयारी समेटकर्त्यापुढे लेखी दर्शविली असेल आणि तसे करण्यास मालक, किंवा यथास्थिति, संघ कबूल नसेल तेव्हा];

(तीन) विवाद प्रथम समेटकर्त्यास सादर केल्यावाचून व समेटकर्त्याची कार्यवाही पूर्ण झाल्यावाचून किंवा विवादाची मिटवणूक समेटाद्वारे होणे शक्य नाही, असे प्रमाणपत्र समेटकर्त्याने दिल्यावाचून असा कोणताही विवाद, संघाकडून वेतनमंडळाकडे निर्देशित करता येणार नाही.]

समेटकर्ता, मंडळ वगैरे यांच्यापुढे कार्यवाही सुरू न करणे किंवा पुढे चालू न ठेवणे.

**८६-ड.** या अधिनियमाच्या कोणत्याही इतर तरतुदीत काहीही अंतर्भूत असले तरी जेव्हा एखादी औद्योगिक बाब किंवा औद्योगिक विवाद, कलम ८६-क [४][किंवा ८६-कक] अन्वये निर्णयासाठी वेतन मंडळाकडे निर्देशित करण्यात आला असेल तेव्हा त्यासंबंधीची कोणतीही कार्यवाही, समेटकर्ता, मंडळ कामगार न्यायालय किंवा औद्योगिक न्यायालय किंवा चौकशी न्यायालय याच्यापुढे, सुरू करता येणार, नाही; आणि अशी कोणतीही कार्यवाही अगोदरच सुरू करण्यात आली असेल तर ती, अशी बाब किंवा असा विवाद निर्णयासाठी निर्देशित करण्यात आल्यावर ताबडतोब स्थगित करण्यात येईल.

वेतनमंडळा पुढील कामकाजाची कार्यपध्दती.

**८६-ई.** वेतन मंडळ, त्याच्याकडे निर्णयासाठी निर्देशित करण्यात आलेल्या औद्योगिक बाबींच्या किंवा औद्योगिक विवादाच्या संबंधात कार्यपध्दतीसंबंधाने काही नियम विहित करण्यात आले असतील तर त्याच्या अधीनतेने, औद्योगिक न्यायालय त्याच्यापुढील लवादीच्या कार्यवाहीत जी कार्यपध्दती अनुसरते तीच कार्यपध्दती अनुसरील.

विशेषेकरून याबाबत विहित कारण्यात येतील अशा कार्यपध्दतीविषयक नियमांमध्ये, स्थानिक क्षेत्रांकरिता, वेतन मंडळाच्या सदस्यांमधील व्यक्ती व वेतन मंडळाला एखाद्या संदर्भाकरिता समितीवर ज्या इतर व्यक्ती नेमणे योग्य वाटेल अशा स्वीकृत केलेल्या व्यक्ती यांच्या मिळून बनलेल्या समित्या स्थापन करण्याबाबत तसेच अशा समितीने, वेतन मंडळ पाठवील अशा औद्योगिक बाबींच्या व औद्योगिक विवादांच्या संबंधात वेतन मंडळाच्या अधिकारितेच्या व त्याच्याकडे निहित असलेल्या अधिकारांचा वापर करण्याबाबत तरतूद करता येईल.

वेतन मंडळाचा निर्णय प्रवर्तनात येणे.

[५] [**८६-ईई.** कलम ८६-फ मध्ये जी तरतूद केली असेल ती खेरीज करून, वेतन मंडळाचा निर्णय हा, अशा निर्णयात विनिर्दिष्ट केलेल्या तारखेस प्रवर्तनात येईल आणि अशी कोणतीही तारीख त्यात विनिर्दिष्ट करण्यात आली नसेल तेव्हा, ज्या तारखेस तो विहित केलेल्या रीतीने प्रसिध्द करण्यात आला असेल त्या तारखेस प्रवर्तनात येईल.]

---

[१] सन १९५३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६३, कलम २० अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ६६ (अ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३६ (ब) अन्वये हा खंड बदली दाखल करण्यात आला.

[४] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम २२ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम १६ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

वेतन मंडळाच्या ज्या निर्णयाशी [२][राज्य] शासनाचा संबंध येत असेल, तो निर्णय परिणामक करण्याची कार्यपध्दती.

[१][८६-फ. (१) जेव्हा एखादा उद्योग [२][राज्य] शासनाच्या विभागाकडून चालविण्यात येत असेल आणि अशा उद्योगाशी वेतन मंडळाच्या निर्णयाचा संबंध येत असेल तेव्हा, पोट-कलमे (२) व (३) यांत जी कार्यपध्दती विनिर्दिष्ट केली असेल ती अनुसरल्यावाचून, असा निर्णय परिणामक असणार नाही.

(२) वेतन मंडळ आपली कार्यवाही पूर्ण झाल्यावर, शक्य तितक्या लवकर, आपला निर्णय [२][राज्य] शासनाला सादर करील आणि त्यानंतर [२][राज्य] शासन लेखी आदेशाद्वारे असा निर्णय बंधनकारक असल्याचे घोषित करील ;

परंतु, जेव्हा संपूर्ण निर्णय किंवा त्याचा कोणताही भाग परिणामक करणे हे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने इष्ट नाही असे [२][राज्य] शासनाचे मत असेल तेव्हा, [२][राज्य] शासन, पहिली संधी मिळताच असा निर्णय व तसेच वर सांगितल्याप्रमाणे निर्णयाबाबत घोषणा आपण का केली नाही, याविषयीच्या आपल्या कारणाचे निवेदनही [२][राज्य] विधानसभेपुढे ठेवील. आणि निर्णयाचा विचार व्हावा म्हणून शक्य तितक्या लवकर, विधानसभेत ठराव आणण्याची व्यवस्था करील. त्यानंतर विधानसभेस ठरावाद्वारे असा निर्णय कायम करता येईल, त्यात फेरबदल करता येईल किंवा तो नामंजूर करता येईल.

(३) पोट-कलम (२) च्या परंतुकान्वये ठराव संमत करण्यात आल्यावर अशा ठरावाद्वारे निर्णय नामंजूर करण्यात आला नसेल तर, [२][राज्य] शासन लेखी आदेशाद्वारे असा निर्णय उक्त ठरावावरून यथास्थिति, कायम करण्यात आला असेल किंवा त्यात फेरबदल करण्यात आला असेल त्या स्वरुपात, तो बंधनकारक आहे, असे घोषित करील.

[३][(४) पोट कलम (२) किंवा (३) अन्वये जो निर्णय बंधनकारक असल्याचे घोषित करण्यात आले असेल तो [२][राज्य] शासनाने केलेल्या घोषणेच्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेस प्रवर्तनात येईल.]

अपिले

**८६-ग.** (१) वेतन मंडळाच्या आदेशाविरुध्द किंवा निर्णयाविरुध्द (पुनर्विलोकन केलेला आदेश किंवा निर्णय धरून), ज्या प्रकरणी [४][मंडळाने एकमताने तो आदेश काढला असेल किंवा निर्णय दिला असेल ती प्रकरणे खेरीज करून तसेच] कलम ८६-फ मध्ये निर्देशिलेली प्रकरणे खेरीज करून एरव्ही औद्योगिक न्यायालयाकडे अपील करता येईल.

(२) असे अपील, आदेशाच्या किंवा निर्णयाच्या तारखेपासून, सहा आठवड्याच्या आत करण्यात येईल.

वेतन मंडळाचा आदेश किंवा निर्णय बंधनकारक असलेले पक्ष.

**८६-ह.** कलमे ८६-फ व ८६-ग याच्या तरतुदींच्या अधीनतेने वेतन मंडळाचा आदेश किंवा निर्णय पुढील पक्षांस व व्यक्तीस बंधनकारक असेल :--

[५][(अ) औद्योगिक विवादातील सर्व पक्ष;]

(ब) कार्यवाहीतील सर्व पक्ष हजर राहण्यासाठी ज्यांना समन्स पाठविले असेल, ते सर्व पक्ष-मग ते हजर असोत व नसोत ;

(क) कलम ८६-क, पोट-कलम (१) अन्वये ज्या आदेशान्वये निर्देश करण्यात आला असेल त्या आदेशात निर्देशित केलेल्या स्थानिक क्षेत्रातील, प्रसंस्थेतील किंवा व्यवसायातील किंवा उद्योगातील सर्व मालक व कामगार-मग असा आदेश काढला किंवा निर्णय दिला त्यावेळी ते असे मालक किंवा कामगार होते किंवा नव्हते अथवा त्यानंतर ते असे मालक किंवा कामगार झाले आहेत किंवा नाहीत ही गोष्ट विचारात घेण्यात येणार नाही.

---

[१] विधी व अनुकूलन आदेश, १९५० अन्वये, "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] वरील आदेशान्वये "प्रांत" शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम १७ अन्वये हे पोट कलम जादा दाखल करण्यात आले.

[४] सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६, कलम २ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ३७ अन्वये हा खंड बदली दाखल करण्यात आला.

**८६-आय.** (१) मालक किंवा कामगार किंवा मालकांचा अधिसंघ किंवा गट किंवा नोंदणीकृत संघ किंवा कामगारांचा निकाय यास, वेतन मंडळाच्या आदेशाचे किंवा निर्णयाचे पुनर्विलोकन व्हावे, यासाठी वेतन मंडळाकडे अर्ज करता येईल व वेतन मंडळास, कोणत्याही पुरेशा कारणावरून व सर्व पक्षांचे म्हणणे ऐकून घेतल्यावर, अशा आदेशाचे किंवा निर्णयाचे पुनर्विलोकन करता येईल : वेतन मंडळाने दिलेल्या आदेशाचे किंवा निर्णयाचे पुनर्विलोकन.

परंतु यथास्थिति, असो कोणताही आदेश किंवा निर्णय ज्या तारखेस काढला किंवा दिला असेल त्या तारखेपासून किंवा त्याचे अखेरचे पुनर्विलोकन ज्या तारखेस झाले असेल त्या तारखेपासून एक वर्षाचा अवधी संपेपर्यंत, असा कोणताही अर्ज करता येणार नाही :

परंतु आणखी असे की, यथास्थिति, मालकाने किंवा मालकांच्या अधिसंघाने, किंवा गटाने आदेश किंवा निर्णय ज्यास बंधनकारक असेल अशा शेकडा पंधराहून कमी नसलेल्या कामगारांस कामावर लावलेले असल्याखेरीज त्यास असा कोणताही अर्ज करता येणार नाही :

परंतु आणखी असे की, कोणताही कामगार किंवा कामगारांचा निकाय, असा आदेश किंवा निर्णय ज्यास बंधनकारक असेल अशा शेकडा पंधराहून कमी नसतील इतक्या कामगारांचा प्रतिनिधी असल्याखेरीज, त्यास असा अर्ज करता येणार नाही.

(२) जेव्हा [१][राज्य] शासन याबाबत अर्ज करील तेव्हा, वेतन मंडळास कोणत्याही पुरेशा कारणावरून व सर्व पक्षांचे म्हणणे ऐकून घेतल्यावर आपल्या आदेशाचे किंवा निर्णयाचे कोणत्याही वेळी पुनर्विलोकन करता येईल.

**८६-जे.** औद्योगिक न्यायालयाचे सर्व वेतन मंडळावर अधीक्षण असेल, तसेच त्यास पुढील गोष्टी करता येतील :-- औद्योगिक न्यायालयाने अधीक्षण करणे.

(अ) अशा मंडळाकडून विवरणपत्रे मागविणे ;

(ब) या अधिनियमात किंवा तदन्वये ज्यासंबंधी स्पष्टपणे तरतूद करण्यात आलेली नसेल अशा बाबतीत, अशा मंडळाची प्रथा व कार्यपध्दती यांचे विनियमन करण्याविषयी आणि विशेषकरून प्रकरणे सत्वर निकालात काढता यावीत यासाठी सर्वसाधारण नियम करून ते प्रस्तुत करणे व नमुने ठरविणे ;

(क) वेतन मंडळाच्या अधिकाऱ्यांनी ज्या नमुन्यात पुस्तके, नोंदी व लेखे ठेवावयाचे ते नमुने ठरविणे ;

(ड) वेतन मंडळानी काढलेल्या आदेशिकांसाठी फी निश्चित करणे.

**८६-के.** (१) या अधिनियमात अन्यथा जी तरतूद केलेली असेल ती खेरीज करून, वेतन मंडळाच्या कोणत्याही आदेशांवर किंवा निर्णयावर कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी न्यायालयातील कोणत्याही कार्यवाहीत आक्षेप घेता येणार नाही. वेतन मंडळाचा आदेश किंवा निर्णय यावर आक्षेप न घेणे.

(२) औद्योगिक न्यायालयाने कलम ८६-ग अन्वये अपिलात दिलेला आदेश किंवा निर्णय हा वेतन मंडळाच्या ज्या मूळ आदेशाच्या किंवा निर्णयाच्या ऐवजी तो देण्यात आला असेल, त्याच्या इतकाच परिणामक असेल. मात्र त्यावर आणखी कोणतेही अपील करता येणार नाही.

[२][**८६-केके.** [१][राज्य] शासनास, औद्योगिक न्यायालयाच्या शिफारशीवरून, **शासकीय राजपत्रात** अधिसूचित केलेल्या आदेशाद्वारे असा निदेश देता येईल की, कलम ८६-क मध्ये उल्लेखिलेल्या स्वरूपाची जी कोणतीही औद्योगिक बाब किंवा औद्योगिक विवाद [३][कलम ५८, पोट-कलम (६) किंवा कलमे ६६, ७२, ७३ किंवा ७३-अ] अन्वये औद्योगिक न्यायालयाकडे पाठविण्यात आला असेल, आणि अशी जी बाब किंवा विवाद त्याच्यापुढे कोणत्याही वेळी प्रलंबित असेल, ती बाब किंवा तो विवाद निकालात काढण्यासाठी,

[१] विधी व अनुकूलन आदेश, १९५० अन्वये, "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम १८ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५, कलम १५ अन्वये "कलम ७२ किंवा ७३" या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

किंवा अशी बाब किंवा विवाद औद्योगिक न्यायालयापुढे ज्या टप्प्यापर्यंत येऊन पोहोचला असेल त्या टप्प्यापासनू पुढे चालू करून निकालात काढण्यासाठी वेतन मंडळाकडे पाठविण्यात येईल. आणि त्यानंतर या अधिनियमाच्या सर्व तरतुदी अशा विवादास, जणू तो विवाद कलम ८६-क अन्वये वेतन मंडळाकडे निर्देशित करण्यात आला असावा त्याप्रमाणे लागू होतील.]

## प्रकरण बारा-ब

## [१][राज्य] वेतन मंडळ

[१][राज्य] वेतन मंडळ.

**८६-ल.** [१][राज्य] शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, हा अधिनियम लागू असलेल्या सर्व उद्योगासाठी [२][राज्याकरिता] एक [१][राज्य] वेतन मंडळ स्थापन करता येईल.

(२) [[१][राज्य] वेतन मंडळाच्या बाबतीत, कलमे ३३, ४६, ४७, ८६-ब ते ८६-के (दोन्ही धरून) ८७, ९०, ९७, ९८, ११५, ११८, ११९, ११९-अ आणि १२३ या मधील वेतन मंडळासंबंधी आलेला उल्लेख हा जणू काही [१][राज्य] वेतन मंडळासंबंधी उल्लेख असावा त्याप्रमाणे ती वाचण्यात येतील.]

## प्रकरण तेरा

## औद्योगिक लवाद न्यायालय

औद्योगिक न्यायालयाची कर्तव्ये.

**८७.** औद्योगिक न्यायालयाची पुढीलप्रमाणे कर्तव्ये असतील :--

(अ) (एक) निबंधकाने दिलेल्या आदेशावरून कलम २०, [३][२४-अ किंवा ४४] अन्वये केलेल्या अपिलांचा निर्णय करणे ;

(दोन) कलम ३६ किंवा ३९ अन्वये कामगार आयुक्ताने दिलेल्या निर्णयावरून केलेल्या अपिलांचा तसेच स्थायी आदेशांचा संबंधात कलम ३७ अन्वये पुनरीक्षणासाठी करण्यात आलेल्या अर्जाचा निर्णय करणे ;

[४][**(दोन-अ)** अनुसूची तीनच्या बाब (५) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही औद्योगिक बाबीच्या संबंधात कोणताही कर्मचारी किंवा प्रतिनिधिक संघ जो फेरबदल करू इच्छित असेल अशा कोणत्याही फेरबदलासंबंधीच्या विवादांचा निर्णय करणे ;]

(तीन) कलम ५८, पोट-कलम ६ अन्वये त्याच्याकडे निर्देशित करण्यात आलेल्या विवादांचा निर्णय करणे ;

(चार) कलम ६१ अन्वये समेटकर्ता किंवा मंडळ अगर कलम ६९ अन्वये लवाद त्यांच्याकडे निर्देशित करील अशा सर्व बाबींचा निर्णय करणे ;

(पाच) कलम ६६ अन्वये नोंदलेल्या व ज्यात औद्योगिक न्यायालयाकडे औद्योगिक विवाद निर्देशित करण्याविषयी तरतूद करण्यात आली असेल अशा सादर निवेदनानुसार त्याच्याकडे निर्देशित करण्यात आलेल्या औद्योगिक विवादांचा निर्णय करणे ;

---

[१] विधी व अनुकूलन आदेश, १९५० अन्वये, "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ३५ अन्वये "महाराष्ट्र राज्याच्या मुंबई प्रदेशाकरिता" मजकुराऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३८ (अ) अन्वये "किंवा ४४" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३८ (ब) अन्वये हा उपखंड दाखल करण्यात आला.

(सहा) कलम ७१, ७२ [1][७३ किंवा ७३-अ] अन्वये त्याच्याकडे निर्देशित करण्यात आलेल्या औद्योगिक विवादांचा निर्णय करणे ;

(सात) कलम ९० अन्वये त्याच्याकडे निर्देशित करण्यात आलेल्या बाबींचा निर्णय करणे ;

(आठ) कलम ९१ अन्वये या अधिनियमाच्या किंवा तद्न्वये केलेल्या नियमांच्या अर्थविवरणासंबंधीच्या प्रश्नांचा तसे स्थायी आदेशासंबंधी त्याच्याकडे निर्देशित करण्यांत आलेल्या प्रश्नांचा निर्णय करणे ;

(नऊ) कलम ९९ अन्वये त्याच्याकडे निर्देशित करण्यात आलेल्या गोष्टींचा निर्णय करणे ;

[2][(नऊ-अ) कलम ११६-अ अन्वये निवाड्यात फेरबदल करणे ;]

(दहा) हा अधिनियम किंवा तद्नुसार केलेले नियम [3][किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेला कोणताही कायदा] या अन्वये ज्या बाबी त्याच्याकडे निर्देशित करण्यात येतील अशा इतर बाबींचा निर्णय करणे ;

(ब) कामगार न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर कलम ८४ अन्वये केलेल्या अपिलांचा निर्णय करणे ;

[4][(क) वेतनमंडळाचा आदेशावर किंवा निर्णयावर कलम ८६-ग अन्वये केलेल्या अपिलांचा निर्णय करणे ;]

**८८.** (१) औद्योगिक न्यायालयास अपिलात, ज्या कोणत्याही निर्णयाविरुध्द किंवा आदेशाविरुध्द अपील करण्यात आले असेल तो निर्णय किंवा आदेश कायम करता येईल, त्यात फेरफार करता येईल, त्यात भर टाकता येईल किंवा तो विखंडित करता येईल आणि त्याबाबत त्यास योग्य वाटेल असे आदेश देता येतील. औद्योगिक न्यायालयाचे अधिकार.

१९७४ चा २. (२) या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधांच्या बाबतीत औद्योगिक न्यायालयास, [5][फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३] या अन्वये मुंबईच्या उच्च न्यायालयास जे अधिकार आहेत ते सर्व अधिकार असतील.

(३) औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या आदेशांची एक प्रत कामगार न्यायालयास पाठविण्यात येईल.

**८९.** कोणतीही संघ चुकीने, अपवेदनामुळे अगर कपटाने नोंदण्यांत आला होता किंवा नोंदलेल्या संघाने या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन केले आहे असे औद्योगिक न्यायालयास कोणत्याही कार्यवाहीत आढळून आले तर, औद्योगिक न्यायालयास अशा संघाची नोंदणी रद्द करण्यात यावी असा निदेश देता येईल. संघाची नोंदणी रद्द करणे.

**९०.** [6][(१) या अधिनियमान्वये वेतन मंडळास त्याच्यापुढे चालू असलेल्या कोणत्याही कार्यवाहीत उद्भवलेला कोणतीही कायदेविषयक मुद्दा औद्योगिक न्यायालयाकडे निर्देशित करता येईल. अशा कार्यवाहीत वेतन मंडळाने दिलेला कोणताही आदेश किंवा निर्णय औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयास अनुसरून असेल.] कायदेविषयक मुद्द्यांवरून निर्देश.

[1] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम १९(अ) अन्वये "किंवा ७३" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यांत आला.

[2] वरील अधिनियमाचा कलम १९ (ब) अन्वये हा उपखंड दाखल करण्यात आला.

[3] सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ३ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[4] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४० कलम १७ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[5] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७ कलम ९ अन्वये "दंड प्रक्रिया संहिता, १८९८" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४०, कलम १८ (१) अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[१][(२) कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी न्यायालयास औद्योगिक विवादासंबंधी त्याच्यापुढे चालू असलेल्या कोणत्याही दाव्यात, फौजदारी खटल्यात किंवा कायदेविषयक कार्यवाहीत उद्भवलेली कोणतीही बाब किंवा कोणताही वादविषय औद्योगिक न्यायालयाकडे त्याच्या निर्णयासाठी निर्देशित करता येईल. अशा दिवाणी किंवा फौजदारी न्यायालयाने अशा दाव्यात, खटल्यात किंवा कायदेशीर कार्यवाहीत दिलेला कोणताही आदेश औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयास अनुसरुन असेल.]

[१][(३) [२][राज्य] शासनास या अधिनियमान्वये चालविलेल्या कोणत्याही कार्यवाहीत उद्भलेला कोणताही कायदेविषयक मुद्दा औद्योगिक न्यायालयाकडे निर्देशित करता येईल. औद्योगिक न्यायालय अशा मुद्द्याचा निर्णय खुल्या न्यायालयाखेरीज इतरत्र करणार नाही व असा निर्णय अशा मुद्द्यांच्या सुनावणीच्या वेळी अशा न्यायालयाचे जे न्यायाधीश हजर असतील त्यांच्या बहुमताप्रमाणे होईल.]

अधिनियम व नियम यांच्या अर्थविवरणासंबंधीचा प्रश्न निर्देशित करणे.

**९१.** कामगार आयुक्तास हा अधिनियम किंवा या अधिनियमान्वये केलेले नियम यांच्या अर्थविवरणासंबंधीचा कोणताही प्रश्न औद्योगिक न्यायालयाकडे त्याच्या निर्णयासाठी निर्देशित करता येईल.

औद्योगिक न्यायालयापुढील कार्यवाहीची कार्यपध्दती.

**९२.** (१) औद्योगिक न्यायालय आपल्या कार्यपध्दतीचे विनियमन करण्यासाठी हा अधिनियम व तदन्वये केलेले नियम यांच्या तरतुदींशी सुसंगत असे विनियम करील.

(२) विशेषेकरुन व पूर्ववर्ती अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाधा येऊ न देता अशा विनियमांत, एक किंवा अधिक सदस्य असलेली न्यायमंडळे बनविण्याविषयी तसेच त्यात अशा प्रत्येक न्यायमंडळाने त्यास दिलेली अधिकारिता व अधिकार वापरण्याविषयी तरतूद करता येईल :

परंतु, जो केंव्हाही उच्च न्यायालयाचा न्यायाधीश नव्हता आणि तो त्याच्या नेमणुकीच्या वेळी उच्च न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून नेमणूक केली जाण्यासाठी पात्र नव्हता अशा फक्त एका सदस्याचे कोणतेही न्यायमंडळ असणार नाही.

(३) पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये केलेला प्रत्येक विनियम **शासकीय राजपत्रात** प्रसिध्द करण्यात येईल.

(४) औद्योगिक न्यायालयापुढे चालू असलेली प्रत्येकी कार्यवाही ही, भारतीय दंड संहिता, कलमे १९२, १९३ व २२८ यांच्या अर्थानुसार न्यायिक कार्यवाही आहे असे मानले जाईल. १८६० चा ४५.

(५) औद्योगिक न्यायालयापुढे चालू असलेल्या कोणत्याही कार्यवाहीचा संपूर्ण खर्च किंवा त्याचा कोणताही भाग कोणी दिला पाहिजे, याविषयी निदेश देण्याचा अधिकार औद्योगिक न्यायालयास असेल :

परंतु, कोणत्याही पक्षाने नेमलेल्या कोणत्याही विधि सल्लागाराच्या कामाबद्दल असा कोणताही खर्च देण्याविषयी निदेश दिला जाणार नाही.

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४०, कलम १८ (२) अन्वये मूळ पोट-कलमे (१) व (२) यांस (२) आणि (३) असे फेरक्रमांक देण्यात आले.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

**९३.** कार्यवाहीच्या खर्चाबाबत औद्योगिक न्यायालयाने दिलेला आदेश, अशा आदेशान्वये कोणतीही रक्कम देण्याविषयी ज्यास आदेश दिला असेल, अशा व्यक्तीची राहण्याची अगर धंद्याची कोणतीही जागा ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादेत असेल अशा दिवाणी न्यायाधीशाच्या न्यायालयापुढे हजर करता येईल किंवा असा आदेश, अशी जागा जेंव्हा उच्च न्यायालयाच्या सामान्य दिवाणी अधिकारितेच्या स्थानिक मर्यादेत असेल तेंव्हा, मुंबईच्या लघुवाद न्यायालयापुढे हजर करता येईल आणि असे न्यायालय अशा आदेशची, जणू तो आपण स्वत: एखाद्या दाव्यात पैसे भरण्याबाबत दिलेला हुकूम नामा असावा त्याप्रमाणे, त्याच रीतीने व तीच कार्यपध्दती अनुसरून बजावणी करील.

खर्च देण्याबाबत दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी.

**९४.** औद्योगिक न्यायालयाचा आदेश, निर्णय किंवा निवाडा पुढील पक्षास किंवा व्यक्तींस बंधनकारक असेल :--

औद्योगिक न्यायालयाचे आदेश बंधनकारक असलेले पक्ष.

[१][(अ) औद्योगिक विवादातील सर्व पक्ष] ;

(ब) ज्या पक्षांना विवादातील पक्ष म्हणून हजर राहण्यासंबंधी समन्स पाठविण्यात आले असेल--मग ते हजर राहिले असोत किंवा नसोत--त्यांना अयोग्य प्रकारे पक्ष करून घेण्यात आले आहे असे औद्योगिक न्यायालयाचे मत असेल ते खेरीज करून एरव्ही असे सर्व पक्ष ;

(क) ज्या उपक्रमाशी विवादाचा संबंध असेल त्या उपक्रमासंबंधी अशा न्यायालयापुढे चालू असलेल्या कार्यवाहीत पक्षकार असलेल्या मालकाच्या बाबतीत, ज्या उपक्रमाशी विवादाचा संबंध असेल त्या उपक्रमाच्यासंबंधी असलेले त्याचे उत्तराधिकारी, वारस किंवा अभिहस्तांकिती ; आणि

(ड) अशा न्यायालयापुढील कार्यवाहीत पक्षकार असलेल्या नोंदणीकृत संघाच्या बाबतीत, निवाड्याच्या तारखेस व त्यानंतरही असा संघ ज्यांचा प्रतिनिधी असेल अशा सर्व व्यक्ती.

**९५.** [२][(१) मालक किंवा मालकांचा अधिसंघ किंवा गट किंवा [३][कामगार प्रतिनिधी] यास औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयाचे किंवा निवाड्याचे पुनर्विलोकन व्हावे यासाठी औद्योगिक न्यायालयाकडे कोणत्याही वेळी अर्ज करता येईल आणि औद्योगिक न्यायालयास कोणत्याही पुरेशा कारणावरून आणि सर्व पक्षांचे म्हणणे ऐकूण घेऊन अशा निर्णयाचे किंवा निवाड्याचे पुनर्विलोकन करता येईल.]

[४][औद्योगिक न्यायालयाचा आदेश पुनर्विलोकनावरुन असेल त्याखेरीज अंतिम असणे.]

[५][(२) औद्योगिक न्यायालयाच्या कोणत्याही आदेशावर, निर्णयावर किंवा निवाड्यावर कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी न्यायालयात आक्षेप घेता येणार नाही.]

[६][**९५-अ.** कलम ९२ अन्वये केलेल्या विनियमांनुसार रचना केलेल्या औद्योगिक न्यायालयाच्या पूर्ण न्यायमंडळाने, ज्या कोणत्याही कायदेविषयक प्रश्नाचा निर्णय आपल्या कोणत्याही आदेशात निकालात, निवाड्यात किंवा घोषणेत दिला असेल, तो बंधनकारक आहे असे मानण्यात येईल आणि या अधिनियमान्वये चालू असलेल्या सर्व कार्यवाहीत तो अनुसरण्यात येईल.]

औद्योगिक न्यायालयाने घोषित केलेला कायदा बंधनकारक असणे.

---

[१] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ३९ अन्वये खंड (अ) बदली दाखल करण्यात आला.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३, कलम ११ अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ४० अन्वये "नोंदलेला संघ" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] सन १९८४ चा मुंबई अधिनियम क्रमांक १९ अन्वये मूळ समास टीपे ऐवजी ही समास टीप दाखल करण्यात आली.

[५] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४७, कलम १९ अन्वये मूळ कलम ९५ यास या कलमाचे पोट-कलम (२) असा फेर क्रमांक देण्यात आला.

[६] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम २० अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

औद्योगिक न्यायालयापुढील कार्यवाहीत अधिकाऱ्याने हजर असणे.

**९६.** [1][राज्य] शासनास, औद्योगिक न्यायालयापुढील कोणत्याही कार्यवाहीत अशा न्यायालयास नोटीस देऊन हजर राहण्याचा निदेश कोणत्याही अधिकाऱ्यास देता येईल ; आणि अशी नोटीस दिल्यावर अशा अधिकाऱ्यास अशा कार्यवाहीत हजर राहण्याचा हक्क असेल.

## प्रकरण चौदा

## बेकायदेशीर संप व टाळेबंदी

बेकायदेशीर संप.

**९७.** (१) जर एखादा संप--

(अ) अनुसूची तीनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही स्थायी आदेशान्वये विनियमित केलेल्या कोणत्याही औद्योगिक बाबींशी अशा संपाचा संबंध असेल त्या बाबतीत ;

(ब) कलम ४२ च्या तरतुदीनुसार नोटीस दिल्यावाचून ;

(क) मालकाने कोणत्याही स्थायी आदेशातील तरतुदी अंमलात आणल्या नाहीत किंवा त्याने एखादा बेकायदेशीर बदल केला आहे एवढ्याच कारणावरून ;

(ड) कलम ४२ च्या तरतुदींअनुसार बदलाविषयी नोटीस देण्यात आली असेल आणि अशा बदलाविषयी कोणताही करार झाला नसेल अशा बाबतीत स्थानिक क्षेत्राशी संबंधित असलेल्या उद्योगासाठी असलेल्या समेटकर्त्यास कलम ५४ मध्ये विनिर्दिष्ट केलेले प्रकरणांचे निवेदन मिळण्यापूर्वी ;

(इ) ज्या औद्योगिक विवादायी संपाचा संबंध असेल अशा विवादासंबंधी समेटाची कार्यवाही सुरू करण्यात आलेली असेल अशा बाबतीत, अशी कार्यवाही पूर्ण होण्यापूर्वी [2][आणि त्यानंतर दहा दिवसांच्या कालावधीत] ;

(फ) कलम ५२, पोट-कलम (२) अनवये समेटकर्त्याकडे विशेष सूचना पाठविण्यात आली असेल अशा बाबतीत, ज्या व्यक्तीस अशी सूचना द्यावयाची असेल त्यास ती मिळण्यापूर्वी ;

(ग) अशा विवादासंबंधी किंवा अशा प्रकारच्या विवादासंबंधी सादर निवेदन कलम ६६ अन्वये नोंदण्यात आले असेल अशा बाबतीत, असे सादर निवेदन कायदेशीररीत्या रद्द करण्यापूर्वी ;

(ह) कलम ५८ पोट-कलम (६) अन्वये किंवा कलम ७१ अन्वये कामगार न्यायालयाच्या किंवा औद्योगिक न्यायालयाच्या लवादाकडे कलम ७२, [3][७३ किंवा ७३-अ] अन्वये औद्योगिक न्यायालयाच्या लवादाकडे एखादा औद्योगिक विवाद निर्देशित करण्यात आला असेल अशा बाबतीत, ज्या तारखेस लवादीची कार्यवाही पूर्ण झाली असेल त्या तारखेपूर्वी किंवा ज्या तारखेस, यथास्थिती, कामगार न्यायालयाचा अगर औद्योगिक न्यायालयाचा निवाडा प्रवर्तनात येईल त्यापूर्वी, यापैकी जी अधिक उशिराची असेल त्या तारखेपूर्वी ;

---

[1] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[2] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम २३ (१) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम २३ (२) अन्वये "किंवा ७३" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1][परंतु, जेव्हा संघाने औद्योगिक विवाद कलम ५८, पोट-कलम (६) अन्वये लवादाकडे सादर करण्याविषयी आपली तयारी लेखी दर्शविली असेल, आणि

(अ) मालकाने ती स्वीकारली नसेल, किंवा

(ब) मालकाने तो स्वीकारली असेल परंतु लवादाची निवड अमान्य करून लवादाच्या नामनिर्देशाविना तो विवाद लवादाकडे सादर करण्यास तो कबूल नसेल,

आणि त्यानंतर तो विवाद कलम ७३-अ अन्वये औद्योगिक न्यायालयाकडे लवादीसाठी पाठविण्यात आला असेल तेंव्हा, या खंडातील कोणतीही गोष्ट संपास लागू होणार नाही.]

(आय) नोंदणीकृत कराराच्या किंवा मिटवणुकीच्या किंवा [2][परिणामक्षम निवाड्याच्या] अटींचे उल्लंघन करून ;

[3][(जे) औद्योगिक बाब किंवा औद्योगिक विवाद निर्णयासाठी वेतन मंडळाकडे निर्देशित करण्यात आला असेल तेव्हा, असा निर्णय प्रर्वतनात येण्याच्या तारखेपूर्वी ;

(के) वेतन मंडळाच्या परिणामक्षम निर्णयासाठी अटींचे उल्लंघन करून, सुरू करण्यात किंवा चालू ठेवण्यात आला असेल तर, तो बेकायदेशीर असेल.]

(२) कोणत्याही औद्योगिक विवादासंबंधी समेटाची कार्यवाही पूर्ण झाली असेल अशा बाबतीत अशा विवादाशी संबंध असलेला संप अशी कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर दोन महिन्यांचा अवधी संपल्यांनंतर कोणत्याही वेळी सुरू करण्यात असेल तर, तो बेकायदेशीर असेल.

(३) पोट-कलम (१) व (२) यांत काहीही अंतर्भूत असेल तरी, जो संप पोट-कलम (१), खंड (अ), (ग), (ह) किंवा (आय) यांच्या कक्षेत येत नसेल व ज्याबद्दलची पूर्ण चौदा दिवसांची नोटीस मालकास व कामगार अधिकाऱ्यास देण्यात आली असेल असा संप, नोटीशीचा कालावधी संपण्यापूर्वी किंवा तो संपण्याच्या तारखेपासून, सहा आठवड्यानंतर सुरू करण्यात आला नसेल तर, कामगार न्यायालयाने किंवा औद्योगिक न्यायालयाने असा संप बेकायदेशीर असल्याचे ठरविल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत जे कामगार रुजू होतील ते अशा संपाच्या बाबतीत या अधिनियमान्वये कोणत्याही शास्तीस पात्र होणार नाहीत :

परंतु, नोटीशीच्या कालावधीत जो कोणताही संप कलम ९९ अन्वये बेकायदेशीर ठरविण्यात आला असेल, त्यास पोट-कलम (३) मधील कोणतीही तरतूद लागू असणार नाही.

[4][**९७-अ.** कोणतीही कामरोध हा पुढील परिस्थितीत बेकायदेशीर असेल :--

विवक्षित परिस्थितीत कामगारांनी कामरोध करणे हे बेकायदेशीर असणे.

(अ) संबंधित उद्योगात [5][केंद्र किंवा [6][राज्य] शासन] मालक नसेल तेंव्हा, एखाद्या औद्योगिक बाबींच्या संबंधात कोणतीही विशिष्ट उपाय योजना करण्यास किंवा करण्यापासून परावृत्त राहण्यास [5][केंद्र किंवा [6][राज्य] शासनास] किंवा कोणत्याही लोकसेवकास सक्ती करण्याच्या उद्देशाने कामरोध सुरू करण्यात किंवा चालू ठेवण्यात आला असेल तर, किंवा

---

[1] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ४१ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[2] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३, कलम २० अन्वये "निवाड्याच्या" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम २० अन्वये हे खंड समाविष्ट करण्यात आले.

[4] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३, कलम २१ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[5] सन १९४९ मुंबई अधिनियम क्रमांक ५५, कलम १६ अन्वये अनुक्रमे "केंद्रिय किंवा प्रांतिक सरकार" या शब्दांऐवजी आणि "प्रांतिक सरकारास" ह्या शब्दांऐवजी हे शब्द हे शब्द दाखल करण्यात आले.

[6] विधि अनुकूलन आदेश १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(ब) हा अधिनियम किंवा औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेला कोणताही इतर कायदा याअन्वये बेकायदेशीर असलेल्या संपास पाठिंबा देण्यासाठी किंवा सहानुभूती दर्शविण्यासाठी असा कामरोध करण्यात आला असेल तर-मग असा कामरोध एकाच उद्योगातील, व्यवसायातील अगर उपक्रमातील असो वा नसो.] १९४२ चा १४.

बेकायदेशीर टाळेबंदी.

**९८.** (१) जर एखादी टाळेबंदी--

(अ) अनुसूची तीनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही स्थायी आदेशान्वये विनियमित केलेल्या कोणत्याही औद्योगिक बाबींशी तिचा संबंध असेल त्या बाबतीत ;

(ब) कलम ४२ च्या तरतुदींनुसार नोटीस दिल्याशिवाय ;

(क) कलम ४२ च्या तरतुदींनुसार बदलाबद्दल नोटीस देण्यात आली असेल आणि अशा बदलाविषयी कोणताही करार झाला नसेल अशा बाबतीत, स्थानिक क्षेत्रांशी संबंधित असलेल्या उद्योगासाठी असलेल्या समेटकर्त्यास कलम ५४ मध्ये उल्लेख केलेले प्रकरणाचे निवेदन मिळण्यापूर्वी ;

(ड) ज्या औद्योगिक विवादाशी टाळेबंदीचा संबंध असेल अशा विवादासंबंधी समेटाची कार्यवाही सुरू करण्यात आली असेल अशा बाबतीत अशी कार्यवाही पूर्ण होण्यापूर्वी [१][आणि त्यानंतर दहा दिवसांच्या कालावधीत ;]

(इ) कलम ५२, पोट-कलम (२) अन्वये समेटकर्त्याकडे विशेष सूचना पाठविण्यात आली असेल अशा बाबतीत, ज्या व्यक्तीस अशी सूचना द्यावयाची असेल त्यास ती मिळविण्यापूर्वी ;

(फ) अशा विवादाच्या संबंधातील किंवा अशा प्रकारच्या विवादाच्या संबंधातील सादर निवेदन कलम ६६ अन्वये नोंदण्यात आले असेल अशा बाबतीत, असे सादर निवेदन कायदेशीरपणे रद्दबातल करण्यापूर्वी ;

(ग) कलम ५८, पोट-कलम (६) अन्वये किंवा कलम ७१ अन्वये कामगार न्यायालयाकडे किंवा औद्योगिक न्यायालयाकडे अथवा कलम ७२, [२][७३ किंवा ७३-अ] अन्वये औद्योगिक न्यायालयाकडे एखादा औद्योगिक विवाद लवादीसाठी निर्देशित करण्यात आला असेल अशा बाबतीत, ज्या तारखेस लवादाची कार्यवाही पूर्ण झाली असेल त्या तारखेपूर्वी, किंवा ज्या तारखेस औद्योगिक न्यायालयाचा निवाडा प्रवर्तनात येईल त्या तारखेपूर्वी, यापैकी जी अधिक उशिराची असेल त्या तारखेपूर्वी :

[३][परंतु जेव्हा मालकाने औद्योगिक विवाद, कलम ५८ च्या पोट-कलम (ब) अन्वये लवादाकडे सादर करण्याविषयी आपली तयारी लेखी दर्शविली असेल, आणि

(अ) संघाने ती स्वीकारली नसेल ; किंवा

(ब) संघाने ती स्वीकारली असेल परंतु लवादाची निवड अमान्य करून, लवादाच्या नामनिर्देशाविना, तो विवाद, लवादाकडे सादर करण्यास तो कबुल नसेल, आणि त्यानंतर, तो विवाद, कलम ७३-अ अन्वये औद्योगिक न्यायालयाच्या लवादाकडे निर्देशित करण्यात आला असेल तेव्हा, या खंडातील कोणतीही गोष्ट कोणत्याही टाळेबंदीस लागू होणार नाही.]

(ह) नोंदणीकृत कराराच्या किंवा मिटवणुकीच्या किंवा [४][परिणामक्षम निवाड्याच्या] अटींचे उल्लंघन करून ;

---

[१] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम २४ (१) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम २४ (२) अन्वये "किंवा ७३" या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९६५ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम ४२ (२) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[४] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३, कलम २१ अन्वये "निवाडा" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[१][(आय) औद्योगिक बाब किंवा औद्योगिक विवाद निर्णयासाठी वेतन मंडळाकडे निर्देशित करण्यात आला असेल तेंव्हा, असा निर्णय प्रवर्तनात येणाऱ्या तारखेपूर्वी;

(जे) वेतन मंडळाच्या परिणामक्षम निर्णयाच्या अटींचे उल्लंघन करून];

सुरू करण्यात किंवा चालू ठेवण्यात आली असेल तर, अशी टाळेबंदी कायदेशीर असेल.

(२) कोणत्याही औद्योगिक विवादासंबंधी समेटाची कार्यवाही पूर्ण झाली असेल अशा बाबतीत, अशा विवादाशी संबंध असलेली टाळेबंदी जर अशी कार्यवाही पूर्ण झाल्यपासून दोन महिन्यांचा अवधी संपल्यानंतर कोणत्याही वेळी सुरू करण्यात आली असेल तर, ती बेकायदेशीर असेल.

(३) पोट-कलमे (१) व (२) यांत काहीही अंतर्भूत असले तरी, जी टाळेबंदी पोट-कलम (१), खंड (अ), (ग), (ह) किंवा (आय) याच्या कक्षेत येत नसेल व ज्या टाळेबंदीची पूर्ण चौदा दिवसांची नाकटीस कामगारांना व कामगार अधिकाऱ्यास देण्यात आली असेल अशी टाळेबंदी, नोटीशीचा कालावधी संपण्यापूर्वी किंवा संपण्याच्या तारखेपासून सहा आठवड्यानंतर सुरू करण्यात आली नसेल आणि कामगार न्यायालयाने किंवा औद्योगिक न्यायालयाने अशी टाळेबंदी बेकायदेशीर असल्याचे घोषित केल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत मालक अशी टाळेबंदी काढून घेईल तर अशा टाळेबंदीच्या बाबतीत, असा मालक, या अधिनियमान्वये कोणत्याही शास्तीस पात्र होणार नाही :

परंतु, नोटिशीच्य कालावधीत जी कोणतीही टाळेबंदी कलम ९९ अन्वये बेकायदेशीर ठरविण्यात आली असेल तिला या कलमाची कोणतीही तरतूद लागू असणार नाही.

विवक्षित परिस्थितीत मालकाने कामबंदी करणे, हे बेकायदेशीर असणे.

[२][**९८-अ** कोणतेही काम बंद करण्याची क्रिया, एखाद्या औद्योगिक बाबीच्या संबंधात कोणतीही विशिष्ट उपाययोजना करण्यास किंवा करण्यापासून परावृत्त राहण्यास [३][केंद्र किंवा [४][राज्य] शासनास] किंवा कोणत्याही लोकसेवकास सक्ती करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात किंवा चालू ठेवण्यात आली असेल तर, ती बेकायदेशीर असेल.]

संप, [६][टाळेबंदी, कामबंदी किंवा कामरोध हा] बेकायदेशीर आहे किंवा कसे हे घोषित करण्यासाठी औद्योगिक न्यायालयाकडे निर्देश करणे.

**९९.** (१) कोणतीही नियोजित [५][संप, टाळेबंदी, कामबंदी किंवा कामरोध हा बेकायदेशीर होईल किंवा कसें] हे ठरविण्यासाठी [४][राज्य] शासनास औद्योगिक न्यायालयाकडे निर्देश करता येईल.

(२) या कलमान्वयेची कोणतीही घोषणा खुल्या न्यायालयाव्यतिरिक्त इतर कोठेही केली जाणार नाही.

[७][(३) पोट-कलम (१) अन्वये केलेली घोषणा बंधनकारक आहे असे मानण्यात येईल आणि ती या अधिनियमाखालील कार्यवाहीत अनुसरण्यात येईल.]

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३, कलम २१ अन्वये हे खंड दाखल करण्यात आले.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम २२ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५, कलम १६ अन्वयें "प्रांतिक सरकारास" ह्या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[५] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम २३(अ) अन्वये मूळ शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[६] वरिल अधिनियमाच्या कलम २३(क) अन्वये "किंवा टाळेबंदी" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[७] वरिल अधिनियमाच्या कलम २३(ब) अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

## प्रकरण पंधरा

## चौकशी न्यायालय

[१]चौकशी न्यायालय, त्याची रचना,[२] कर्तव्ये व अधिकार.

**१००.** (१) [१][राज्य] शासनास, त्यास योग्य वाटेल इतक्या व्यक्तींचे मिळून बनणाऱ्या एका किंवा अनेक चौकशी न्यायालयांची रचना करता येईल.

(२) चौकशी न्यायालय [१][राज्य] शासना त्यांच्याकडे निर्देश करील अशा औद्योगिक बाबींची चौकशी करील. अशा बाबींमध्ये, कामाच्या शर्ती किंवा कोणत्याही उद्योगातील मालक व कामगार यांचे संबंध आणि कोणत्याही औद्योगिक विवादाची कोणतीही बाजू यांच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबींचा समावेश असेल.

(३) चौकशी न्यायालयापुढील प्रत्येक कार्यवाही ही, भारतीय दंड संहिता कलमे १९२, १९३ व २२८ यांच्या अर्थानुसार न्यायिक कार्यवाही आहे असे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

[२][(४) चौकशी न्यायालयास, या अधिनियमाखालील त्यांच्यापुढील कोणत्याही कार्यवाहीमध्ये उद्भवणाऱ्या कोणत्याही कायदेविषयक प्रश्नांचा औद्योगिक न्यायालयाकडे निर्देश करता येईल, अशा कार्यवाहींतील चौकशी न्यायालयाचा कोणताही निष्कर्ष औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयानुसार असेल.]

## प्रकरण सोळा

## शास्ती

मालकाने कामगारास बडतर्फ न करणे, पदावनत करणे किंवा शिक्षा न करणे.

**१०१.** (१) कोणताही मालक कोणत्याही कामगारास पुढील परिस्थितीच्या कारणास्तव--

(अ) तो नोंदणीकृत संघाचा किंवा या अधिनियमान्वये नोंदणीसाठी ज्याने अर्ज केला आहे अशा संघाचा अधिकारी किंवा सदस्य आहे म्हणून ; किंवा

(ब) एखादा नोंदणीकृत कराराचा किंवा मिटवणुकीचा, सादर निवेदनाचा किंवा निवाड्याचा लाभ मिळण्याच्या त्यास हक्क आहे म्हणून ; किंवा

(क) [३][या अधिनियमान्वये किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यान्वये चालू असलेल्या कार्यवाहीत] साक्षीदार म्हणून हजर राहिला आहे किंवा हजर राहण्याचा त्याचा इरादा आहे किंवा त्याने कोणताही पुरावा दिला आहे किंवा पुरावा देण्याचा इरादा आहे किंवा या अधिनियमाखालील कार्यवाहीत [४][किंवा अशा कार्यवाहीच्या संबंधात त्याने कोणत्याही नात्याने भाग घेतला आहे] म्हणून ; किंवा

(ड) औद्योगिक परिस्थिती सुधारणे हा जिचा उद्देश आहे अशा संस्थेचा जो अधिकारी किंवा सदस्य आहे म्हणून ; किंवा

(इ) जी बेकायदेशीर म्हणून घोषित करण्यात आलेली नाही अशा संस्थेचा जो अधिकारी किंवा सदस्य आहे म्हणून ; किंवा

(फ) तो कामगार प्रतिनिधी आहे म्हणून ; किंवा

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.
[२] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ४३ अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.
[३] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम २५ (१) अन्वये हे शब्द दाखल करण्यात आले.
[४] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम २४ अन्वये हे शब्द दाखल करण्यात आले.

(ग) या अधिनियमाच्या तरतूदीन्वये कामगार न्यायालयाकडून किंवा औद्योगिक न्यायालयाकडून जो संप बेकायदेशीर ठरविण्यात आला नाही अशा संपावर तो गेला आहे [१][किंवा त्यात सामील झाला आहे किंवा त्यास चिथावणी दिली आहे] म्हणून ;

त्यास बडतर्फ करणार नाही किंवा सेवामुक्त करणार नाही किंवा पदावनत करणार नाही किंवा त्यास कोणत्याही इतर रीतीने शिक्षा करणार नाही.

(२) [२]* * * *

औद्योगिक विवादातून उद्‌भवलेला जो संप कामगार न्यायालयाकडून किंवा औद्योगिक न्यायालयाकडून बेकायदेशीर ठरविण्यात आला नसेल अशा संपाच्या बाबतीत--

(एक) ज्या वादविषयावरुन कामगाराने संप केला आहे तो वादविषय या अधिनियमान्वये लवादाकडे निर्देशित करण्यास मालकाने तयारी दर्शविली असेल आणि कामगाराने लवाद नाकारला असेल ; किंवा

(दोन) कामगाराने लवाद नाकारला नसेल परंतु संप संपल्याचे [३][राज्य] शासनाने घोषित केल्यापासून एक महिन्याच्या आत, कामावर रुजू होण्यास आपली तयारी दर्शविली नसेल ;

या प्रसंगाव्यतिरिक्त इतर प्रसंगी कोणताही मालक कोणत्याही कामगारास, अशा संपानंतर, कामावर रुजू होण्याचा प्रतिबंध करणार नाही.

[४][(२-अ) कोणताही मालक कामगार न्यायालयाच्या स्पष्ट लेखी परवानगीवाचून कोणत्याही संरक्षित कामगारास बडतर्फ करणार नाही, सेवामुक्त करणार नाही किंवा पदावनत करणार नाही.

**स्पष्टीकरण.--** या पोट-कलमाच्या प्रयोजनाकरिता, कोणत्याही उद्योगाच्या संबंधात "संरक्षित कामगार" या शब्दप्रयोगाचा अर्थ, जो कामगार त्या उद्योगाशी संबंधित असेलल्या संघाचा पदाधिकारी असून या अधिनियमान्वये केलेल्या नियमांनुसार त्यास असा पदाधिकारी म्हणून मान्यता दिली असेल असा कोणताही कामगार, असा होतो.

(२-ब) कोणत्याही स्थानिक क्षेत्रातील प्रत्येक उद्योगात पोट-कलम (२-अ) च्या प्रयोजनाकरिता "संरक्षित कामगार" म्हणून मान्यता द्यावयाच्या कोणत्याही संघाच्या अधिकाऱ्यांची संख्या ही कमीत कमी पाच संरक्षित कामगार व जास्तीत जास्त शंभर संरक्षित कामगार या संख्येच्या अधीनतेने, त्या उद्योगात कामावर लावलेल्या एकूण कामगारांच्या शेकडा एक टक्काइतकी असेल, आणि उपरोक्त प्रयोजनाकरिता राज्य शासनाला, ज्या रीतीने कामगारांची निवड केली जाईल व त्यांना संरक्षित कामगार म्हणून ज्या रीतीने मान्यता दिली जाईल त्या रीतीसंबंधी तरतूद करण्याबाबत नियम करता येतील.]

(३) जो कोणी पोट-कलम (१) [५][(२) किंवा (२-अ)] च्या तरतुदींचे उल्लंघन करील, तो, अपराधसिध्दीनंतर ५,००० रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल ;

(४) या कलमाखाली अपराधाची संपरीक्षा करणाऱ्या न्यायालयास, वसूल झालेल्या दंडाच्या रकमेतून त्यास योग्य वाटेल अशी रक्कम संबंधित कामगारास भरपाईदाखल दिली जावी असा निर्देश देता येईल.

(५) या कलमान्वये चालविलेल्या कोणत्याही खटल्यात मालकाने कामगारास बडतर्फ केले, सेवामुक्त केले, पदावनत केले किंवा शिक्षा केली, ही गोष्ट या कलमाच्या तरतुदींचे उल्लंघन न करता करण्यात आली असे सिध्द करण्याचा बोजा अशा मालकावर राहील.

[१] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ४४(अ) अन्वये "किंवा त्यात सामील झाला आहे," या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम २५ अन्वये "अनुसूची एक, दोन किंवा तीन मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बाबींच्या संबंधातील" हा मजकूर वगळण्यात आला.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ४४(ब) अन्वये ही पोट-कलमे समाविष्ट करण्यात आली.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ४४(क) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

बेकायदेशीर ठरविलेली टाळेबंदी [४][किंवा कामबंदी] घोषित करणे याबद्दल शास्ती.

**१०२.** कामगार न्यायालयाने किंवा औद्योगिक न्यायालयाने बेकायदेशीर म्हणून ठरविलेली टाळेबंदी [१][किंवा कामबंदी] ज्या कोणत्याही मालकाने सुरू केली असेल तो, अपराधसिध्दीनंतर, २,५०० रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल ; आणि जर, [२] [यथास्थिती], अशी टाळेबंदी [१][किंवा कामबंदी] बेकायदेशीर असल्याचा निर्णय देण्यात किंवा घोषित करण्यात आल्यापासून अठ्ठेचाळीस तासांचा अवधी संपल्यानंतर चालू ठेवण्यात आली तर, अशा अपराधसिध्दिनंतर ज्या ज्या दिवशी अशी टाळेबंदी [३][किंवा कामबंदी] चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल आणखी ५,००० रुपयांपर्यंत असेल इतक्या दंडाच्या शिक्षेस तो पात्र होईल.

बेकायदेशीर म्हणून ठरविलेला संप [८] [किंवा बेकायदेशीरी, कामबंदी] घोषित करणे किंवा सुरू करणे याबद्दल शास्ती.

**१०३.** कामगार न्यायालयाने बेकायदेशीर मानलेल्या किंवा औद्योगिक न्यायालयाने बेकायदेशीर म्हणून घोषित केलेल्या संपावर जो गेला आहे किंवा जो [५][कामरोधात] सहभागी झाला आहे अथवा ज्या संपात [६][किंवा कामरोधात] सामील झाला आहे, अशा कोणत्याही कामगारास, कलम ९७, पोट-कलम (३) च्या तरतुदींच्या अधीनतेने अपराधसिध्दीनंतर, तो, १० रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल, आणि त्याने असा संप [७][किंवा यथास्थिति, कामरोध] तो बेकायदेशीर ठरविल्यापासून अठ्ठेचाळीस तासांचा अवधी संपल्यानंतर चालू ठेवला तर, अशा [९][अपराधसिध्दीनंतर ज्या ज्या दिवशी असा संप किंवा कामरोध] चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल, तो आणखी १ रुपयापर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल-- मात्र अशा दंडाची कमाल मर्यादा ५० रुपये असेल.

बेकायदेशीर म्हणून ठरविलेले संप [१३][टाळेबंदी, कामबंदी व कामरोध] यांस चिथावणी वगैरे देण्याबद्दल शास्ती.

**१०४.** ज्याबद्दल मालक, कलम १०२ अन्वये शिक्षेस पात्र आहे अशी टाळेबंदी [१०][किंवा कामबंदी] यात किंवा ज्याबद्दल कोणताही कामगार कलम १०३ अन्वये शिक्षेस पात्र आहे असा संप [११][किंवा कामरोध] यात भाग घेण्यास इतरांना जी कोणतीही व्यक्ती चिथावणी देईल किंवा प्रवृत्त करील किंवा त्याच्या पुर:सरणार्थ अन्यथा कृती करील ती व्यक्ती, अपराधसिध्दीनंतर, कैदेच्या दोहोंपैकी एका प्रकारच्या, तीन महिन्यापर्यंत वाढविता येईल इतक्या शिक्षेस किंवा दंडाच्या शिक्षेस किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल :

परंतु, अपराधाची संपरीक्षा करणाऱ्या न्यायालयाचे असे मत असेल की, प्रकरणाच्या एकंदर परिस्थितीवरून, ज्या वेळी असा अपराध घडला त्या वेळी यथास्थिति, [१२][असा संप, टाळेबंदी, कामबंदी किंवा कामरोध] याच्या कायदेशीरपणाबद्दल वाजवी शंका घेण्यास कारण होते तर, या कलमान्वये कोणत्याही शिक्षा होणार नाही.

**स्पष्टीकरण**--एक.--या कलमाच्या प्रयोजनाकरिता असा कोणताही [१३][संप, टाळेबंदी, कामबंदी किंवा कामरोध] यांच्या प्रयोजनार्थ जी व्यक्ती अंशदान देईल, गोळा करील किंवा मागेल, तिने त्याच्या पुर:सरणार्थ कृत्य केले आहे असे मानण्यात येईल.

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम २५(अ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.
[२] वरील अधिनियमाच्या कलम २५(ब) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.
[३] वरील अधिनियमाच्या कलम २५(क) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.
[४] वरील अधिनियमाच्या कलम २५(ड) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.
[५] वरील अधिनियमाच्या कलम २६(अ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.
[६] वरील अधिनियमाच्या कलम २६(ब) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.
[७] वरील अधिनियमाच्या कलम २६(क) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.
[८] वरील अधिनियमाच्या कलम २६(इ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[९] वरील अधिनियमाच्या कलम २६(ड) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.
[१०] वरील अधिनियमाच्या कलम २७(अ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.
[११] वरील अधिनियमाच्या कलम २७(ब) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.
[१२] वरील अधिनियमाच्या कलम २७(क) अन्वये हे शब्द मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले.
[१३] वरील अधिनियमाच्या कलम २७(ड) अन्वये मूळ मजकुराऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

**स्पष्टीकरण**--दोन.--बेकायदेशीर [१][संप, कामबंदी किंवा कामरोध] हे सुरू होण्यापूर्वी त्यात भाग घेण्याविषयी इतरांस जिने चिथावणी दिली असेल किंवा प्रवृत्त केले असेल किंवा त्याच्या पुर:सरणार्थ अन्यथा कृती केली असेल, तिने या कलमाखाली अपराध केला आहे, असे मानले जाईल.

**१०५.** जर समेटकर्ता, मंडळाचा सदस्य किंवा कामगार अधिकारी किंवा कोणत्याही समेटासंबंधीच्या कार्यवाहीत हजर असलेली किंवा तिच्याशी संबंध असलेली कोणतीही व्यक्ती या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून कोणतीही माहिती किंवा कोणत्याही दस्तऐवजातील मजकूर जाणूनबुजून उघड करील तर ती, ज्या पक्षाने अशा कार्यवाहीत माहिती दिली असेल किंवा दस्तऐवज हजर केला असेल त्याने तक्रार केल्यावर अपराधविध्दीनंतर १,००० रुपयांपर्यंत वाढबिता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल. गोपनीय माहिती उघड केल्याबद्दल शास्ती.

**१०६.** (१) जो कोणताही मालक [२][कामगार न्यायालयाने किंवा औद्योगिक न्यायालयाने जो बदल बेकायदेशीर असल्याचा निर्णय दिला असेल किंवा घोषित केला असेल असा फेरबदल करील], तो अपराधसिध्दीनंतर ५,००० रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल. बेकायदेशीर बदलाबद्दल शास्ती.

(२) जो कोणताही मालक कलम ४७ च्या तरतुदींचे उल्लंघन करील, तो अपराधसिध्दीनंतर तीन महिन्यापर्यंत वाढविता येईल इतक्या अवधीच्या कैदेच्या शिक्षेस पात्र होईल किंवा असे अल्लंघन चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल ५,००० रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

(३) पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये, कोणत्याही व्यक्तीस, सिध्दापराध ठरविणाऱ्या न्यायालयास असा निदेश देता येईल की, वादविषय असलेल्या बदलामुळे ज्याच्यावर प्रत्यक्ष आणि प्रतिकूल परिणाम झाला असेल अशा कोणत्याही कामगारास न्यायालय ठरवील अशी भरपाईची रक्कम अशा व्यक्तीने दिली पाहिजे.

[३][**१०६-अ.** संघाने केलेल्या अर्जावरून रचना करावयाच्या संयुक्त समितीवर जो कोणताही मालक कलम ४९, पोटकलम (१) अन्वये दिलेल्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत सदस्य नेमण्यात कसूर करील, तो, अपराधसिध्दीनंतर पन्नास रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल ; आणि अशी कसून चालू राहिल्यास, अशी कसूर चालू राहील त्या प्रत्येक दिवसाला पन्नास रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या अतिरिक्त दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.] संयुक्त समितीवर सदस्य नेमण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.

**१०७.** जो कोणताही मालक [४][कलम ३५ अन्वये [५][किंवा कलम ४०-अ अन्वये] लागू करण्यात येणारा आदर्श स्थायी आदेश किंवा] प्रकरण सात अन्वये निश्चित केलेल्या स्थायी आदेशांचे उल्लंघन करून एखादी कृती करील तो, अपराधसिध्दीनंतर ५०० रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल ; आणि अशा स्थायी आदेशाचे उल्लंघन चालू राहिल्यास, असे उल्लंघन चालू राहील त्या प्रत्येक दिवसाला १२५ रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या अतिरिक्त दंडाच्या शिक्षेस पात्र होईल. स्थायी आदेशांचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम २७(क) अन्वये मूळ शब्दांऐवजी हे शब्द शब्द दाखल करण्यात आले.

[२] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ४५ अन्वये "जो कोणताही मालक अवैध फेरफार करील" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३, कलम २२ अन्वये हे कलम दाखल करण्यात आले.

[४] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ४६ अन्वये हे शब्द दाखल करण्यात आले.

[५] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम १० अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

कर्तव्य पार पाडण्याच्या कामात एखाद्या व्यक्तीस अडथळा केल्याबद्दल शास्ती.

**१०८.** जी कोणतीही व्यक्ती, कामगार अधिकाऱ्यास किंवा कलम २५ अन्वये ज्यास प्राधिकृत करण्यात आले असेल अशा मान्यताप्राप्त संघाच्या अधिकाऱ्यास ज्या ठिकाणी प्रवेश करण्याचा हक्क असेल अशा ठिकाणी प्रवेश करू देण्याचे बुध्दिपुरस्सर नाकारील किंवा जो कोणताही दस्तऐवज हजर करण्यास तिला फर्माविण्यात येईल तो हजर करण्यात कसूर करील किंवा हा अधिनियम अथवा तदन्वये केलेले नियम यांच्या तरतुदींनुसार किंवा तदन्वये केलेली कोणतीही मागणी पुरी करण्यात अथवा दिलेला कोणताही आदेश पाळण्यात कसूर करील, ती अपराधसिध्दिनंतर ५०० रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

इतरत्र तरतूद न केलेल्या अपराधांबद्दल शास्ती.

**१०९.** जी व्यक्ती हा अधिनियम किंवा तदन्वये केलेले नियम यांच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील, ती अपराधसिध्दीनंतर जर अशा उल्लंघनाबद्दल या अधिनियमाअन्वये किंवा तदनुसार इतरत्र दुसऱ्या कोणत्याही शास्तीची तरतूद करण्यात आली नसेल तर, १,०० रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल आणि अशा व्यक्तीस या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार केलेल्या नियमाअन्वये पूर्वी सिध्दापराध ठरविण्यात आले असेल तर, ती २०० रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

दंड आणि भरपाई यांची वसुली.

**११०.** कोणत्याही न्यायालयाने या अधिनियमान्वये भरावयाची रक्कम म्हणून बसविलेल्या कोणत्याही दंडाची आणि निदेशित केलेल्या कोणत्याही भरपाईची रक्कम जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल.

## प्रकरण सतरा

## औद्योगिक स्थितीचा अभिलेख

औद्योगिक बाबी वगैरे यांचा अभिलेख.

**१११.** [१][राज्य] शासनास कोणत्याही उद्योगाच्या बाबतीत--

(अ) अनुसूचीत समाविष्ट केलेल्या औद्योगिक बाबींचा विहित रीतीने अभिलेख ठेवता येईल ;

(ब) [१][राज्य] शासनाच्या मते खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबीवर ज्यांचा परिणाम होण्याचा संभव असेल अशा पुढील गोष्टींचा विहित करण्यात येईल अशा नमुन्याप्रमाणे अभिलेख ठेवण्याविषयी व त्यांच्या प्रती सादर करण्याविषयी कोणत्याही मालकास किंवा सर्वसाधारणपणे सर्व मालकांना फर्माविता येईल त्या गोष्टी अशा--

(एक) संयंत्र, परिवास्तू व तयार केलेला माल याविषयी आकडेवार माहिती.

(दोन) इतर औद्योगिक व्यवहार व देवघेवी.

अभिलेख पडताळून पाहण्यासाठी चौकशी.

**११२.** (१) कलम १११ च्या तरतुदींन्वये मालकाने ठेवलेल्या कोणत्याही अभिलेखाचा बिनचूकपणा पडताळून पाहण्याच्या प्रयोजनासाठी [१][राज्य] शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास, विहित केलेल्या शर्तींच्या अधीनतेने चौकशी करता येईल. तसेच त्यास कोणत्याही व्यक्तीस तिच्या कब्जात असलेले कोणतेही संबध्द अभिलेख किंवा दस्तऐवज हजर करण्यास फर्माविता येईल ; आणि त्यानंतर अशी व्यक्ती आपल्या कब्जातील संबध्द अभिलेख किंवा दस्तऐवज हजर करील. तसेच अशा अधिकाऱ्यास, त्याने वाजवी नोटीस दिल्यानंतर, जेथे असे अभिलेख किंवा दस्तऐवज आहेत असे त्यास वाटत असेल अशा कोणत्याही जागेत कोणत्याही वाजवी वेळी प्रवेश करता येईल ; आणि अशा अभिलेखाचा बिनचूकपणा पडताळून पाहण्यासाठी आवश्यक असा कोणताही प्रश्न विचारता येईल :

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रतिक" या शब्दांऐवजी हा शब्द शब्द दाखल करण्यात आला.

परंतु, जेव्हा अशी परिवास्तू एखाद्या व्यक्तीची नेहमीची धंद्याची परिवास्तू नसेल, तेव्हा, असा अधिकारी, [१][राज्य] शासनाची पूर्वपरवानगी घेतल्यावाचून, या पोट-कलमान्वये अशा जागेत प्रवेश करणार नाही.

(२) अशा अधिकाऱ्याने अशा अभिलेखाकरिता माहिती मिळविण्यासाठी केलेली कोणतीही कार्यवाही ही, भारतीलय दंड संहिता, कलम १९२ च्या अर्थानुसार न्यायिक कार्यवाही आहे असे मानले जाईल. १८६० चा ४५.

प्रकरण अठरा

## संकीर्ण

**११३.** [१][राज्य] शासनास **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कोणत्याही वेळी अनुसूची एक, दोन किंवा तीन यात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही औद्योगिक बाबीत, फेरफार करता येईल किंवा जादा बाबी दाखल करता येतील किंवा त्यातून अशी कोणतीही बाब वगळता येईल : अनुसूचीत फेरफार करणे.

परंतु, अशी कोणतीही जादा बाब दाखल करण्यापूर्वी, फेरफार करण्यापूर्वी किंवा वगळण्यापूर्वी अशा रीतीने जादा बाब दाखल करणे, फेरफार करणे किंवा काढणे याविषयीचा मसुदा त्यामुळे बाधित होण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येईल आणि [१][राज्य] शासन, कोणत्याही व्यक्तीकडून त्यासंबंधी ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना त्यांच्याकडे येतील, त्यांचा विचार करील.

[२][**११३-अ.** कलमे १३, १६, १७ किंवा २३ अन्वये केलेल्या कोणत्याही अर्जाचे काम पुढे चालविण्यात अर्जदार संघाने कोणत्याही पुरेशा कारणावाचून कसूर केली आहे अशी निबंधकाची खात्री झाल्यास, त्यास असा अर्ज पंधरा दिवसांची नोटीस दिल्यानंतर, खारीज करता येईल.] विवक्षित अर्ज त्यांचे काम चालू ठेवल्याने खारीज करणे.

**११४.** (१) नोंदणीकृत करार किंवा मिटवणूक, सादर निवेदन किंवा निवाडा हा त्यांत जे पक्षकार असतील त्या सर्व व्यक्तींवर बंधकारक असेल : करार वगैरे कोणावर बंधनकारक असेल.

(अ) असा करार, मिटवणूक, सादर निवेदन किंवा निवाडा यात पक्षकार असलेल्या मालकाच्या बाबतीत, ज्या उपक्रमासंबंधी असा करार, मिटवणूक, सादर निवेदन किंवा निवाडा करण्यात आला असेल त्या उपक्रमांच्या संबंधात अशा मालकाचे जे हितसंबंधाचे उत्तराधिकारी, वारस किंवा अभिहस्तांकिती असतील त्या सर्व व्यक्ती, आणि

(ब) असा करार, मिटवणूक, सादर निवेदन किंवा निवाडा यात पक्षकार असलेल्या नोंदणीकृत संघाच्या बाबतीत, [३][स्थानिक क्षेत्रात असलेल्या उद्योगातील ज्या कामगारांचा उक्त संघ प्रतिनिधी असेल ते सर्व कामगार],

यांच्यावर असा करार, मिटवणूक, सादर निवेदन किंवा निवाडा बंधनकारक असेल.

(२) नोंदणीकृत करार किंवा मिटवणूक, सादर निवेदन किंवा निवाडा यात एखादा प्रतिनिधी संघ, पक्षकार असेल अशा बाबतीत, बाधित पक्षकारास आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यावर [१][राज्य] शासनास **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असा निदेश देता येईल की, असा करार, मिटवणूक, सादर निवेदन किंवा निवाडा हा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा त्या स्थानिक क्षेत्रातील उद्योगात किंवा व्यवसायात असलेल्या इतर मालकांवर आणि कामगारांवर बंधनकारक असेल :

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रतिक" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.
[२] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम २६ अन्वये कलम ११३-अ दाखल करण्यात आले.
[३] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४९, कलम ३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु, या कलमान्वये निदेश देण्यापूर्वी [१][राज्य] शासनास, त्यास योग्य वाटेल अशा बाबतीत औद्योगिक न्यायालयाकडे त्याच्या अभिप्रायार्थ निर्देश करता येईल.

(३) एखाद्या बदलामुळे जे बाधित झाले असतील किंवा कलम ४३ अन्वये जे बाधित झाले आहेत असे मानण्यात आले असेल अशा बहुसंख्य कामगारांचा प्रतिनिधींनी केलेला कोणताही नोंदणीकृत करार अशा रीतीने बाधित झालेल्या किंवा बाधित झाल्याचे मानण्यात आलेल्या सर्व कामगारांवर बंधकारक असेल.

[२][वेतन मंडळाचा किंवा कामगार न्यायालयाचा] आदेश किंवा निर्णय कोणावर बंधनकारक असेल.

**११५.** [२][वेतन मंडळाने किंवा कामगार न्यायालयाने] मालकाविरुध्द दिलेला कोणताही आदेश किंवा निर्णय हा, ज्या उपक्रमाच्यासंबंधी तो दिला असेल त्या उपक्रमाच्या संबंधात त्या मालकाचे जे हितसंबंधाचे उत्तराधिकारी, वारस आणि अभिहस्तांकिती असतील त्यांच्यावर बंधनकारक असेल, आणि जर असा आदेश किंवा निर्णय नोंदणीकृत संघाविरुध्द असेल तर, [३][स्थानिक क्षेत्रातील उद्योगातील ज्या कामगारांचा उक्त संघ प्रतिनिधी असेल त्या सर्व कामगारांवर बंधनकारक असेल.]

मालक आणि प्रातिनिधिक संघ यांमधील कराराच्या अटीप्रमाणे आदेश, निर्णय किंवा निवाडा असणे.

[४][**११५-अ.** लवाद, वेतन मंडळ, कामगार न्यायालय किंवा औद्योगिक न्यायालय याच्यापुढे प्रलंबित असलेल्या कोणत्याही औद्योगिक विवादात जो पक्षकार आहे असा मालक आणि प्रातिनिधिक संघ यांच्या दरम्यान जर कोणताही करार घडून आला असेल तर, अशा कार्यवाहीत द्यावयाचा आदेश, निर्णय किंवा निवाडा हा अशा कराराच्या अटीप्रमाणे देण्यात येईल. मात्र, असे करण्यापूर्वी लवाद, वेतन मंडळ, कामगार न्यायालय किंवा औद्योगिक न्यायालय याची अशी खात्री झाली पाहिजे की, असा करार या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करून करण्यात आलेला नव्हता किंवा दोहोंपैकी कोणत्याही पक्षाची संमती चुकीने, अपवेदनाने, कपटाने, गैरवाजवी वजन खर्च करून, जबरदस्ती करून किंवा धाकदपणा दाखवून मिळविण्यात आली नव्हती.]

करार वगैरे परिणामक असण्याचे केव्हा बंद होईल.

**११६.** (१) कोणताही नोंदणीकृत करार किंवा मिटवणूक किंवा निवाडा त्यांत विनिर्दिष्ट केलेल्या तारखेस अंमलात असण्याचे बंद होईल किंवा अशी कोणतीही तारीख त्यांत विनिर्दिष्ट करण्यात आलेली नसेल तेव्हा, यथास्थिति, असा करार, मिटवणूक किंवा निवाडा समाप्त व्हावा अशी लेखी नोटीस त्यातील उभय पक्षांपैकी कोणत्याही पक्षाने दुसऱ्या पक्षास विहित रीतीने ज्या तारखेस दिली असेल अशा तारखेपासून दोन महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर परिणामक असण्याचे बंद होईल :

परंतु, अशी कोणतीही नोटीस, असा करार, मिटवणूक किंवा निवाडा, परिणामक झाल्यापासून तीन महिने संपेपर्यंत देण्यात येणार नाही.

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रतिक" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन १९४८ च्या मुंबई अधिनियम क्रमांक ४३, कलम २३ अन्वये हे शब्द बदली दाखल करण्यात आले.

[३] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४९, कलम ४ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५, कलम १८ अन्वये हे कलम ११५-अ दाखल करण्यात आले.

(२) नोंदणीकृत करार किंवा मिटवणूक किंवा [1][कराराच्या अटीप्रमाणे दिलेला निवाडा] याच्या अटीत, त्यामुळे परिणाम होणाऱ्या पक्षांच्या परस्पर संमतीने बदल किंवा फेरबदल करण्यास या कलमातील कोणत्याही तरतुदीमुळे प्रतिबंध होणार नाही [2][आणि असा नोंदणीकृत करार, मिटवणूक किंवा निवाडा त्याप्रमाणे बदलण्यात आला आहे किंवा त्यात फेरबदल करण्यात आला आहे. असे मानले जाईल].

(३) पोट-कलम (१) किंवा (२) यात काहीही अंतर्भूत असले तरी, जर एखाद्या नोंदणीकृत करारात, मिटवणुकीत किंवा निवाड्यात अशी तरतूद करण्यात आली असेल की, असा करार, मिटवणूक किंवा निवाडा एक वर्षापेक्षा अधिक कालावधीपर्यंत अंमलात राहील तर , असा करार, मिटवणूक किंवा निवाडा त्याच्या प्रारंभाच्या तारखेपासून एक वर्षाचा कालावधी संपल्यानंतर, उभय पक्षांपैकी कोणत्याही पक्षाने दुसऱ्या पक्षास विहित रीतीने दोन महिन्यांची नोटीस देऊन समाप्त करता येईल.

(४) पोट-कलम (१) किंवा (३) अन्वये नोटीस देणारा पक्ष अशा नोटिशीची प्रत निबंधकाला आणि संबंधित स्थानिक क्षेत्रातील कामगार अधिकाऱ्याला पाठवील.

(५) जर एखादा नोंदणीकृत करार किंवा मिटवणूक किंवा निवाडा पोट-कलम (१) किंवा (३) अन्वये समाप्त करण्यात आला तर, किंवा जर नोंदणीकृत कराराच्या किंवा मिटवणुकीच्या [3][किंवा निवाड्याच्या] अटी, परस्पर संमतीने बदलण्यात आल्या किंवा त्यात फेरबदल करण्यात आला, तर, असा करार किंवा मिटवणूक किंवा निवाडा समाप्त झाल्याची किंवा अशा अटीत बदल किंवा फेरबदल केल्याची नोटीस संबंधित पक्ष निबंधकाला व कामगार अधिकाऱ्याला देईल. निबंधक, असा करार, मिटवणूक किंवा निवाडा समाप्त झाल्याच्या किंवा अशा अटींत बदल किंवा फेरबदल केल्याच्या नोटिशीची नोंद त्या प्रयोजनासाठी ठेवलेल्या नोंदवहीत करील.

**स्पष्टीकरण :--**या कलमाच्या प्रयोजनांकरिता, नोंदणीकृत करार किंवा मिटवणूक किंवा निवाडा समाप्त झाल्यास किंवा नोंदणीकृत कराराच्या किंवा मिटवणुकीच्या [3][किंवा निवाड्याच्या] अटी बदलण्यास किंवा त्यात फेरबदल करण्यास जे सक्षम असतील आणि जे पोट-कलम (५) अन्वये असा करार, मिटवणूक किंवा निवाडा समाप्त केल्याची किंवा त्या अटीत बदल किंवा फेरबदल केल्याची नोटीस देतील ते पक्षकार म्हणजे ज्याने करारावर किंवा मिटवणूकीवर सही केली असेल किंवा जो निवाड्यातील पक्षकार असेल तो मालक किंवा संबंधित उपक्रमाच्या बाबतीत अशा मालकाचे जे वारस, उत्तराधिकारी किंवा अभिहस्तांकिती असतील त्या व्यक्ती आणि त्या करारामुळे, मिटवणुकीमुळे किंवा निवाड्यामुळे ज्यांच्यावर परिणाम होण्याची शक्यता असेल अशा कामगारांचा प्रतिनधी हे असतील.

[4][**११६-अ.** (१) निवाडा समाप्त झाल्याची नोटीस देण्याची कलम ११६ च्या तरतुदीन्वये ज्यास हक्क आहे अशा कोणत्याही पक्षास, अशी नोटीस देण्याऐवजी, पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेला कालावधी संपल्यावर, ज्या औद्योगिक न्यायालयाने, कामगार न्यायालयाने किंवा वेतन मंडळाने असा निवाडा दिला असेल त्याच्याकडे त्यात फेरबदल करण्याविषयी अर्ज करता येईल. निवाड्यात फेरबदल करणे.

(२) (अ) ज्या निवाड्यात तो अंमलात असण्याचे ज्या तारखेस बंद होईल ती तारीख विनिर्दिष्ट केली नसेल अशा निवाड्याच्या बाबतीत, असा अर्ज, कलम ११६ अन्वये निवाडा समाप्त करण्याची नोटीस ज्या तारखेस देता येईल त्या तारखेपासून दोन महिन्यांचा कालावधी संपेपर्यंत करण्यात येणार नाही ;

(ब) ज्या निवाड्यात तो एक वर्षापेक्षा अधिक कालावधीपर्यंत अंमलात राहील अशी तरतूद केलेली असेल अशा निवाड्याच्या बाबतीत असा अर्ज, निवाडा अंमलात येण्याच्या तारखेपासून एक वर्षाचा कालावधी संपेपर्यंत करण्यात येणार नाही.

---

[1] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५५ याच्या कलम १९ (एक) (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १९ (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम १९ (दोन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७४, कलम २८ अन्वये हे कलम दाखल करण्यात आले.

(३) असा अर्ज करण्यात आल्यानंतर, यथास्थिति, औद्योगिक न्यायालय, कामगार न्यायालय किंवा वेतन मंडळ यास उभय पक्षांचे म्हणणे ऐकून घेऊन आणि त्यास योग्य वाटेल असा पुरावा घेऊन [१][निवाड्यात भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावासह फेरफार करता येईल. तथापि, भूतलक्षी प्रभावासह कोणताही फेरफार केल्यास, तो, पोट-कलम (१) अन्वये केलेल्या अर्जाच्या तारखेच्या आधी अंमलात येणार नाही.]

(४) जेव्हा पोट-कलम (१) अन्वये निवाड्यात फेरबदल करण्याविषयी अर्ज करण्यात आला असेल तेव्हा, निवाड्यात निर्धारित केलेल्या गोष्टींच्या बाबतीत अशा निवाड्याचा जो बंधनकारी परिणाम असेल त्यात फेरबदल करण्यात येईपर्यंत त्यास अशा अर्जामुळे कोणत्याही रीतीने बाध येणार नाही.

(५) या कलमातील कोणत्याही तरतुदीमुळे, असा निवाडा कलम ११६ च्या तरतुदीनुसार समाप्त करण्याचा कोणत्याही पक्षास जो हक्क असेल, त्यास बाध येणार नाही.

संघाच्या कार्यकारी मंडळाचे दायित्व.

**११७.** जेव्हा या अधिनियमान्वये कोणत्याही संघास कोणतीही गोष्ट करणे भाग असेल तेव्हा, याबाबत संघाच्या कार्यकारी मंडळाकडून प्राधिकृत करण्यात आलेली व्यक्ती आणि याप्रमाणे कोणत्याही व्यक्तीस प्राधिकृत करण्यात आले नसेल तेव्हा संघाच्या कार्यकारी मंडळाचा प्रत्येक सदस्य हा, ती गोष्ट करण्यास बांधलेला राहील आणि अशी कोणतीही गोष्ट करण्यात कसूर झाली तर, तो त्याबद्दल व्यक्तिश: उत्तरदायी असेल.

**स्पष्टीकरण.**--या कलमाच्या प्रयोजनाकरिता संघाचे कार्यकारी मंडळ म्हणजे ज्या मंडळाकडे संघाच्या कारभाराच्या व्यवस्थापनाचे काम सोपविण्यात आले असेल ते मंडळ--मग ते कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो.

साक्षीदाराच्या नावे समन्स काढणे वगैरे यासंबंधी विवक्षित प्राधिकाऱ्यांचे अधिकार.

**११८.** (१) या अधिनियमान्वये चौकशी करण्याच्या किंवा कार्यवाही करण्याच्या प्रयोजनाकरिता निबंधक, समेटकर्ता, [२][वेतन मंडळ] किंवा मंडळ यांना, तसेच आपल्या साधारण अधिकारितेत कामगार न्यायालयाला आणि चौकशी न्यायालय व औद्योगिक न्यायालय यांना, पुढील बाबींच्या संबंधात न्यायालयामध्ये जे अधिकार निहित असतात तेच अधिकार असतील :--

(अ) प्रतिज्ञालेखांवरून गोष्टी सिध्द करणे ;

(ब) कोणत्याही व्यक्तीस समन्स काढून बोलविणे आणि तिला हजर राहण्याची सक्ती करणे आणि तिची शपथेवर तपासणी करणे ;

(क) दस्तऐवज हजर करण्याची सक्ती करणे ; आणि

(ड) साक्षीदारांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे काढणे.

(२) निबंधक, समेटकर्ता, [२][वेतन मंडळ] किंवा मंडळ, यांना विहित करण्यात येतील असे आणखीही अधिकार असतील.

(३) प्रकरण सतराअन्वये अभिलेख संकलित करून तो ठेवण्यासाठी आवश्यक ती माहिती मिळविण्याच्या प्रयोजनार्थ कलम ११२ अन्वये प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास पोट-कलम (१), खंड (ब) व (क) आणि पोट-कलम (२) यांत विनिर्दिष्ट केलेले अधिकार असतील.

[३][(४) वेतन मंडळ, कामगार न्यायालय आणि औद्योगिक न्यायालय यांस त्यांच्यापुढील कार्यवाहीतील कोणत्याही पक्षास आपल्यापुढील कोणत्याही कार्यवाहीच्या प्रयोजनासाठी त्याच्या मते संबध्द असलेली कोणतीही माहिती, त्यास योग्य वाटेल अशा नमुन्यामध्ये, लेखी पुरविण्याविषयी सांगण्याचे

---

[१] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ४७ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.
[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३, कलम २४ अन्वये हा शब्द दाखल करण्यात आला.
[३] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम २७ अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

अधिकारही असतील आणि अशा रीतीने ज्या पक्षास सांगण्यात आले असेल तो पक्ष त्यानंतर आपल्या उत्तम माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे अशी माहिती पुरवील आणि मंडळान किंवा न्यायालयाने त्यास तसे करण्यास फर्माविल्यास ती माहिती विहित करण्यात येईल अशा रितीने सत्यापित करून देईल.]

[१][**११८-अ.** कलम १०४ खालील अपराध दखली असेल]. कलम १०४ खालील अपराध दखली असणे.

[२][**११८-ब.** (१) जेव्हा औद्योगिक न्यायालयापुढील किंवा कामगार न्यायालयापुढील कोणत्याही कार्यवाहीत जर कोणताही पक्ष, सुनावणीची नोटीस त्याच्यावर रीतसर बजावण्यात आली असतानासुध्दा ती बाब सुनावणीस आली असता हजर राहिला नसेल तर न्यायालयास त्या बाबीची सुनावणी नंतरच्या तारखेपर्यंत स्थगित करता येईल किंवा एकतर्फी कामकाज चालवून त्यास योग्य वाटेल असा निवाडा, आदेश किंवा निर्णय देता येईल.] पक्ष हजर न झाल्याचे परिणाम.

[३][(१-अ) जेव्हा औद्योगिक न्यायालयापुढील किंवा कामगार न्यायालयापुढील कोणत्याही कार्यवाहीत, जर कोणताही पक्ष, त्याला सुनावणीची नोटीस रीतसर बजावण्यात आली असतानासुध्दा, ती बाब सुनावणीसाठी आली असता हजर राहिली नसेल तर न्यायालयास, तो अर्ज, विनंती अर्ज, संदर्भ किंवा अन्य कार्यवाही खारीज करण्यात यावी, असा आदेश देता येईल.]

(२) जेव्हा, पोट-कलम (१) अन्वये, कोणताही निवाडा, आदेश किंवा निर्णय एकतर्फी देण्यात येईल तेव्हा, [४][किंवा पोट-कलम (१-अ) अन्वये, कोणतीही कार्यवाही खारीज करण्याचा आदेश देण्यात येईल तेव्हा,] त्यामुळे व्यथित झालेल्या पक्षास, त्याची प्रत मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, असा निवाडा, आदेश किंवा निर्णय [५][किंवा खारीज करण्याचा असा आदेश] अपास्त करण्यासाठी न्यायालयाकडे अर्ज करता येईल. व्यथित पक्ष हजर न होण्यास पुरेसे कारण होते अशी, औद्योगिक न्यायालयाची किंवा कामगार न्यायालयाची खात्री झाली तर, त्यास दिलेला निवाडा, आदेश किंवा निर्णय [६][खारीज करण्याचा आदेश याप्रमाणे करता येईल आणि त्या बाबतीत कार्यवाही चालविण्यासाठी एखादी तारीख नेमता येईल.

परंतु विरुध्द पक्षावर त्यासंबंधीची नोटीस बजावण्यात आल्याशिवाय उपरोक्त अशा कोणत्याही अर्जावरून कोणताही निवाडा, आदेश किंवा निर्णय किंवा [७][यथास्थिति खारीज करण्याचा आदेश] अपास्त केला जाणार नाही].

**११९.** निबंधक, सहाय्यक निबंधक, समेटकर्ता, कामगार अधिकारी, सहायक कामगार अधिकारी, लवाद, [८][वेतन मंडळाचा सदस्य,] मंडळाचा सदस्य, कलम ११२ अन्वये प्राधिकृत केलेला अधिकारी, कामगार न्यायालयाचा न्यायाधीश, औद्योगिक न्यायालयाचा किंवा चौकशी न्यायालयाचा सदस्य आणि अशा कोणत्याही उक्त न्यायालयाच्या कर्मचारीवर्गाचा सदस्य हे, भारतीत दंड संहिता, कलम २१ च्या अर्जानुसार लोकसेवक आहे असे मानण्यात येईल. काही अधिकारी लोकसेवक असणे. १८६० चा १४.

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३, कलम २५ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.
[२] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ४७ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.
[३] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ११ (१) अन्वये हे कलम जादा दाखल करण्यात आले.
[४] वरील अधिनियमाच्या कलम ११ (२) (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[५] वरील अधिनियमाच्या कलम ११ (२) (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[६] वरील अधिनियमाच्या कलम ११ (२) (क) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[७] वरील अधिनियमाच्या कलम ११ (२) (ड) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[८] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३, कलम २६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

स्तऐवज वगैरे हजर न केल्यामुळे औद्योगिक न्यायलयाचा, कामगार न्यायालयाचा आणि वेतन मंडळाचा अवमान.

[1][**११९-अ.** जर कोणतीही व्यक्ती--

(अ) जेव्हा तिला औद्योगिक न्यायालयाने किंवा कामगार न्यायालयाने किंवा वेतन मंडळाने कोणताही दस्तऐवज हजर करण्यास किंवा सुपूर्द करण्यास [2][किंवा कोणतीही माहिती पुरविण्यास] आदेश दिला असेल तेव्हा, ती तसे करण्यास कायदेशीररीत्या बांधलेली असताना, तसे बुध्दिपुरस्सर करणार नाही ; किंवा

(ब) जेव्हा तिला औद्योगिक न्यायालयाने, कामगार, न्यायालयाने किंवा वेतन मंडळाने खरे सांगण्यास शपथेवर किंवा दृढकथनावर बांधील राहण्याविषयी सांगितले असेल तेव्हा, तसे करण्याचे नाकारील ; किंवा

(क) औद्योगिक न्यायालयास किंवा कामगार न्यायालयास किंवा वेतन मंडळास कोणत्याही विषयासंबंधी खरे सांगण्यास कायदेशीररीत्या बांधलेली असता, अशा न्यायालयाने किंवा मंडळाने अशा विषयासंबंधी त्यास विचारलेल्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देण्याचे नाकारील ; किंवा

(ड) औद्योगिक न्यायालय किंवा कामगार न्यायालय किंवा वेतन मंडळ याच्यापुढील कोणत्याही न्यायिक कार्यवाहीच्या टप्प्यावर अशा न्यायालयाचा किंवा मंडळाचा अद्देशपूर्वक अवमान करील किंवा त्याच्या कामात अडथळा आणील ;

तर ती, अपराधसिध्दीनंतर सहा महिन्यांपर्यंत वाढविता येईल इतक्या अवधीच्या कैदेच्या शिक्षेस पात्र होईल किंवा एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

(२) जी कोणतीही व्यक्ती औद्योगिक न्यायालयाने, कामगार न्यायालयाने किंवा वेतन मंडळाने सांगितले असता, आपण केलेल्या कोणत्याही निवेदनावर सही करण्याचे नाकारील ती, अपराधसिध्दीनंतर तीन महिनेपर्यंत वाढविता येईल इतक्या अवधीच्या कैदेच्या शिक्षेस किंवा ५०० रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

(३) जर पोट-कलम (१) किंवा (२) खालील कोणताही अपराध यथास्थिति, औद्योगिक न्यायालयाच्या, कामगार न्यायालयाच्या किंवा वेतन मंडळाच्या दृष्टीसमक्ष किंवा आरोपीच्या समोर करण्यात आला तर, अशा न्यायालयास किंवा वेतन मंडळास, अपराधास घटकभूत असलेली वस्तुस्थिती आणि निवेदन [3][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३] यात तरतूद केल्याप्रमाणे नमूद करून, असे प्रकरण त्याची संपरिक्षा करण्याची अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्याकडे पाठविता येईल. तसेच त्यास आरोपीने अशा दंडाधिकाऱ्याच्या समोर हजर राहण्यासाठी जामीन देण्याबद्दल फर्माविता येईल किंवा, जर पुरेसा जामीन देण्यात आला नाही तर, अशा व्यक्तीस अशा दंडाधिकाऱ्याकडे अभिरक्षेत पाठवील. ज्या दंडाधिकाऱ्यांकडे याप्रमाणे कोणतेही प्रकरण पाठविण्यात आले असेल तो, उक्त फौजदारी प्रक्रिया संहितेत तरतूद केलेल्या रीतीने आरोपीविरुध्द असलेल्या तक्रारीच्या सुनावणीचे काम सुरू करील.

१९७४ चा २.

१९२९ चा ७.

औद्योगिक न्यायालये, कामगार न्यायालये व वेतन मंडळे यांचे इतर प्रकारचे अवमान.

[**११९-ब.** (१) जर कोणतीही व्यक्ती, औद्योगिक न्यायालयावर, कामगार न्यायालयावर किंवा वेतन मंडळावर अनुचित वजन पडावे या हेतूने किंवा अशा न्यायालयाची, मंडळाची किंवा त्याच्या सदस्याची किंवा त्याच्या न्यायाधीशाची बेअदबी किंवा अवमान व्हावा या हेतूने किंवा त्याच्या अधिकारास कमीपणा यावा या हेतूने अथवा अशा कोणत्याही न्यायालयाच्या किंवा मंडळाच्या विधिसंगत प्रक्रियेत अडथळा यावा या हेतूने कोणतीही कृती करील किंवा कोणतेही लिखाण प्रसिध्द करील तर, अशी व्यक्ती, यथास्थिती, अशा न्यायालयाचा किंवा मंडळाचा अवमान केल्याबद्दल दोषी आहे असे मानण्यात येईल.

[1] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३, कलम २७ अन्वये कलमे ११९-अ, ११९-ब ही दाखल करण्यात आली.

[2] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम २८ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[3] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम १२ अन्वये "दंड प्रक्रिया संहिता, १८९८" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) खुद्द औद्योगिक न्यायालयाचा अवमान झाला असेल त्याबाबतीत, असे न्यायालय अशा अवमानात घटकभूत असणाऱ्या वस्तुस्थितीची नोंद करील आणि त्याबाबत उच्च न्यायालयाकडे प्रतिवृत्त पाठवील.

(३) वेतन मंडळाचा किंवा कामगार न्यायालयाचा अवमान झाला असेल त्याबाबतीत, असे मंडळ किंवा न्यायालय अशा अवमानात घटकभूत असणाऱ्या वस्तुस्थितीची नोंद करील आणि त्याबाबत औद्योगिक न्यायालयाकडे प्रतिवृत्त पाठवील[१], त्यानंतर औद्योगिक न्यायालयास, तसे करणे इष्ट वाटल्यास, ते प्रतिवृत्त उच्च न्यायालयाकडे पाठविता येईल.

(४) जेव्हा पोट-कलम (२) किंवा (३) अन्वये उच्च न्यायालयास अशा कोणत्याही अवमानासंबंधी कोणतीही सूचना किंवा प्रतिवृत्त मिळेल तेव्हा, उच्च न्यायालय जणू काही आपलाच अवमान झाला असावा त्याप्रमाणे त्याचा विचार करील ; आणि स्वतःच्या अवमानाच्या संबंधात त्यास जी अधिकारिता आणि जे अधिकार असतील तीच अधिकारिता आणि तेच अधिकार त्यास याबाबतीत असतील आणि तशी अधिकारिता आणि अधिकार हे ज्या कार्यपध्दतीस आणि प्रथेस अनुसरून उच्च न्यायालयाने चालविले असते तीच कार्यपध्दती आणि प्रथा अनुसरून ते या बाबतीत चालवील.]

[१][**११९-क.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, यथास्थिति, औद्योगिक न्यायालय, कामगार न्यायालय किंवा वेतन मंडळ यास, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींअन्वये त्याच्याकडे निर्णयासाठी निर्देशित करण्यात आलेल्या कोणत्याही औद्योगिक बाबीतून किंवा विवादातून उद्‌भवणाऱ्या सर्व बाबींचा निर्णय करण्याचा अधिकार असेल.] औद्योगिक न्यायालय वगैरे यांचा, सर्व संबंधित बाबींचा निर्णय करण्याचा अधिकार.

[१][**११९-ड.** औद्योगिक न्यायालय, कामगार न्यायालय किंवा वेतन मंडळ यांच्यापुढील या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीत त्यांना न्याय व योग्य वाटतील असे कोणतेही अंतरिम आदेश देता येतील.] औद्योगिक न्यायालय वगैरे यांचा, अंतरिम आदेश देण्याचा अधिकार.

१९२९ चा ७. [१][**११९-इ.** या अधिनियमान्वये सद्‌भावपूर्वक केलेल्या किंवा केल्याचे दिसून येणाऱ्या अशा कोणत्याही कारवाईबद्दल कोणत्याही व्यक्तीविरूध्द कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.] या अधिनियमान्वये केलेल्या कारवाईला संरक्षण.

**१२०.** या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे औद्योगिक विवाद अधिनियम, १९२९ याच्या कोणत्याही तरतुदीस बाध येणार नाही, आणि जी कोणतीही बाब किंवा उद्योगातील विवाद उक्त अधिनियमान्वये चौकशी न्यायालयाकडे किंवा समेट मंडळाकडे पाठविण्यात आला असेल आणि त्याच्यापुढे चालू असेल, अशा बाबीसंबंधी किंवा विवादासंबंधी कोणतेही समेटाचे किंवा लवादीचे काम या अधिनियमान्वये चालविता येणार नाही. सन १९२९ चा अधिनियम क्रमांक ७ याच्या तरतुदींना बाध न येणे.

---

[१] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम २९ अन्वये कलमे ११९-क, ११९-ड आणि ११९-इ ही दाखल करण्यात आली.

सन १९३४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९ चे निरसन.

[1][**१२१.** मुंबई औद्योगिक विवाद समेट अधिनियम, १९३४ हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे.] १९३४ चा मुंबई ९.

सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५ चे निरसन.

**१२२.** मुंबई औद्योगिक विवाद अधिनियम, १९३८, हा या अन्वये निरसित करण्यात येत आहे : १९३८ चा मुंबई २५.

परंतु,--

(अ) याप्रमाणे निरसित करण्यात आलेल्या अधिनियमाच्या तरतुदी अन्वये केलेली प्रत्येक नेमणूक, किंवा विनियम अथवा काढलेला प्रत्येक आदेश किंवा नोटीस अथवा काढलेली कोणतीही अधिसूचना या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर प्रस्तुत अधिनियमान्वये केलेली कोणतीही नेमणूक, नियम किंवा विनियम अथवा दिलेला कोणताही आदेश किंवा नोटीस अथवा काढलेली कोणतीही अधिसूचना याद्वारे अधिक्रमण झालेले असल्याखेरीज आणि होईतोपर्यंत, या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये करण्यात, देण्यात किंवा काढण्यात आल्या आहेत असे मानले जाईल ;

(ब) याप्रमाणे निरसित करण्यात आलेल्या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये ठरविलेला कोणताही स्थायी आदेश, नोंदलेला करार, अंमलात आलेले बदल, अभिलिखित केलेल्या किंवा नोंदलेल्या मिटवणूका, नोंदलेली सादर निवेदने, दिलेले निवाडे किंवा औद्योगिक न्यायालयाने दिलेले आदेश हे, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये समुचित प्राधिकाऱ्याने ठरविले आहेत, नोंदले आहेत, अंमलात आणले आहेत, अभिलिखित केले आहेत किंवा करण्यात आले आहेत किंवा दिले आहेत, असे मानले जाईल ;

(क) याप्रमाणे निरसित करण्यात आलेल्या अधिनियमान्वये संपादन केलेला किंवा प्राप्त झालेला कोणताही हक्क किंवा विशेषाधिकार अथवा प्राप्त झालेले किंवा पत्करलेले बंधन किंवा दायित्व यास बाध येणार नाही ; आणि अशा हक्काच्या, विशेषाधिकाराच्या, आबंधनाच्या किंवा दायित्वाच्या संबंधातील कोणतेही अन्वेषण, कायदेशीर कार्यवाही किंवा उपाययोजना ही, प्रस्तुत अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर, जणू उक्त अधिनियम निरसित करण्यात आला नसावा त्याप्रमाणे व तो प्रवर्तनात आहे असे मानून सुरू करण्यात किंवा दाखल करण्यात येईल आणि तद्‌वत त्यांचा फायदा घेतला जाईल ;

(ड) याप्रमाणे निरसित करण्यात आलेल्या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये औद्योगिक न्यायालयापुढे चालू असलेली कोणतीही कार्यवाही किंवा चालू असलेल्या समेटाची कार्यवाही किंवा त्या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधांच्या संपरीक्षेसंबंधी चालू असलेली कोणतीही कार्यवाही ही जणू उक्त अधिनियम निरसित करण्यात आलेला नसावा आणि तो अंमलात असावा त्याप्रमाणे चालू ठेवण्यात आणि पूर्ण करण्यात येईल ; आणि अशा कार्यवाहीत केलेली कोणतीही शास्ती, याप्रमाणे निरसित करण्यात आलेल्या अधिनियमान्वये नमूद करण्यात येईल ;

(इ) याप्रमाणे निरसित करण्यात आलेल्या अधिनियमान्वये कामगारांचे प्रतिनिधी म्हणून हजर राहण्याचा किंवा कृती करण्याचा ज्यात हक्क असेल असा नोंदणीकृत संघ किंवा प्रातिनिधिक संघ किंवा अर्हताप्राप्त संघ किंवा निवडून आलेले इतर प्रतिनिधी हे, उक्त अधिनियम निरसित करण्यात आला असला तरी, या अधिनियमान्वये चालू असलेल्या कोणत्याही कार्यवाहीत, हा अधिनियम अंमलात आल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या अवधीपर्यंत कामगारांचे प्रतिनिधी म्हणून काम करण्याचे चालू ठेवतील.

---

[1] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ४९ अन्वये कलम १२१ बदली दाखल करण्यात आले.

[1][१२२-अ. राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, असा निदेश देता येईल की, या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमान्वये निदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा बाबींसंबंधी व त्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा कोणत्याही अटी असल्यास त्यांच्या अधीनतेने त्याने वापरावयाचा कोणताही अधिकार अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अधिकाऱ्यास किंवा त्यास अधीन असलेल्या प्राधिकाऱ्यासदेखील वापरता येईल.] अधिकारांचे प्रत्यायोजन.

**१२३.** (१) [2][राज्य] शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाची प्रयोजने अंमलात आणण्याकरिता नियम करता येतील. नियम.

(२) विशेषेकरून व वरील तरतुदीच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, असे नियम पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही गोष्टींसाठी करता येतील :--

(अ) कलम ३, खंड (१४), उपखंड (क) अन्वये विहित करावयाचा प्राधिकारी ;

(ब) कलम ७ अन्वये मालक व कामगार यांच्या हितसंबंधाचे प्रतिनिधित्व करणारी मंडळे ज्या रीतीने तयार करण्यात येतील; ती रीत आणि समेट मंडळातील रिकाम्या झालेल्या जागा ज्या रीतीने भरण्यात येतील ती रीत ;

(क) कलम ९ अन्वये न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून नेमणूक होण्यासाठी आवश्यक असलेल्या अर्हता ;

(ड) कलम १२ अन्वये संघाच्या नोंदवह्या व मान्यताप्राप्त संघाची यादी ज्या नमुन्यामध्ये ठेवण्यात येईल तो नमुना ;

(इ) कलम १३, पोट-कलमे (१), (२) व (३) या अन्वये करावयाच्या अर्जाचा नमुना ;

(फ) कलम १४ अन्वये द्यावयाची फी, आणि नोंदणी प्रमाणपत्र ज्या नमुन्याप्रमाणे द्यावयाचे तो नमुना ;

(ग) कलम १६, पोट-कलम (१) अन्वये द्यावयाची फी, [3][पोट-कलम (३) खालील नोंदणीच्या प्रमाणपत्राचा नमुना] आणि पोट-कलम (४) अन्वये अर्ज प्रसिध्द करण्याची रीत ;

(ह) कलम १७ पोट-कलम (१) अन्वये द्यावयाची फी ;

(आय) कलम १९ अन्वये विवरणपत्रे ज्या तारखास व ज्या रीतीने सादर केली जातील त्या तारखा व ती रीत ;

(जे) कलम २१ अन्वये आदेश प्रसिध्द करण्याची रीत ;

(के) कलम २२ अन्वये एकाहून अधिक स्थानिक क्षेत्रांकरिता संघाची नोंदणी करण्याची रीत ;

(ल) कलम २३ अन्वये कराराच्या अर्जाचा नमुना ;

(म) कलम २५ अन्वये प्राधिकृत करावयाचे [4][मान्यताप्राप्त संघाचे सदस्य,] अधिकारी, [5][कर्मचारी वर्गातील सदस्य] आणि त्या कलमाअन्वये असलेले हक्क ज्या रीतीने व ज्या शर्तीच्या अधीनतेने बजावले जातील ती रीत व त्या शर्ती ;

(न) कलम २६, पोट-कलम (६) अन्वये विहित करावयाची फी ;

---

[1] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ५० अन्वये कलम १२२-अ हे दाखल करण्यात आले.
[2] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.
[3] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ५१ (अ) (१) या अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[4] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३, कलम २८ (एक) अन्वये हे शब्द दाखल करण्यात आले.
[5] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम ३० (१) अन्वये हे शब्द दाखल करण्यात आले.

[1][(न-अ) प्रकरण-तीन, [2][चार व पाच] यांच्या प्रयोजनांकरिता, संघांच्या सदस्यसंख्येबाबत खातरजमा करून घेण्यासाठी निबंधकाने अनुसरावयाची कार्यपध्दती ;

[(न-ब) अशा सदस्यसंख्येबाबत घेतलेले आक्षेप सादर करण्याची रीत व चौकशीस सुरुवात करण्यापूर्वी निबंधक ठेवण्यास सांगेल अशी अनामत रक्कम ;

[(न-क) सदस्यसंख्येबाबत कोणतेही निष्कारण किंवा तापदायक आक्षेप घेतल्याबद्दल निबंधक ठरवील असा दंड ;]

(ओ) कलम २७, पोट-कलम (२), खंड (ब) अन्वये विहित करावयाचा प्राधिकारी आणि पोट-कलम (३) अन्वये मालकांचा प्रतिनिधी निर्धारित करण्याची रीत ;

(प) कलम २८, पोट-कलम (१) अन्वये ज्या रीतीने व्यक्ती निवडून दिल्या जातील व पोट-कलम (४) अन्वये ज्या रीतीने त्यांना परत बोलाविता येईल ती रीत, ज्या कालावधीपर्यंत व ज्या रीतीने त्या काम करतील तो कालावधी व ती रीत आणि पोट-कलम (५) अन्वये रिकाम्या झालेल्या जागा ज्या रीतीने भरल्या जातील ती रीत ;

(क्यू) कलम ३०, खंड (३) अन्वये अर्ह किंवा प्राथमिक संघास प्राधिकृत करावयाची रीत, परंतुकाच्या दुसऱ्या परिच्छेदान्वये कराराच्या किंवा मिटवणुकीच्या अटी मान्य करण्याची रीत, आणि परंतुकाच्या तिसऱ्या परिच्छेदान्वये विहित करावयाच्या प्रतिनिधींची संख्या व त्यास निवडून द्यावयाची रीत ;

(र) कलम ३४, पोट-कलम (२) अन्वये ज्या शर्तींचे पालन करून प्रवेश करण्याच्या व तपासणीच्या अधिकाराचा वापर केला जाईल त्या शर्ती ;

(स) कलम ३५, पोट-कलम (१), अन्वये स्थायी आदेशांचा मसुदा सादर करण्याची रीत आणि पोट-कलम (२) अन्वये कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी व इतर हितसंबंधित व्यक्ती यांच्याशी विचारविनिमय करण्याची रीत ;

(ट) कलम ४२, पोट-कलमे (१) व (२) अन्वये द्यावयाच्या नोटिशीचा नमुना व विहित करण्यात यावयाच्या व्यक्ती, आणि पोट-कलम (४) च्या परंतुकान्वये विनंती करण्याची रीत व विहित करावयाचा कालावधी ;

(यू) कलम ४३, पोट-कलम (३) अन्वये विहित करावयाच्या इतर व्यक्ती ;

(व्ही) कलम ४४, पोट-कलम (१) अन्वये कराराचे टिपण पाठविण्याची रीत ;

(डब्ल्यू) कलम ४९, [3][पोट-कलम (१) अन्वये विहित करावयाची संयुक्त समितीच्या सदस्यांची संख्या, संघाने सदस्य नेमून द्यावयाची रीत व आदेशांच्या प्रती द्यावयाची रीत, आणि] पोट-कलम (२) अन्वये करावयाची सभापतींची नेमणूक आणि ज्या रीतीने तो आपली कर्तव्ये बजावील ती रीत ;

(एक्स) कलम ५०, पोट-कलम (२) अन्वये संयुक्त समितीचे कामकाज चालविण्याची रीत ;

(वाय) कलम ५२, पोट-कलम (१) अन्वये कराराचे टिपण पाठविण्याची रीत, पोट-कलम (२) अन्वये ज्या नमुन्याप्रमाणे विशेष सूचना पाठवावयाची तो नमुना आणि पोट-कलम (४) अन्वये विहित करावयाच्या इतर व्यक्ती ;

(झेड) कलम ५४, पोट-कलम (१) अन्वये ज्या नमुन्याप्रमाणे निवेदन पाठविले जाईल तो नमुना ;

(अ-अ) कलम ५६, पोट-कलम (१) अन्वये समेट कार्यवाही चालविण्याची रीत ;

(अ-ब) कलम ५८, पोट-कलम (१) अन्वये मिटवणुकीचे टिपण ज्या नमुन्यात करण्यात येईल तो नमुना आणि ते प्रसिध्द करण्याची रीत ;

---

[1] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४९, कलम ५ अन्वये हे खंड समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ५१ (अ) (दोन) याअन्वये "व चार" या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३, कलम २८ (दोन) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(अ-क) कलम ५९, पोट-कलम (२) अन्वये नोटीस देण्याची रीत ;

(अ-ड) कलम ६०, पोट-कलम (१) अन्वये समेटकर्त्याने किंवा मंडळाने अनुसरावयाची कार्यपध्दती ;

(अ-इ) कलम ६६, पोट-कलम (३) अन्वये सादर निवेदन प्रसिध्द करण्याची रीत ;

(अ-फ) कलम ७२, पोट-कलम (२) अन्वये विहित करावयाचे फेरबदल आणि पोट-कलम (३) अन्वये मालकांना लवादाकडे पक्षकार करून घेण्याची रीत ;

(अ-ग) कलम ७४, पोट-कलम (२) अन्वये प्रसिध्द करण्याची रीत ;

(अ-ह) कलम ७९, पोट-कलम (२) अन्वये ज्या नमुन्यात व ज्या रीतीने अर्ज करण्यात येईल तो नमुना व ती रीत ;

[1][(अ-ह-अ) कलम ८६-क, पोट-कलम (१) खालील इतर औद्योगिक बाबी व विवाद ;

(अ-ह-ब) कलम ८६-इ अन्वये वेतन मंडळाने अनुसरावयाच्या कार्यपध्दतीसंबंधीचे नियम] ;

(अ-आय) कलम १११ अन्वये ज्या रीतीने अभिलेख ठेवण्यात येतील ती रीत ;

(अ-ज) कलम ११२, पोट-कलम (१) अन्वये विहित करावयाच्या शर्ती ;

(अ-के) कलम ११६, अन्वये नोटीस देण्याची रीत ;

(अ-ल) कलम ११८, पोट-कलम (२) खालील निबंधक, समेटकर्ता, [2][वेतन मंडळ] किंवा मंडळ याचे आणखी अधिकार [3][आणि पोट-कलम (४) अन्वये माहिती सत्यापित करून देण्याची रीत ;

(अ-म) विहित केली पाहिजे किंवा करता येईल अशी कोणतीही इतर बाब ;

(३) या कलमान्वये केलेले नियम **शासकीय राजपत्रात** आगाऊ प्रसिध्द करण्यात आले पाहिजेत या शर्तीच्याअधीन असतील.

[4][(४) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम हा, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर राज्य विधामंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा नियम करू नये म्हणून संमत होतील व असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम अशी अधिसूचना प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून, अशा सुधारलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा यथास्थिति, अंमलात येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा निर्भाविता यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.]

[5][**१२३-अ** मध्यप्रांत व वऱ्हाड औद्योगिक विवाद मिटवणूक अधिनियम, १९४७, हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे ; *(सन १९४७ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २३ यांचे निरसन.)*

परंतु,---

(अ) याप्रमाणे निरसित करण्यात आलेल्या या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये केलेली प्रत्येक नेमणूक नियम अथवा काढलेला प्रत्येक आदेश किंवा नोटीस अथवा काढलेली कोणतीही अधिसूचना या अधिनयमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर, प्रस्तुत अधिनियमान्वये केलेली कोणतीही ]

---

[1] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४३, पोट-कलम २८(३) अन्वये हे खंड समाविष्ट करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम २८(४) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[3] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम ३०(२) अन्वये "कलम ११८ चे" या शब्दांऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ५१(ब) अन्वये पोट-कलम (४) जादा दाखल करण्यात आले.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ५२ अन्वये कलम १२३-अ समाविष्ट करण्यात आले.

नेमणूक नियम किंवा विनियम अथवा दिलेला कोणताही आदेश किंवा नोटीस अथवा काढलेली कोणतीही अधिसूचना याद्वारे अधिक्रमण झालेले असल्याखेरीज आणि होईतोपर्यंत या अधिनियमाच्या तरतुदींन्वये करण्यात, देण्यात किंवा काढण्यात आल्या आहेत, असे मानले जाईल ;

(ब) याप्रमाणे निरसित केलेल्या अधिनियमाच्या तरतुदींन्वये ठरविलेला कोणताही स्थायी आदेश, नोंदलेला करार किंवा नोंदलेली मिटवणूक, अंमलात आणलेले बदल, केलेली निवेदनें किंवा राज्य औद्योगिक न्यायालय, जिल्हा औद्योगिक न्यायालय, कामगार आयुक्त, निबंधक किंवा वेतन मंडळाने केलेले निवाडे किंवा काढलेले आदेश या गोष्टी अधिनियमाच्या तत्सम तरतुदीअनुसार समुचित प्राधिकाऱ्याने ठरविलेल्या, नोंदलेल्या किंवा नोंदणी केलेल्या, अंमलात आणलेल्या किंवा दिलेल्या असल्याचे मानण्यात येईल ;

(क) अशाप्रकारे निरसित करण्यात आलेल्या अधिनियमान्वये संपादन केलेला कोणताही हक्क किंवा विशेषाधिकार, प्राप्त झालेले किंवा संपादन केलेले किंवा पत्करलेले कोणतेही आबंधन किंवा कोणतेही दायित्व यांवर परिणाम होणार नाही आणि असा हक्क, विशेषाधिकार, आबंधन किंवा दायित्व याच्या बाबतीत कोणतेही अन्वेषण, कायदेशीर कार्यवाही किंवा उपाययोजना ती या अधिनियमाच्या तरतुदींशी जेथवर विसंगत नसेल तेथवर ती, जणू काही हा अधिनियम निरसित करण्यता आला नव्हता व तो चालू होता असे समजून तो दाखल करता येईल, चालू ठेवता येईल व तिच्यापासून लाभ घेता येईल ;

(ड) राज्य औद्योगिक न्यायालय, जिल्हा औद्योगिक न्यायालय, कामगार आयुक्त, निबंधक किंवा वेतन मंडळ यांच्यापुढे अनिर्णित असलेली, याप्रमाणे निरसित केलेल्या अधिनियमाच्या तरतुदींखालील कोणतीही कार्यवाही, समेटाप्रीत्यर्थ चालविलेली कार्यवाही किंवा या अधिनियमाच्या तरतुदींन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्यांच्या न्याय्य चौकशीसंबंधी असलेली कोणतीही कार्यवाही, ही उक्त अधिनियम निरसित करण्यात आला नसावा व तो अंमलात असावा त्याप्रमाणे चालू ठेवण्यात व पूर्ण करण्यात येईल, आणि अशा कार्यवाहीत लादलेल्या शास्तीची याप्रमाणे निरसित केलेल्या अधिनियमान्वये नोंदणी करण्यात येईल ;

(इ) याप्रमाणे निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमान्वये एखाद्या उद्योगासाठी कोणत्याही स्थानिक क्षेत्रात मान्यताप्राप्त संघ म्हणून नोंदणी केलेला कोणताही संघ हा या अधिनियमान्वये त्या स्थानिक क्षेत्रातील उद्योगाचा प्रतिनिक संघ म्हणून मानण्यात येईल ;

(फ) याप्रमाणे निरसित केलेल्या अधिनियमान्वये कामगारांचे प्रतिनिधी म्हणून हजर राहण्याचा व काम करण्याचा हक्क असलेले, निवडून आलेले इतर कोणतेही प्रतिनिधी हे, उक्त अधिनियम निरसित करण्यात आला असला तरीही, याप्रमाणे निरसित केलेल्या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीत, कार्यवाही पूर्ण होईपर्यंत, ते कामगारांचे प्रतिनिधी म्हणून काम करण्याचे चालू ठेवतील.]

# अनुसूची-'एक'

[कलम ३५]

१. कामगारांचे वर्गीकरण, उदाहरणार्थ स्थायी, अस्थायी, शिकाऊ उमेदवार, परिवीक्षाधीन, बदली वगैरे [१][आणि रिकामी होणारी पदे भरण्याची व बदलींची वरिष्ठता ठरविण्याची रीत व पूर्वोक्त प्रयोजनांशी संबंधित सर्व बाबी.]

[२][१-अ. कामगारांची तिकिटे, पत्रे, नोंदवही व सेवा प्रमाणपत्रे.]

२. कामाचे कालावधी, कामाचे तास, सुट्ट्या, पगाराचे दिवस आणि वेतनाचे दर हे कामगारांना अधिसूचित करण्याची रीत.

३. [३][पाळी पध्दतीने काम करणे यात] एक किंवा अधिक विभागांत दोन किंवा अधिक पाळ्या सुरू करणे, त्यात फेरबदल करणे किंवा त्या खंडित करणे याविषयी कामगारांना [३] [द्यावयाच्या नोटिशीचा समावेश होतो.]

४. एखादा विभाग किंवा त्याचा भाग किंवा संपूर्ण उपक्रम बंद करणे किंवा पुन्हा सुरु करणे.

५. हजेरी व उशिरा येणे.

[४][६. रजा देण्याची कार्यपध्दती व प्राधिकार.

७. सुट्ट्या देण्याची कार्यपध्दती व प्रधिकार.]

८. झडती घेतली जाण्यास पात्र असणे आणि विवक्षित प्रवेशद्वारांतून परिवास्तूमध्ये प्रवेश करणे.

९. तात्पुरती [५][कामबंदी] यात "षेईंग ऑफ" चा समावेश होतो व त्यापासून उद्‌भवणारे मालकांचे व कामगारांचे हक्क व दायित्वे.

१०. मालकाने व कामगाराने द्यावयाची [६][नोटीस धरून सेवा] समाप्ती.

११. [७][शिक्षा, यात पुढील गोष्टींचा समावेश होतो :--]

गैरवर्तणुकीबद्दल [७][ताकीद देणे, ठपका ठेवणे, दंड करणे, निलंबन किंवा] बडतर्फ करणे, अभिकथित गैरवर्तणुकीची चौकशी होईपर्यंत निलंबन आणि गैरवर्तणुकीस घटकभूत होणाऱ्या कृती किंवा अकृती.

१२. मालकाने, त्याच्या अभिकर्त्याने किंवा सेवकाने कामगारास अन्यायाने वागविणे किंवा त्याच्याकडून नियमबाह्य काम करून घेणे, याविरुध्द कामगारांनी दाद मागण्याचे मार्ग.

---

[१] शासकीय अधिसूचना, उद्योग व कामगार विभाग, क्रमांक बीआयआर-१०७०/१४८२३९-कामगार-एक, दिनांक १६ ऑक्टोबर १९७० अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२] शासकीय अधिसूचना, कामगार विभाग, क्रमांक २२/४८-एक दिनांक १७ सप्टेंबर १९४८ अन्वये ही बाब समाविष्ट करण्यात आली.

[३] वरील अधिसूचनेद्वारे "नोटीस" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] शासकीय अधिसूचना, विकास विभाग, क्रमांक १२३७/४६, दिनांक २३ ऑक्टोबर १९५२ अन्वये मूळ बाबींऐवजी बाबी ६ व ७ दाखल करण्यात आल्या.

[५] शासकीय अधिसूचना, कामगार व गृह विभाग, क्रमांक ७१७/४८, दिनांक १७ मे, १९५० अन्वये "कामरोध" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[६] शासकीय अधिसूचना, कामगार विभाग, क्रमांक २२/४८-एक, दिनांक १७ सप्टेंबर, १९४८ अन्वये "सेवा" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[७] शासकीय अधिसूचना, कामगार व गृह विभाग, क्रमांक २२/४८, दिनांक ११ एप्रिल, १९५० अन्वये "निलंबन किंवा" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[१][१३. निवृत्ती किंवा नियत सेवावधीचे वय.]

[२][१४. परिवीक्षाधीन किंवा बदली किंवा अस्थायी किंवा नैमित्तिक कामगारांना सेवेत घेणे किंवा पुन्हा सेवेत घेणे आणि त्यांच्या सेवेच्या अटी.]

## अनुसूची-' दोन '

[कलम ४२]

१. कोणत्याही व्यवसायात अगर प्रक्रियेसंबंधीच्या कामावर अथवा एका किंवा कोणत्याही विभागात किंवा एखाद्या पाळीत कामावर लावलेल्या अगर लावावयाच्या व्यक्तींच्या संख्येत अनिवार्य परिस्थिती उत्पन्न झालेली नसता, कायम किंवा अंशतः कायम स्वरूपात घट करण्याची योजना.

२. कोणत्याही व्यवसायात किंवा प्रक्रियेसंबंधीच्या कामावर अथवा एका किंवा अधिक विभागात कामावर लावलेल्या किंवा लावावयाच्या व्यक्तींच्या संख्येत कायम किंवा अंशतः कायम वाढ.

३. या अधिनियमान्वये लागू असलेल्या स्थायी आदेशांत तरतूद केली असेल ते खेरीजकरून एरव्ही कोणत्याही कामगाराची बडतर्फी.

४. कामाच्या सुसूत्रीकरणविषयक किंवा इतर कार्यक्षमताविषयक पध्दती [३][मग त्या प्रयोगादाखल असोत वा अन्यथा असोत.]

५. [४][या अधिनियमान्वये लागू असलेल्या स्थायी आदेशांच्या कक्षेत न येणाऱ्या, पाळी पध्दतीने काम करण्यासंबंधी सर्व बाबी.]

६. कामगारांच्या संघाची मान्यता काढून घेणे.

७. कोणत्याही रुढीप्राप्त सवलती किंवा विशेषाधिकार काढून घेणे किंवा परिपाठात बदल करणे.

८. या अधिनियमान्वये लागू असलेल्या स्थायी आदेशात, जेथवर तरतूद केली असेल ती खेरीजकरून, शिस्तीचे नवीन नियम सुरू करणे किंवा विद्यमान नियमांत आणि त्यांच्या अर्थविवरणात फेरबदल करणे.

९. वेतन, यात ते देण्याचा अवधी व पध्दती यांचा समावेश होतो.

१०. कामाचे तास आणि विश्रांतीच्या मधल्या वेळा.

[५][११. अनुसूची एक, बाबी ६ व ७ यांत विनिर्दिष्ट केलेल्या बाबींव्यतिरिक्त रजा व सुट्ट्या या संबंधीच्या सर्व बाबी.]

---

[१] शासकीय अधिसूचना, विकास विभाग, क्रमांक बीआयआर/१०५५, दिनांक १९ मे १९५६ अन्वये बाब १३ जादा दाखल करण्यात आली.

[२] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम १३ अन्वये ही नोंद जादा दाखल करण्यात आली.

[३] शासकीय अधिसूचना, विकास विभाग, क्रमांक १२८७/४८, दिनांक ७ डिसेंबर १९५३ अन्वये हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] शासकीय अधिसूचना, कामगार विभाग, क्रमांक २२/४८ एक, दिनांक १७ सप्टेंबर १९४८ अन्वये मूळ बाबीऐवजी ही बाब दाखल करण्यात आली.

[५] शासकीय अधिसूचना, विकास विभाग, क्रमांक १२३७/४६, दिनांक २८ फेब्रुवारी १९५३ अन्वये ही बाब समाविष्ट करण्यात आली.

## अनुसूची-' तीन '

[कलम ४२]

१. कामगारांना पुरविलेले सामानसुमान आणि साधनसामग्री यांची पर्याप्तता व त्यांचा दर्जा.

२. कामगारांना काम नेमून देणे व आस्थापनेमध्ये तेथल्या तेथे त्यांची बदली करणे.

३. कामगारांचे आरोग्य, सुरक्षितता व कल्याण (यांत पाणी, जेवणासाठी छपऱ्या, विश्रांतीसाठी छपऱ्या, संडास, मुत्र्या, शिशुगृहे, उपहारगृहे यांच्या व अशा सुखसोयी यांचा समावेश होतो.)

४. कामगार संघ, संघटना त्यांचे सदस्यत्व व वसूल करावयाची फी यासंबंधीच्या बाबी.

५. निवाडे, करार व मिटवणुकी यांचे अन्वयार्थ व अर्थविवरणे.

६. कामावर लावणे, यात पुढील गोष्टींचा समावेश होतो :--

(१) पुनःस्थापन व भरती करणे.

(२) संबंधित उद्योगात पूर्वी कामावर लावलेल्या व्यक्तींची बेकारी.

७. [१][कामबंदीबद्दल] भरपाई देणे.

---

[१] शासकीय अधिसूचना, कामगार व गृह विभाग, क्रमांक ७१७/४८, दिनांक १७ मे १९५० अन्वये "कामरोधाबद्दल" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

एच ५२-६०८२ पु.-११-२००६

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.